एकमेव स्वतंत्र दैनिक
# नवाकाळ
NAVAKAL
१०४ शतकोत्तर वाटचाल
• मुंबई, शनिवार ४ जुलै, २०२६ • वर्ष-१०४, अंक-१२१, पाने-८, किंमत: ₹ ७
• R.N.I.No.1814/57 • Vol.- 104, Issue - 121 Marathi - Daily - Mumbai, 4 July, 2026 Page - 8 Price- Rs. 7/-
• संपादक- रोहित रमाकांत पांडे 24x7 : www.navakal.in Email- contact@navakal.in

नवाकाळच्या Digital बातम्या पाहण्यासाठी Scan करा!
फक्त एक App आणि तुमची ई-रिक्षा होणार जागच्या जागी बंद?
navakal.in
@navakal.news Navakal Digital Network @_NDN_Offical @NavakalNews

# सिया आणि चेतनला पोलीस कोठडीत ठेवण्याची गरज नाही! सत्र न्यायालयाचा निर्णय

**केतन अग्रवालला लोहगडावरून ढकलून ठार केल्याच्या आरोपाखाली अटकेत असलेले सिया गोयल आणि चेतन चौधरी यांना आणखी काळ पोलीस कोठडीत ठेवण्याची गरज नाही, असे म्हणत वडगाव सत्र न्यायालयाने त्यांना १४ दिवस न्यायालयीन कोठडीत पाठवले. यामुळे या दोघांना जामिनासाठी अर्ज करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या दोघांना त्यांच्या कृत्यात एका मित्राने मदत केली अशी चर्चा होती. मात्र पोलीस अहवालात असा कोणताही उल्लेख नाही, असे सियाच्या वकिलाने सांगितले.**



■ पुणे

**आजच्या** सुनावणीत सरकारी पक्षाने न्यायालयात दोघांची तीन दिवसांची पोलीस कोठडी मागताना सांगितले की, मोबाईलमधील डेटा मिळाल्यानंतर दोन्ही आरोपींना समोरासमोर बसवून पडताळणी करणे आवश्यक आहे. दोघे सांकेतिक भाषेत बोलले आहेत. तपास अधिकाऱ्यांनी सांगितले की, लोहगडावर सिया बुटाची लेस बांधण्याच्या बहाण्याने खाली वाकली आणि त्याचवेळी चेतनने केतनला दरीत ढकलल्याचा संशय आहे. या कटात आणखी कुणा जवळच्या व्यक्तीचा सहभाग होता का, याचाही तपास सुरू आहे. पोलिसांनी दोन्ही आरोपींची पॉलिग्राफ (लाय डिटेक्टर) चाचणी घेण्याची परवानगीही न्यायालयाकडे मागितली होती. मात्र, न्यायालयाने या चाचणीसाठी आरोपींची संमती आवश्यक असल्याचे स्पष्ट केले. यावेळी सरकारी वकिलांनी सध्या नार्को चाचणीची गरज नसल्याचे सांगितले. बचाव पक्षाने न्यायालयात दावा केला की, सिया गोयल तपासात पूर्ण सहकार्य करत आहे. गेले १४ दिवस ते पोलीस कोठडीत होते. सियाचा फोनही पोलिसांकडे आहे. त्यामुळे पोलीस कोठडी वाढवण्यासाठी आवश्यक ठोस कारणे नाहीत. न्यायालयाने हा युक्तिवाद ग्राह्य धरत दोन्ही आरोपींना १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली.

तपास अधिकारी मनोज पवार यांनी दिलेल्या माहितीनुसार, चौकशीदरम्यान चेतनची घटनाक्रमाबाबत सखोल विचारपूस केली. सियाकडे तिच्या पासपोर्टसह इतर बाबींवरून चौकशी केली. याशिवाय, पोलिसांनी सिया गोयलने हत्येची रिहर्सल पुण्यातील ज्या लुल्लानगर परिसरात केली होती, असा संशय आहे. तिथे नेऊन घटनास्थळाची पडताळणी केली. सियाच्या घरातून घटना घडली त्या दिवशी तिने परिधान केलेले कपडेही जप्त केले असून, ते फॉरेन्सिक तपासणीसाठी पाठवले आहेत.

केतन अगरवालच्या हत्येच्या तपासात नवनवे खुलासे होत आहेत. या हत्येच्या कटात मुख्य आरोपी सिया गोयल आणि तिचा प्रियकर चेतन चौधरी यांच्यानंतर आता तिसऱ्या व्यक्तीचा सहभाग असल्याचीही माहिती मिळाली आहे. पोलिसांनी याप्रकरणी बीडच्या एका तरुणाला ताब्यात घेतले असून, त्याला या संपूर्ण कटाची पूर्वकल्पना असल्याचे तपासातून बाहेर आले झाले. तरुण सध्या पुण्यातील बालेवाडी येथील एका खासगी कंपनीत नोकरी करतो. तो मुख्य आरोपी चेतन चौधरीचा वर्गमित्र आहे. त्याने दिलेल्या माहितीनुसार, मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यापासून तो चेतनच्या संपर्कात होता. चेतन आणि सियाने केतनला कसे वाटेतून बाजूला करणार आहोत, याच्या संपूर्ण कटाची या तरुणासोबत चर्चा केली होती. त्यांनी या तरुणाला १८ जून रोजी लोहगडावर आपल्यासोबत येण्याचा आग्रहही केला होता. मात्र, त्याने नकार दिला. चेतन-सियाला 'असे काही करू नका' असा सल्लाही दिला. केतनचा खून केल्यानंतर चेतन सगळ्यात आधी याच मित्राला भेटला होता. त्यानंतर सियानेही त्याच्याशी संपर्क साधला होता. पोलीस सध्या त्याचे कॉल रेकॉर्ड्स आणि डिजिटल चॅट तपासत आहेत. पुणे ग्रामीण पोलिसांनी या तरुणाला ताब्यात घेतले असून, पोलीस त्याला या गुन्ह्यात 'माफीचा साक्षीदार' बनवण्याची शक्यता आहे.

## उबाठातर्फे रविवारपासून राज्यव्यापी रामरक्षा आंदोलन



**उबाठा प्रमुख उद्धव ठाकरे यांनी आज पत्रकार परिषद घेऊन अयोध्या दानचोरीला विरोध करण्यासाठी येत्या रविवारपासून राज्यव्यापी रामरक्षा आंदोलनाची घोषणा केली.**

■ मुंबई

**उद्धव ठाकरे** म्हणाले की, संपूर्ण देश भाजपाच्या अंमलाखाली आहे. आम्हीही भाजपासोबत होतो. राममंदिरासाठी आंदोलनात आम्ही सहभागी होतो. भाजपा राम मंदिराचे भांडवल करून सत्तेत आले. आज दुर्दैवाने राम मंदिराबाबत वेगळी चर्चा सुरू आहे. राम मंदिरावर दरोडा टाकला गेला आहे. काहींच्या मते हा पैसा फोडाफोडीसाठी वापरला जात आहे. परंतु आता हिंदु माफ नहीं करेंगा असे आम्ही म्हणतो.


रविवारी ५ जुलैला सायंकाळी ४ वाजता दादर कबुतरखाना येथे मारुती मंदिरासमोर तमाम रामभक्त, हिंदूंनी यावे. मी व माझे नेते तिथे असणार आहोत. आम्ही मंदिरासमोर रामरक्षा म्हणू, हनुमान स्तोत्र म्हणू, हनुमान चालिसा म्हणणार आहोत. पक्ष सोडून सर्वांना येण्याचे आवाहन आम्ही करीत आहोत. यानंतर राज्यभर, खेड्यापाड्यात जिथे हनुमान मंदिर असेल तिथे हे आंदोलन होईल. जे हिंदुंच्या भावनेशी खेळून राममंदिर लुटत आहेत ते देशद्रोह करत आहेत. मुंबईतील उत्तर भारतीयांनीही या आंदोलनात सामील व्हावे, असे मी आवाहन करतो आहे.

थेट अयोध्येला जाऊन जाब का विचारत नाही. या प्रश्नावर ते म्हणाले की, मी अयोध्येला जाईनच, पण महाराष्ट्र जागा झाला पाहिजे. हिंदू जागे झाले आहेत, ते जाब विचारतील. राम मंदिरात जे चोरी करीत होते त्यांना शिक्षा झालीच पाहिजे. गाव, खेड्यात कसे आंदोलन होईल त्याचे वेळापत्रक जाहीर करू. जे चोर आहेत त्यांना राज्यपाल किंवा मंत्री बनवू नये, त्यांना शिक्षा झाली पाहिजे यासाठी हे आंदोलन आहे.

## बॉम्बे पोर्ट ट्रस्टच्या गोदींचे खासगीकरण श्रीमंतांच्या यॉटसाठी मरिना उभारणार

■ मुंबई

**केंद्र** सरकारच्या अंतर्गत असलेल्या बॉम्बे पोर्ट ट्रस्टने आपली जमीन आणि जहाजातील मालाची वाहतूक या आपल्या खास कामांचे खासगीकरण करण्याचे ठरविले आहे. इंदिरा डॉक येथे जहाजातून माल उतरविणे व चढविणे हे काम जे. एम. बक्षी आणि एम दिनशा या दोन खासगी कंपन्यांना १५ वर्षांसाठी दिले आहे. तर व्हिक्टोरिया व प्रिन्सेस डॉक येथे आलिशान मरीना उभारून समुद्रात क्रॉस आयर्लंड परिसरात श्रीमंतांच्या जवळजवळ ४०० यॉर्ट (खासगी बोटी) पार्किंगची व्यवस्था करण्याची योजना आहे.



प्रिन्सेस डॉक व व्हिक्टोरिया डॉक येथे मरिना उभारण्याची योजना केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी प्रथम प्रस्तावित केली. यासाठी लवकरच निविदा निघणार आहे. हे काम ६०० कोटीतून अधिक किमतीचे आहे. समुद्रात असलेल्या क्रॉस आयर्लंड या छोट्या टेकडीपर्यंत पूल बांधण्याचे काम बीपीटी करणार आहे. त्यानंतर बाकी सर्व योजना खासगी कंपन्यांकडे सोपवली जाईल. क्रॉस आयर्लंड परिसरात जवळजवळ ४०० यॉटचे पार्किंग करण्याची व्यवस्था होईल. श्रीमंत आपल्या कारने पुलावरून येतील, यॉटमध्ये बसतील, समुद्रात फेरफटका मारतील. श्रीमंतांसाठी बंदराच्या जमिनीवर » पान ७ वर

## विक्रोळीत शिवसैनिकाच्या संशयास्पद मृत्यूमुळे तणाव

■ मुंबई

**विक्रोळीत** एका स्थानिक शिवसैनिकाचा रुग्णालयात उपचारादरम्यान संशयास्पद मृत्यू झाल्याची घटना समोर आल्याने परिसरात प्रचंड खळबळ उडाली. या घटनेचे वृत्त कळताच संतप्त शिवसैनिक आणि रुग्णाचे नातेवाईक मोठ्या संख्येने रुग्णालयाबाहेर जमा झाले. रुग्णालयावर हलगर्जीपणाचा आरोप करत त्यांनी मृतदेह ताब्यात घेण्यास नकार दिल्याने तणाव निर्माण झाला.

चेतन ठाकूर असे मृत शिवसैनिकाचे नाव आहे. काल रात्री ताप आल्यामुळे चेतनला विक्रोळीतील 'आदि आरोग्य' रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. प्राथमिक उपचार सुरू केल्यानंतर त्याची प्रकृती स्थिर असल्याचे डॉक्टरांनी सांगितले होते. मात्र, आज सकाळी अचानक त्याचा मृत्यू झाल्याचे कळताच त्याच्या कुटुंबियांना मोठा धक्का बसला. साध्या तापाने रुग्णाचा मृत्यू कसा झाला, असा सवाल उपस्थित करत नातेवाईकांनी रुग्णालयावर निष्काळजीपणाचा आरोप लावला. या घटनेची माहिती मिळताच शिवसेना उबाठाचे » पान ७ वर

## शाळांच्या ५०० मीटर परिसरात 'स्टिंग' एनर्जी ड्रिंक विक्रीस बंदी

■ मुंबई

**शाळकरी** विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने राज्य सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. राज्यातील सर्व शाळांच्या ५०० मीटर परिसरात 'स्टिंग' एनर्जी ड्रिंकच्या विक्रीवर बंदी घालण्याचे निर्देश अन्न व औषध प्रशासनाला दिले आहेत. विधानसभेत या विषयावर झालेल्या चर्चेनंतर अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवळ यांनी ही घोषणा केली. विद्यार्थ्यांमध्ये या पेयाचे वाढते आकर्षण आणि त्यातील कॅफिन व साखरेच्या प्रमाणाबाबत व्यक्त झालेल्या चिंतेनंतर हा निर्णय घेण्यात आला.

श्रीगोंदा मतदारसंघाचे

राज्य सरकारचा निर्णय



भाजपा आ. विक्रम पाचपुते यांनी 'स्टिंग' ऊर्जा पेयाच्या वाढत्या वापराबाबत आणि त्याच्या आरोग्यावर होणाऱ्या परिणामांबाबत प्रश्न उपस्थित केला. त्यांनी सांगितले की, या पेयामध्ये कॅफिन, टॉरिन आणि साखरेचे मिश्रण असते. हे पेय नियमांमध्ये बसत असले, तरी या तीन घटकांचे प्रमाण आणि

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

त्यांचे एकत्रित मिश्रण मुलांच्या आरोग्यासाठी धोकादायक ठरू शकते. सरकारने दिलेल्या उत्तरानुसार 'स्टिंग'चे २७ नमुने तपासण्यात आले असून, त्यापैकी » पान ७ वर

## राज्यात ७ व ८ जुलैला शाळा बंद शिक्षकांची आंदोलनाची घोषणा

■ मुंबई

**राज्यातील** अंशतः अनुदानित आणि अनुदानित शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांसाठी शिक्षक समन्वय संघाने ७ आणि ८ जुलै रोजी राज्यव्यापी शाळाबंद आंदोलनाची घोषणा केली आहे. या दोन दिवसांत राज्यातील संबंधित शाळांमध्ये अध्यापनाचे काम बंद ठेवले जाणार असून, शिक्षकांनी मोठ्या संख्येने मुंबईतील आझाद मैदानावर होणाऱ्या आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन शिक्षक समन्वय संघाचे नेते खंडेराव जगदाळे यांनी केले.

शिक्षक समन्वय संघाच्या म्हणण्यानुसार, अनुदान, वेतन, सेवाशर्ती आणि इतर प्रलंबित प्रश्नांबाबत शासनाकडे अनेक वेळा निवेदने दिली. संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत बैठका झाल्या. मात्र, वारंवार पाठपुरावा करूनही शासनाकडून कोणताही ठोस निर्णय झालेला नाही. त्यामुळे शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर नाराजी आहे. यामुळे राज्यभरातील अंशतः अनुदानित आणि अनुदानित शाळा दोन दिवस बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या आंदोलनात सर्व जिल्ह्यांतील शिक्षक, मुख्याध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहभागी होऊन शासनापर्यंत आपल्या न्याय्य मागण्या पोहोचवाव्यात. प्रलंबित अनुदान, सेवाशर्ती आणि इतर प्रश्नांमुळे शिक्षकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे.

## सलग तिसऱ्या दिवशी पावसाचा कहर मुंबई, ठाणे, पालघरला आज रेड अलर्ट



पालघर, ठाण्यात आज शाळांना सुट्टी

■ मुंबई

**राज्यात** सलग तिसऱ्या दिवशी आज पावसाचा जोर कायम राहिला. मुंबईसह अनेक जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले. बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या कमी दाबाच्या क्षेत्रामुळे पुढील दोन ते तीन दिवस महाराष्ट्रात सर्वत्र मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. तर मुंबई, ठाणे, पालघरला उद्या पावसाचा रेड अलर्ट देण्यात आला आहे. ६ जुलैनंतर पावसाचा जोर काहीसा कमी होण्याचा अंदाज आहे.

मुंबईच्या पश्चिम उपनगरांतील अंधेरी, जोगेश्वरी, गोरेगाव, मालाड, कांदिवली, बोरिवली, दहिसर, विलेपार्ले, सांताक्रूझ आणि वांद्रे परिसरात आज मुसळधार पाऊस झाला. हवामान विभागाची वेबसाईट तांत्रिक बिघाडामुळे काही काळ बंद पडल्याने नागरिकांना हवामानविषयक अलर्ट जाणून घेण्यात अडचणी आल्या. सीएसएमटी येथील शासकीय दंत महाविद्यालयाच्या तळघरात » पान ७ वर

## उद्धव ठाकरेंना आणखी एक धक्का महिला नेत्या शुभांगी पाटील शिंदेसेनेत

■ मुंबई

**गेल्या** काही दिवसांत नेते साथ सोडून जात असल्याने धक्क्यावर धक्के सहन करत असलेल्या उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेला आणखी एक धक्का बसला आहे. उत्तर महाराष्ट्रातील शिवसेना उबाठाच्या बड्या नेत्या शुभांगी पाटील यांनी अखेर आज आपण शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश करण्याचे जाहीर केले.

मागील काही दिवसांपासून शुभांगी पाटील शिंदेंच्या शिवसेनेच्या वाटेवर आहेत, अशी माध्यमांमध्ये चर्चा सुरू होती. मात्र शुभांगी पाटील वारंवार त्या वृत्ताचा इन्कार करत होत्या. अगदी काल माध्यमांशी संवाद साधतानाही त्यांनी उबाठाला रामराम करणार असल्याच्या वृत्ताचे खंडन केले होते.

मी शिवसेना उबाठाची उत्तर महाराष्ट्र महिला संपर्कप्रमुख आहे. माझ्यावर पाच जिल्ह्यांची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. मी शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश असे तुमच्याकडूनच ऐकते आहे. मी स्वतः असे काही बोललेले नाही, असे काल शुभांगी पाटील म्हणाल्या होत्या. मात्र आज आपल्या शेकडो समर्थकांना सोबत घेऊन धुळ्याहून मुंबईकडे निघाल्यानंतर माध्यमांशी बोलताना त्यांनी आपण शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश करत असल्याची माहिती दिली.

## वांगचुक यांच्या समर्थनार्थ देशभर उपोषण करा! 'कॉकरोच'चे आवाहन

**नीट परीक्षा व्यवस्थेतील गैरप्रकार, पेपरफुटी आणि शिक्षण व्यवस्थेतील सुधारणांच्या मागण्यांसाठी जंतर-मंतर येथे सुरू असलेल्या आंदोलनात सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक हेही सहभागी झाले असून, गेले सहा दिवस त्यांचे उपोषण सुरू आहे. त्यांच्या खालावत चाललेल्या प्रकृतीच्या पार्श्वभूमीवर कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजित दीपके याने देशभरातील नागरिकांना वांगचुक यांच्या समर्थनार्थ एक दिवसाचे उपोषण करून त्यांना नैतिक पाठिंबा देण्याचे आवाहन केले. उपोषणात सहभागी होणाऱ्यांनी आपले व्हिडिओ पोस्ट करण्यास त्यांनी सांगितले.**

■ नवी दिल्ली

**अभिजित** दीपके याने सांगितले की, आज आमची संपूर्ण टीम सोनम



वांगचुक यांच्या समर्थनार्थ एक दिवसाचे उपोषण करत आहे. त्यांची प्रकृती दिवसेंदिवस खालावत आहे. अशावेळी आपल्या सर्वांच्या पाठिंब्याची त्यांना गरज आहे. जे नागरिक उपोषणात सहभागी होतील त्यांनी त्याचा व्हिडिओ पोस्ट करावा. हे सर्व व्हिडिओ आम्ही सोनम वांगचुक यांना दाखवणार आहोत, जेणेकरून त्यांना देशभरातून मिळणाऱ्या पाठिंब्याची जाणीव होईल. कॉकरोच जनता पार्टीने 'एक्स'वर वांगचुक यांचा फोटो पोस्ट करत त्यांच्या प्रकृतीबाबत चिंता व्यक्त केली आहे.

## निलंगा तालुक्यात ७ दिवसांत चार शेतकऱ्यांची आत्महत्या

■ लातूर

**कर्जाचा** वाढता बोजा, वाढती महागाई, सावकारीचा तगादा आणि पावसाअभावी निर्माण झालेली आर्थिक कोंडी यामुळे लातूर जिल्ह्यातील निलंगा तालुक्यात सात दिवसांच्या कालावधीत चार शेतकऱ्यांनी आत्महत्या केली आहे. यापैकी एका शेतकऱ्याने तर कृषिदिनी १ जुलैलाच जीवन संपविल्याने हळहळ व्यक्त केली जात आहे.

निलंगा शहरातील गांधीनगर भागातील मधुकर तुकाराम पाटणकर (५३) या अल्पभूधारक शेतकऱ्याने कृषिदिनी घरातील पंख्याला गळफास घेऊन आत्महत्या केली. बँक आणि खासगी सावकारांनी कर्जवसुलीसाठी लावलेल्या तगाद्यामुळे ते मानसिक तणावाखाली होते. त्यांच्या खिशात सापडलेल्या चिठ्ठीत, कर्जाला कंटाळलो असून, पेरणीसाठी बी-बियाणे खरेदी करण्यासाठीही पैसे नसल्याने आत्महत्या करत आहे, असे लिहिले होते. याच तालुक्यातील जामगा येथील पंडित रामा पवार (४८) यांनी ३० जून रोजी सकाळी शेतातील झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केली. त्याच दिवशी » पान ७ वर



नवाकाळ
Email- contact@navakal.in | www.navakal.in | /navakalofficial

# छोट्या जाहिराती

**संपर्क करा**
**८४२२८१७४४५/८१०८११६४२३**

## पाहिजेत

मावशी, वॉर्डबॉय, कुक, नर्स, पेशंटकेअर, (Male+ Female) पाहिजेत (राहणेखाणे+ पगार) वीकेअर होम (महिला आश्रम) ठाणे **9136404828** {NC261061}

लोअरपरेल/ चिंचपोकळी येथे गोडाऊनमध्ये कामासाठी. मुले (पगार १२ ते १४०००) पाहिजेत. संपर्कः **9320064643** किंवा **8080084843** वर Hi पाठवा. {NC261107}

बोरीवलीत नामांकित कोचिंग क्लासेसला- योगीनगर आणि गोराई ब्रॅन्चकरीता (झाडु-पोता-सफाई) तसेच किरकोळ कामासाठी मुलगा पाहिजेत. (वय २० ते ४० पर्यंत) संपर्कः **9223369408** (स्कुटर चालवण्याचे ज्ञान आवश्यक) {NC261092}

नोकरीची सुवर्ण संधी सुरक्षारक्षक कंपनीला डोंबिवली, मुंबई व नवी मुंबईकरिता अनुभवी फिल्ड ऑफीसर व सुरक्षारक्षक पाहिजेत. संपर्कः **9320131178** {NC261087}

गोरेगाव येथे टूरिस्ट अनुभवी ड्राईवर पाहिजेत. सम्पर्क- **7738052900** {NC260973}

माहिम पश्चिम स्टेशनजवळ १ वर्ष अनुभवी एसी टेक्निशियन पाहिजेत. संपर्क **9004782942.** {NC261076}

बाइंडिंगसाठी कारागीर आणि हेल्पर मुले आणि मुली पाहिजे कटींग मशीन ऑपरेटर पाहिजे भिवंडीसाठी हवे आहेत कैलाश गुप्ता- **7977660618** {NC261124}

ऑफिस असिस्टंट पाहिजे राहण्याची आणि जेवण्याची सोय केली जाईल फोन **8421670520** {NC261106}

## पाहिजेत

भांडुपमध्ये तिरुपती कुरीयरसाठी डिलीव्हरी बॉयज आणि ऑफिससाठी मुलगी पाहिजे. **-08320458944.** {NC261129}

ड्रायव्हर्स पाहिजेत. अनुभवी, टी आर लाईसेंस आवश्यक. पगार 18000 ते 21000. संपर्कः **9920925129** {NC261132}

इमिटेशन कामासाठी मुले/मुली पाहिजेत. ''कल्प ज्वेलर्स'', युनिट-१०२, ऑम शिवम् सोसायटी, भरुचा रोड, सीलेक्शन बुक सेन्टरवर, मराठा कॉलनी, दहीसर (इस्ट). फोन- **9870041713** {NC261072}

ऑफसेट प्रिंटर पाहिजे (हाइडेलबर्ग २-कलर/ 28x40/ सीडी, सीपी ट्रॉनिक मशीन), स्थानः कांदिवली **+917506719548** {NC261054}

पाहिजेत टर्नर, फिटर कम वेल्डर डायमेकर भेटाः- ए-४६ गिरीराज इंडस्ट्रीअल इस्टेट, महाकाली रोड, अंधेरी (पुर्व) मुंबई ४०००९३ मो. **9867145257** {NC261085}

पाहिजेत, ऑफसेट प्रिंटर, फिडरमन, बॉयलर, फोनः **9822067665** उल्हासनगर, कल्याण {NC261086}

तात्काळ भरती - सिक्युरिटी गार्ड, सिक्युरिटी, सुपरवायझर, हाऊसकीपिंग, स्टाफ पाहिजे., दादर, सांताक्रुज, कुर्ला, सायन विभागातील प्राधान्य. संपर्कः **9967322402/ 8468860714/ 9820945797** {NC261078}

दादर पश्चिम- 15-20 वर्षे अनुभवी, निर्व्यसनी, ड्रायव्हर पाहिजेत. वयोमर्यादाः ४५. **9867220029/ 8080898859** {NC261082}

## पाहिजेत

कारीगर पाहिजे- ऑफसेट फीडर, बाईंडर, फॉइलिंग, लॅमिनेशन, कोरुगेशन ऑपरेटर, Jr./Sr. प्रोडक्शन सुपर्व्हिसर, प्री-प्रेस ऑपरेटर, कांदिवली बॉक्स कंपनी **+917506719548** {NC260943}

सिनिअर के.जी. विद्यार्थ्यासाठी शिकवण्याकरिता पदवीधर/ बारावी/ डी.एड. मुलगी किंवा लेडीज यांनी संपर्क साधावा सौ. मंगल भागवत वाकचौरे बि.नं.- 151/ 5074 नेहरूनगर कुर्ला (पूर्व), मुंबई 24 मोबाईलः **9082628761** {NC261133}

ठाणेयेथे बॅक ऑफिससाठी महिला उमेदवार हवी. बारावी/पदवीधर. बेसिक कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक. पगार (10,000- 13,000) संपर्क- **9769108450/ 8369564939** {NC261136}

प्रिंटिंग प्रेस बाइंडिंग डिपार्टमेंटसाठी बाइंडर आणि हेल्पर पाहिजेत. B-205, श्रेयस इंडस्ट्रियल इस्टेट, जय कोच, गोरेगाव (ईस्ट) **9664073035** {NC261002}

लोन रिकवरी करण्यासाठी ठाणेयेथे मुले, मुली, स्त्री, पुरुष पाहिजेत. **9326370962** {NC261084}

मुंबईमधील नामांकित कॉन्ट्रॅक्टरला फक्त मुंबईतील साईट करताच. इलेक्ट्रिशन, वायरमन व हेल्पर त्वरित पाहिजेत. पगार व गाडी भाडे दिले जाईल. संपर्क - **9819178977** {NC261075}

सोल्डरींगच्या डिप्लोमा होल्डर सुपरवाईझर टेक्निशियन स्टाफकडून काम घेणे सर्कीट टेस्टींग आणि फोल्ट फाईडींगचा अनुभवी माणुस पाहिजे अंधेरी (पुर्व) मेहुल- **9821367555** {NC261070}

बोरीवली (पूर्व) इमीटेशन कामासाठी मुली पाहिजेत (दिवसाचे 425/-)+ ट्रावेलींग. **8369776798.** {NC261050}

घाटकोपर (असल्फा) प्रिंटिंग प्रेसमध्ये ४ कलर ऑफसेट मशीनसाठी बॉयलर आणि फिडरमेन पाहिजेत. संपर्क वेळ 11.00 ते 7.00 फोन- **9819996770/ 9930861233** {NC261101}

कल्याण (कोणगाव) येथील प्रिंटिंग प्रेसमध्ये आवश्यकता आहे. स्क्रीन प्रिंटिंग ऑपरेटर, लेमिनेशन मशीन ऑपरेटर, ऑफसेट मशीन ऑपरेटर (SM-74), हेल्पर, फ्रेशर आणि पॅकींग स्टाफ. कल्याण स्टेशनवरून पिकअप आणि ड्रॉप उपलब्ध आहे. संपर्क- **8652636907/ 9821434502** {NC261098}

## पाहिजेत

वेस्टर्न/सेन्ट्रल लाईनसाठी हाऊसकीपिंग स्टाफ (मेल/ फिमेल) पाहिजेत. वेतन- 14,000- 25,000. Sixth Sense Commercial Pvt. Ltd. संपर्कः **9137918527/ 9136711601** {NC261112}

दादर पश्चिम येथे पार्ट टाईम ड्रायव्हर पाहिजे. संध्याकाळी 6 ते 8 किंवा सकाळी 10 ते 12 संपर्क- **9892458244.** {NC261120}

कांदिवली वेस्ट ईमिटेशन ज्वेलरी पॅकिंग, स्टीकिंग स्टोन करिता लेडीज पाहिजेत. पगार 350 ते 450 प्रतिदिन. **-9619148488.** {NC261137}

Office Admin- Data Entry Telecalling Receptionist Female/ Male पाहिजेत सांताक्रुझ वाकोला- **7710030660** {NC261141}

कंपनीमध्ये भरती टिशू पेपर पॅकिंगसाठी स्टाफ पाहिजे. 19520/- - 24820/- **8169166152** {NC261142}

चारकोप कांदिवली वेस्ट, लेडीज ऑफिस असिस्टन्ट, ग्रॅज्युएट, कॉम्प्युटर Tally, Excel, 30 ते 40 वर्ष वयाची, बोरीवली ते मालाड राहणार पाहिजेत. संपर्क: **8657761101.** {NC261143}

बोरीवली (वेस्ट) स्टेशनजवळ ऑप्टीकल शोरूममध्ये प्युन पाहिजेत. **7738642555** {NC261144}

प्युन पाहिजे, बायोडेटासह भेटा- मोनार्क फार्माकॅम, ४१२ जेमस्टार कॉम्प्लेक्स, रामचंद्रलेन एक्स्टेन्शन मालाड (पश्चिम) **022-49771011-12-13** {NC261145}

वसई/ मालाडमध्ये हॅन्डप्रेसच्या कामासाठी मुले/ मुली पाहिजेत प. 18000/- : **9833730360** {NC261147}

सरकारी आणि इतर विभागांमध्ये लायझनिंग कामासाठी आउटडोअर एक्झिक्युटिव्ह. मराठी आणि इंग्रजी ड्राफ्टिंग, टायपिंग आवश्यक. तुमचा CV / रेझ्युमे या नंबरवर WhatsApp कराः **+91 8828805888** {NC261148}

विलेपार्ले पूर्व येथे भांडी झाडूपोता कपडे व इतर कामासाठी 9 ते 6, 40 ते 50 वयाची बाई पाहिजे पगार 19000+ 500 प्रवासभत्ता संपर्क **9820149975** {NC261146}

केस गळतीवर आयुर्वेदिक औषध विक्रीकरीता अनुभवी बिनअनुभवी मुले/मुली/ महिला पाहिजेत. महिना 10000/20000. **7620135522** {NC261155}

## पाहिजेत

अनुभवी पेस्टकंट्रोल ऑपरेटर्स त्वरित पाहिजेत. पगार १७०००+ बॉम्बे पेस्टीसाईडसः **9869110510/ 9820875253** {NC261149}

२ कलर प्रिंटर, फिडरमन, कटींग बाईंडर, पंचिंग ऑपरेटर पाहिजेत. लोअर परेल **9833552423** {NC261150}

इमीटेशन कामासाठी मुली, आकर्षक पगार. स्टेशनजवळ, वसई(ईस्ट). **9773156336, 9664258154.** {NC261138}

अंधेरी पूर्वमध्ये प्रिंटिंग प्रेसकरीता हेडलबर्गसाठी फीडरमॅन, प्रिंटर, बॉयलर आणि हेल्पर पाहिजेत. सकाळी (१० ते ८) **9833287665** {NC261151}

वेस्टर्न लाईनवर घड्याळ आणि बॅगच्या दुकानांसाठी सेल्समन (१८ ते ३० वर्षे), बायोडेटासोबत प्रत्यक्ष भेटा. जयेश गाला वर्ल्ड टाईम, पोद्दार बिल्डिंग, एस.वी.रोड आणि टिळक रोडचा कॉर्नर, आशा पारेख हॉस्पिटलसमोर, सांताक्रुझ (प). वेळः सकाळी ११ ते १. {NC261152}

मेटरनिटी हॉस्पिटलमध्ये काम करणाऱ्या नर्सेसना सुवर्णसंधी संपर्क करा. - **8452090784** {NC261153}

सरकारमान्य कंपनीत निवृत्त अधिकारी/ टीचर/ गृहिणी पाहिजेत. (पगार+ पीएफ). **9670731420** {NC261154}

## शैक्षणिक

पाटील अँड शेख अकॅडमी SSC, HSC, BA, B.COM., B.SC उत्तीर्ण आणि अनुत्तीर्ण गृहींणीसाठी, मुलींसाठी, मुलांसाठी सुवर्णसंधी आमच्या टेक्निकल कोर्ससाठी प्रवेश घ्या, उत्तम पगार मिळवून यशस्वी व्हा. सिव्हिल/ आर्किटेक्टरल ड्राफ्टसमनची आणि मेकॅनिकल ड्राफ्टसमनची नविन बॅच १५ जुलै २०२६ पासून सकाळी आणि संध्याकाळी सुरू होणार आहे. प्रवेश सुरू झाले- **9757312624/ 9757099923** {NC261083}

प्रोफेशनल सिव्हिल आर्किटेक्चर ड्राफ्टसमन आणि मेकॅनिकल ड्राफ्टसमन कोर्सेस. शिवाय दहावी, बारावी टेक्निकल फेलसाठी टेक्निकल ड्रॉईंग आणि टेक्निकल डिप्लोमा फेलसाठी इंजिनियरिंग ड्रॉईंग. गुप्ते अकॅडमी, दादर. **7506465793/ 9757312624** चौकशी सकाळी ८.३० ते दुपारी ३.३० {NC261140}

## शैक्षणिक

हमखास पासाची गॅरंटी खर्डीकर क्लासेस. ७वी नापास? डायरेक्ट १०वी. ११वी नापास? डायरेक्ट १२वी. डोंबिवलीः **9820627580 / 9820904646** {NC261156}

## Situation Vacant

Reqd Tally operator with accounting knowledge at our Malad West office. Call: **9820080461** {NC261022}

**JOB VACANCY**
**AISHABAI COLLEGE OF EDUCATION**
Applications are invited for the following posts for the A.Y. 2026-27:

| Name of Post | Subjects/ Qualifications | No.of Posts |
|---|---|---|
| Assistant Professor | (A) Perspective in Education | 2 |
| | (B) Pedagogy Subjects & Curriculum Course: Science/ Maths / Social Sciences/ English / Commerce / Economics | 6 |
| Librarian | Masters in Library Science | 1 |

Qualification / Experience: As per NCTE & SNDT WU Norms Eligible candidates may send their resume, along with copies of their certificates and degree.
145.aishabaicollege@aishabai.ac.in
This is a University approved advertisement for A.Y. 2026-27 (Ref.: Affi.Gen-1/Aishabai/2026-27/465 dt. June 9, 2026).

REQUIRED BACK OFFICE STAFF HAVING KNOWLEDGE OF MS OFFICE. CALL: **9870550891/ 9821322833.** {NC261028}

Urgently Reqd Male/ Female Graphic Designer & Artist Full Exp of CoralDraw & Photoshop. whatsup number **8433875801** {NC261126}

## नर्सिंग कोर्स

100% नोकरी देणारे गव्हरमेंट कोर्सेस GNM/ Diploma NURSING, DMLT, PHYSIOTHERAPY, OT, ICU, XRAY, DIALYSIS ओम इन्स्टिट्यूट, मालाड, मुंबई- **8080502190 / 8850530054** {NC260471}

## व्यवसायविषयक

महिला/ मुलींना फक्त ६ महिन्यात 10,00,000/- कमवून देणारे जीवन विमा मार्गदर्शन- **9373956687/ 9326367944** {NC261097}

स्वतःचा लघुउद्योग सुरू करून दिवसा 3000/- कमवा अनिरुद्धा दादर- **9076403434/ 8652643434** {NC261089}

## विवाहविषयक

लग्नाकरिता गरीब मुला मुलींची मोफत नावे नोंदणी. लावण्या- **7045943167** कविता- **7977883961** {NC261121}

## वधु वर मेळावा

वधु वर मेळावा, शिबीर सर्व जाती, WEB, मुलींना. FREE- **9869868620** {NC261139}

### वाचकांना सूचना

दैनिक 'नवाकाळ' वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींच्या सत्यतेबाबत दैनिक 'नवाकाळ'ची कोणतीही जबाबदारी नाही. वाचकांनी स्वतः पडताळणी करून स्वतःच्या जबाबदारीने निर्णय घ्यायचा आहे, याची नोंद घ्यावी.
**- मॅनेजर, 'नवाकाळ'**

# घोडबंदर मार्गावर संरक्षक कठडा तोडून ट्रक उड्डाणपुलावर लटकला

■ ठाणे



**ठाण्यातील** घोडबंदर मार्गावरील कासारवडवली उड्डाणपुलावर आज पहाटे ५ वाजताच्या सुमारास विचित्र अपघात झाला. पुण्याहून डहाणूकडे जाणारा ट्रक उड्डाणपुलावरील संरक्षक कठड्यावर आदळून कठड्याचा काही भाग तुटला. त्यामुळे ट्रकचा पुढील भाग उड्डाणपुलाच्या बाहेर लटकला.

पुण्याहून डहाणूकडे १२ टन गूळ घेऊन जाणारा ट्रक कासारवडवली उड्डाणपुलावरून जात असताना थेट संरक्षक कठड्यावर आदळला. या धडकेचा जोर इतका होता की कठड्याचा काही भाग तुटून ट्रकचा पुढील भाग उड्डाणपुलाच्या बाहेर लटकला. या घटनेची माहिती मिळताच पोलीस, वाहतूक पोलीस आणि ठाणे महापालिकेच्या आपत्कालीन पथक घटनास्थळी पोहचले. क्रेनच्या सहाय्याने काही तासांच्या प्रयत्नांनंतर सुमारे ११ वाजताच्या सुमारास ट्रक सुरक्षितपणे बाजूला करण्यात आला.

# गोव्यात लुथरा बंधूंसह ५ जणांविरुद्ध २३०६ पानी आरोपपत्र दाखल

■ पणजी

**म्हापसा** पोलिसांनी बर्च नाईट क्लब परवाना फसवणूक प्रकरणात लुथरा बंधूंसह पाच जणांविरुद्ध २,३०६ पानांचे आरोपपत्र नुकतेच न्यायालयात दाखल केले. या प्रकरणातील आरोपींवर बनावट कागदपत्रे वापरून सरकारी अधिकाऱ्यांची फसवणूक केल्याचा आरोप ठेवण्यात आला आहे.

आरोपपत्र दाखल झालेल्यांमध्ये बीईंग जीएस हॉस्पिटॅलिटीचे संचालक सौरभ लुथरा, गौरव लुथरा, अजय गुप्ता, उत्पादन शुल्क विभागाचे गौरेश गवस आणि दिनेश खेडा यांचा समावेश आहे. नाईट क्लबसाठी उत्पादन शुल्क परवाना मिळवण्यासाठी आरोग्य विभागाचे बनावट ना-हरकत प्रमाणपत्र तयार करण्यात आले होते. या प्रकरणात सुमारे ५० जणांना

### ५० साक्षीदारांच्या साक्षी नोंदवल्या

सरकारी साक्षीदार म्हणून नामनिर्देशित करण्यात आले आहे. हे नाईट क्लब आग प्रकरण २६ डिसेंबर २०२५ रोजी घडले होते. त्यामध्ये २५ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला होता. या प्रकरणात सौरभ लुथरा, गौरव लुथरा, अजय गुप्ता यांना अटक केली होती. तर गौरेश गवस आणि दिनेश खेडा यांना अटकपूर्व जामीन मंजूर करण्यात आला होता.

# खोलसापाडा योजनेच्या निविदा प्रसिद्ध वसईला ६८ दशलक्ष लीटर अतिरिक्त पाणी

■ वसई

**वसई-विरार** शहराच्या भविष्यातील पाण्याची गरज लक्षात घेऊन प्रस्तावित करण्यात आलेल्या बहुचर्चित खोलसापाडा धरण पाणीपुरवठा योजनेच्या कामासाठी महापालिकेने निविदा प्रसिद्ध केली आहे. या योजनेतून शहराला दररोज ६८ दशलक्ष लीटर अतिरिक्त पाणी उपलब्ध होणार आहे. सध्या वसई-विरार शहराला सूर्या धरण टप्पा १ व ३ मधून एकूण २०० दशलक्ष लीटर्स, एमएमआरडीएतर्फे सूर्या पाणी प्रकल्पातून अतिरिक्त १७० दशलक्ष लीटर्स, उसगाव धरणातून २० आणि पेल्हार धरणातून १० दशलक्ष लीटर्स असा एकूण ४०० दशलक्ष लीटर्स पाणी पुरवठा केला जातो. वसई-विरार शहराच्या भविष्यातील पाण्याची गरज लक्षात घेऊन खोलसापाडा पाणी पुरवठा योजना प्रस्तावित करण्यात आली आहेत.

या योजनेतील बंधाऱ्याचे सुमारे ९० टक्के काम पूर्ण झाले आहे. आता धरणातून शहरापर्यंत पाणी आणण्यासाठी जलवाहिनी उभारण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. हा प्रकल्प 'शहरी आव्हान निधी' (अर्बन चॅलेंज फंड) अंतर्गत शासनाच्या सहकार्याने राबविण्यात येणार असून वित्तपुरवठ्यासाठी महापालिकेने इच्छुक गुंतवणूकदार व वित्तीय संस्थांकडून ईओआय मागवले आहेत.

# २.७९ लाख विद्यार्थी 'नीट' फेरपरीक्षेला आलेच नाहीत

■ नवी दिल्ली

**पेपरफुटीमुळे** घेण्यात आलेल्या नीट-यूजी २०२६ फेरपरीक्षेबद्दल आणखी एक धक्कादायक बाब समोर आली आहे. २१ जून रोजी घेण्यात आलेल्या या नीट फेरपरीक्षेला नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांपैकी तब्बल २ लाख ७९ हजार विद्यार्थी प्रत्यक्ष परीक्षा देण्यासाठी परीक्षा केंद्रांवर फिरकलेच नाहीत. गेल्या ३ मे रोजी घेण्यात आलेल्या मूळ परीक्षेत पेपरफुटी झाल्यामुळे ती परीक्षा रद्द करण्यात आली होती. त्यावरून देशभरात मोठा गदारोळ माजला होता. त्यानंतर ही परीक्षा घेणाऱ्या राष्ट्रीय परीक्षा संस्थेने (एनटीए) २१ जून रोजी फेरपरीक्षा घेतली. या फेरपरीक्षेला काही विद्यार्थी केंद्रांवर उशिरा पोहोचल्याने परीक्षेला मुकले.

# ९ पोलिसांना जन्मठेप शिक्षा वाशिम न्यायालयाचा निकाल

■ वाशिम

**विदर्भातील** जिल्हा सत्र न्यायालयाने एका प्रकरणात ऐतिहासिक निकाल दिला आहे. २०११ साली कोठडीत असताना पोलिसांच्या मारहाणीत एकाचा मृत्यू झाला होता. याच प्रकरणात ९ पोलिसांना न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली.

९ मे २०११ रोजी रिसोड पोलीस स्टेशनचे तत्कालीन ठाणेदार महादेव माणिक धांडे यांच्यासह ८ पोलीस कर्मचाऱ्यांनी हिंगोलीतील वाढोणा येथील पारधी वस्तीवर धाड टाकली होती. या धाडीमध्ये बेग्या पवार या तरुणाला एका चोरीच्या गुन्ह्यात संशयित म्हणून अटक केली होती. गुन्हा कबूल करण्यासाठी पोलिसांनी त्याला बेदम मारहाण केली होती. या मारहाणीत १९ मे रोजी बेग्या पवारचा मृत्यू झाला होता. या प्रकरणात सीआयडीने ३४ दिवस तपास करून खुनाच्या गुन्ह्यासह स्पेशल ॲट्रॉसिटीचाही गुन्हा पोलिसांवर दाखल केला होता. परंतु बेग्यावर यापूर्वी कोणताही गुन्हा दाखल नव्हता. फक्त तो पारधी असल्याच्या कारणाने पोलिसांनी त्याला अडकवण्याचा प्रयत्न केला होता. या प्रकरणात न्यायालयाने काल रिसोड पोलीस स्टेशनचे तत्कालीन ठाणेदार महादेव धांडे, यांच्यासह पोलीस कर्मचारी मदन पवार, शिवाजी खिल्लारी, पंजाब पाटकर, रमेश पवार, प्रकाश तारम, नागोराव खांडके, अशोक वैद्य, वसंत जाधव या ९ जणांना जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे.

# आजचे राशी भविष्य

**शनिवार ता. ४ जुलै २०२६**
ज्योतिष पंडीत अर्चना तारु

| राशी | भविष्य |
|---|---|
| मेष | दिवसाची सुरुवात उत्साहात होईल. दुपारपूर्वी महत्त्वाची कामे आटवून घ्यावीत. आर्थिक स्थित्यंतरे जाणवतील. |
| वृषभ | नोकरीमध्ये वर्चस्व प्रस्थापित कराल. विरोधकांवर मात करण्यात यश मिळेल. जोडीदाराशी मतभेद टाळावेत. |
| मिथुन | एखाद्या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हाल. आर्थिक लाभाचे प्रमाण चांगले राहील. सहकाऱ्यांशी जुळवून घ्यावे लागेल. |
| कर्क | आपण घेतलेल्या कामांमध्ये अचानक बदल होऊ शकतात. कोणतेही निर्णय विचारपूर्वक घ्यावेत. खर्चाचे प्रमाण वाढेल. आरोग्य सांभाळा. |
| सिंह | दुपारनंतर अचानक प्रवास घडू शकतो. सरकारी कामांमध्ये अधिक वेळ व पैसे खर्च होतील. व्यवसायात साधारण स्थिती राहील. |
| कन्या | विविध प्रकारच्या माध्यमातून आर्थिक लाभ होतील. स्पर्धापरीक्षा देणाऱ्यांसाठी अनुकूलता. नोकरीनिमित्त प्रवास घडेल. |
| तूळ | दानधर्मातून आनंद मिळेल. ज्येष्ठांचे मार्गदर्शन मिळेल. प्रवासात सतर्कता बाळगावी. |
| वृश्चिक | नोकरीमध्ये कामाच्या स्वरूपात बदल होऊ शकतो. सहकाऱ्यांशी जुळवून घ्यावे लागेल. कुटुंबात वाद टाळा. |
| धनु | एखाद्या कामात सतत व्यस्त राहाल. नोकरीत नवीन संधीची वाट पहावी लागेल. जोडीदाराकडून आर्थिक सहाय्य मिळेल . |
| मकर | वडिलोपार्जित कामे लागतील. उत्साहाच्या भरात कोणालाही शब्द देऊ नका. चमचमीत भोजनाचा आस्वाद घ्याल. |
| कुंभ | अति महत्त्वाकांक्षा त्रासदायक ठरू शकतात. भावंडांशी पटवून घ्यावे लागेल. नोकरीनिमित्त दूरचे प्रवास घडू शकतात. |
| मीन | रागावर व बोलण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल. प्रवासात चीजवस्तू सांभाळा. आर्थिक व्यवहार पुढे ढकलावेत. |

# शुभ राशी ता. ४/७/२०२६

| | | |
|---|---|---|
| ८ | ० | ५ |
| ८१ | ०१ | ५१ |
| ८६ | ०६ | ५६ |
| ५५७ | ५६९ | २३० |
| ४५९ | २९९ | ७८० |

# लॉटरी

## महाराष्ट्र वैभवलक्ष्मी विकली लॉटरी

सोडत दर शुक्रवारी | तिकीट किंमत रु. 50/- | सोडत क्र. 27 | सोडत दिनांक 03/07/2026

| बक्षिस | क्रमांक | विक्रेते |
|---|---|---|
| पहिले सामाईक बक्षिस रु. 7 लाख | VL-02 : 7979 | श्री सिद्धि समर्थ एन्टरप्रायझेस, दादर - मुंबई प्रिन्स एजन्सी - मुंबई यांचा मार्फत |
| प्रोत्साहनपर बक्षिस रु. 2500/- (पहिल्या बक्षीसाची विजेता मालिका सोडून इतर सर्व मालिकांसाठी) | 7979 | चॅम्पियन ऑनलाईन - माझगाव; महावीर लॉटरी सेंटर - कोल्हापूर; श्री गणेश एन्टरप्रायझेस - दादर, मुंबई |

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | क्रमांक | विक्रेते |
|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 7000/- | 1069 | अंबिका एजन्सी - दादर, मुंबई; कोमल एजन्सी - औरंगाबाद |
| तिसरे बक्षिस रु. 5000/- | 2075 | डायमंड कॉर्पोरेशन - बोरीवली; किशोर लॉटरी सेंटर, सांगली; श्री गणेश एन्टरप्रायझेस - दादर, मुंबई |

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| चौथे बक्षिस रु. 2000/- | 1249 | 1619 | 2302 | 2628 | 4714 | 5248 | 5550 | 5675 | 6848 | 7538 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 1117 | 1753 | 2598 | 3667 | 3725 | 3834 | 5858 | 6119 | 7751 | 7973 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 1021 | 2985 | 3333 | 3798 | 4120 | 4366 | 4460 | 5935 | 7502 | 7746 |

सातवे बक्षीस रु. 110/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1008 | 1260 | 1861 | 2245 | 2824 | 3292 | 3843 | 4411 | 4889 | 5453 | 5900 | 6422 | 7004 | 7531 |
| 1028 | 1284 | 1889 | 2246 | 2828 | 3293 | 3858 | 4429 | 4915 | 5495 | 5912 | 6466 | 7007 | 7533 |
| 1040 | 1287 | 1910 | 2282 | 2832 | 3315 | 3886 | 4435 | 4948 | 5502 | 5935 | 6486 | 7018 | 7567 |
| 1043 | 1293 | 1913 | 2284 | 2866 | 3345 | 3893 | 4445 | 5006 | 5503 | 5942 | 6499 | 7046 | 7592 |
| 1065 | 1358 | 1924 | 2292 | 2871 | 3347 | 3931 | 4447 | 5009 | 5542 | 5950 | 6557 | 7058 | 7627 |
| 1081 | 1371 | 1932 | 2300 | 2872 | 3352 | 3953 | 4463 | 5015 | 5549 | 6011 | 6586 | 7067 | 7670 |
| 1086 | 1413 | 1949 | 2302 | 2882 | 3354 | 4018 | 4466 | 5049 | 5554 | 6057 | 6618 | 7086 | 7725 |
| 1091 | 1440 | 1961 | 2361 | 2902 | 3394 | 4032 | 4468 | 5052 | 5556 | 6060 | 6635 | 7097 | 7729 |
| 1100 | 1446 | 1965 | 2362 | 2932 | 3451 | 4043 | 4478 | 5079 | 5567 | 6065 | 6638 | 7104 | 7733 |
| 1110 | 1452 | 1971 | 2365 | 2967 | 3469 | 4045 | 4493 | 5105 | 5588 | 6069 | 6647 | 7141 | 7742 |
| 1123 | 1460 | 2015 | 2414 | 2970 | 3479 | 4046 | 4520 | 5134 | 5593 | 6081 | 6683 | 7171 | 7746 |
| 1134 | 1480 | 2020 | 2470 | 2992 | 3565 | 4068 | 4549 | 5154 | 5595 | 6137 | 6695 | 7172 | 7763 |
| 1135 | 1512 | 2062 | 2472 | 3010 | 3583 | 4082 | 4590 | 5161 | 5602 | 6189 | 6696 | 7200 | 7765 |
| 1141 | 1519 | 2069 | 2486 | 3011 | 3597 | 4099 | 4617 | 5175 | 5665 | 6208 | 6782 | 7211 | 7771 |
| 1151 | 1588 | 2102 | 2507 | 3031 | 3627 | 4107 | 4618 | 5216 | 5753 | 6213 | 6797 | 7264 | 7777 |
| 1158 | 1601 | 2134 | 2509 | 3034 | 3669 | 4111 | 4730 | 5249 | 5756 | 6225 | 6806 | 7286 | 7778 |
| 1167 | 1611 | 2142 | 2536 | 3069 | 3673 | 4189 | 4734 | 5251 | 5773 | 6234 | 6840 | 7295 | 7779 |
| 1173 | 1648 | 2162 | 2542 | 3083 | 3683 | 4195 | 4750 | 5309 | 5798 | 6246 | 6856 | 7297 | 7793 |
| 1181 | 1649 | 2188 | 2620 | 3141 | 3725 | 4198 | 4786 | 5335 | 5816 | 6288 | 6857 | 7342 | 7795 |
| 1183 | 1650 | 2195 | 2650 | 3153 | 3733 | 4248 | 4844 | 5358 | 5835 | 6296 | 6863 | 7388 | 7807 |
| 1201 | 1654 | 2218 | 2690 | 3193 | 3779 | 4284 | 4845 | 5393 | 5839 | 6303 | 6909 | 7424 | 7834 |
| 1223 | 1657 | 2226 | 2692 | 3200 | 3789 | 4328 | 4846 | 5394 | 5845 | 6317 | 6916 | 7430 | 7877 |
| 1237 | 1669 | 2228 | 2702 | 3238 | 3822 | 4343 | 4848 | 5409 | 5856 | 6351 | 6959 | 7448 | 7929 |
| 1238 | 1673 | 2229 | 2722 | 3242 | 3837 | 4370 | 4854 | 5415 | 5859 | 6379 | 6962 | 7470 | 7945 |
| 1250 | 1678 | 2231 | 2817 | 3247 | 3839 | 4398 | 4869 | 5452 | 5885 | 6397 | 6991 | 7474 | 7972 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## निकाल गणेशलक्ष्मी धन विकली लॉटरी

सोडत सायं. 5:00 वाजता
सोडत दर शुक्रवार • सोडत क्रमांक 27 • तिकिट किं. रु. 10/- • सोडत दिनांक 03/07/2026

| बक्षिस | क्रमांक |
|---|---|
| पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- | MG-09 : 3014 |

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | क्रमांक |
|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 7000/- | 9178 (₹ 7000 ची 5 बक्षिसे = 35,000/- जिंकले) किशोर लॉटरी सेंटर, सांगली |
| तिसरे बक्षिस रु. 5000/- | 5876 |
| चौथे बक्षिस रु. 2000/- | 3189 |

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 0446 | 0707 | 0863 | 3830 | 4679 | 4805 | 5398 | 6287 | 8689 | 8701 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 0956 | 1897 | 2266 | 2574 | 2623 | 2890 | 4733 | 5232 | 6538 | 9361 |

सातवे बक्षीस रु. 150/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1921 | 2750 | 3639 | 4720 | 5566 | 6646 | 7681 | 8380 | 8977 |
| | | 2008 | 2802 | 3695 | 4846 | 5583 | 6696 | 7702 | 8418 | 9048 |
| | | 2012 | 2872 | 3700 | 4866 | 5684 | 6764 | 7707 | 8472 | 9091 |
| 0047 | 0984 | 2047 | 3032 | 3765 | 5040 | 5747 | 6959 | 7712 | 8507 | 9112 |
| 0049 | 1066 | 2090 | 3063 | 3861 | 5057 | 5771 | 7176 | 7796 | 8584 | 9242 |
| 0060 | 1113 | 2205 | 3232 | 3885 | 5135 | 6040 | 7193 | 7813 | 8609 | 9380 |
| 0094 | 1115 | 2225 | 3311 | 3900 | 5185 | 6043 | 7205 | 7824 | 8666 | 9397 |
| 0239 | 1169 | 2257 | 3333 | 3975 | 5212 | 6092 | 7261 | 7828 | 8672 | 9495 |
| 0292 | 1370 | 2266 | 3334 | 4144 | 5250 | 6108 | 7380 | 7864 | 8757 | 9533 |
| 0307 | 1378 | 2288 | 3375 | 4240 | 5273 | 6227 | 7391 | 7915 | 8763 | 9690 |
| 0313 | 1442 | 2350 | 3381 | 4289 | 5290 | 6336 | 7407 | 7970 | 8783 | 9726 |
| 0410 | 1452 | 2420 | 3383 | 4347 | 5359 | 6366 | 7515 | 8083 | 8804 | 9791 |
| 0812 | 1491 | 2449 | 3403 | 4380 | 5365 | 6434 | 7522 | 8189 | 8868 | 9829 |
| 0891 | 1679 | 2556 | 3473 | 4447 | 5452 | 6445 | 7561 | 8240 | 8893 | 9871 |
| 0954 | 1846 | 2629 | 3553 | 4482 | 5479 | 6542 | 7575 | 8243 | 8895 | 9878 |
| 0956 | 1895 | 2691 | 3637 | 4518 | 5546 | 6582 | 7599 | 8368 | 8955 | 9917 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## निकाल महाराष्ट्र गजलक्ष्मी शुक्र विकली लॉटरी

महाराष्ट्र राज्य लॉटरी | सोडत संध्या. 4:45 वाजता
सोडत दर शुक्रवार • सोडत क्रमांक 27 • तिकिट किं. रु. 20/- • सोडत दिनांक 03/07/2026

| बक्षिस | क्रमांक |
|---|---|
| पहिले बक्षिस रु. 10,000/- | GL-03 : 4121 |

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES

| बक्षिस | क्रमांक |
|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 2230 |
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 4430 (₹ 2000 ची 5 बक्षिसे = 10,000/- जिंकले) श्री सिद्धि समर्थ एन्टरप्रायझेस, दादर - मुंबई |

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 1046 | 1343 | 1480 | 1584 | 3029 | 3036 | 3067 | 3947 | 4119 | 5966 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 1129 | 1441 | 1707 | 3287 | 4019 | 4088 | 4680 | 4960 | 5792 | 5862 |

सहावे बक्षीस रु. 250/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1005 | 1294 | 1988 | 2324 | 3069 | 3695 | 3984 | 4411 | 4995 | 5605 |
| 1010 | 1361 | 2003 | 2378 | 3214 | 3712 | 3993 | 4459 | 5075 | 5652 |
| 1021 | 1384 | 2092 | 2421 | 3227 | 3735 | 4043 | 4645 | 5352 | 5664 |
| 1061 | 1607 | 2126 | 2495 | 3316 | 3738 | 4048 | 4653 | 5378 | 5681 |
| 1081 | 1613 | 2202 | 2592 | 3346 | 3799 | 4101 | 4696 | 5394 | 5705 |
| 1101 | 1709 | 2225 | 2628 | 3395 | 3800 | 4188 | 4844 | 5459 | 5782 |
| 1106 | 1712 | 2259 | 2680 | 3570 | 3826 | 4197 | 4846 | 5505 | 5854 |
| 1131 | 1714 | 2268 | 2830 | 3617 | 3865 | 4209 | 4927 | 5528 | 5856 |
| 1142 | 1961 | 2276 | 2852 | 3673 | 3912 | 4248 | 4933 | 5549 | 5950 |
| 1192 | 1962 | 2299 | 2987 | 3690 | 3925 | 4404 | 4944 | 5596 | 5956 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## निकाल महाराष्ट्र सह्याद्री

महाराष्ट्र राज्य लॉटरी • राजलक्ष्मी विकली लॉटरी • | सोडत सायं. 4:30 वाजता
सोडत दर शुक्रवार • सोडत क्रमांक 27 • तिकिट किं. रु. 30/- • सोडत दिनांक 03/07/2026

| बक्षिस | क्रमांक |
|---|---|
| पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- | SR-03 : 1299 |

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | क्रमांक |
|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 2926 |

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 1004 | 1207 | 1466 | 2154 | 2794 | 3686 | 4840 | 5449 | 5875 | 5883 |
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 1762 | 1848 | 1869 | 2232 | 2735 | 3871 | 4036 | 4613 | 4710 | 5656 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 1031 | 1476 | 1594 | 2457 | 4689 | 5058 | 5175 | 5233 | 5696 | 5869 |

सहावे बक्षीस रु. 300/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1925 | 2709 | 3367 | 4046 | 4582 | 5576 |
| | | 1958 | 2776 | 3389 | 4098 | 4608 | 5590 |
| 1004 | 1394 | 2008 | 2792 | 3505 | 4124 | 4677 | 5651 |
| 1015 | 1521 | 2056 | 2886 | 3566 | 4129 | 4748 | 5685 |
| 1114 | 1537 | 2124 | 2895 | 3573 | 4159 | 4806 | 5735 |
| 1125 | 1617 | 2256 | 2921 | 3613 | 4197 | 4823 | 5756 |
| 1143 | 1696 | 2285 | 3019 | 3641 | 4234 | 4940 | 5761 |
| 1146 | 1764 | 2416 | 3038 | 3730 | 4263 | 5145 | 5766 |
| 1203 | 1785 | 2502 | 3137 | 3739 | 4349 | 5351 | 5785 |
| 1224 | 1791 | 2567 | 3215 | 3770 | 4397 | 5367 | 5788 |
| 1296 | 1808 | 2592 | 3321 | 3835 | 4411 | 5440 | 5831 |
| 1332 | 1810 | 2597 | 3331 | 3938 | 4467 | 5452 | 5934 |
| 1367 | 1855 | 2682 | 3359 | 4008 | 4536 | 5570 | 5957 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

# आषाढी वारीपूर्वी इंद्रायणी स्वच्छ करा
## नाना पटोलेंची सरकारकडे मागणी

■ मुंबई

**आषाढी** वारीच्या पार्श्वभूमीवर इंद्रायणी नदीतील वाढत्या प्रदूषणाचा गंभीर मुद्दा काँग्रेसचे आमदार नाना पटोले यांनी आज विधानसभेत उपस्थित केला. नमामि इंद्रायणी योजनेसाठी कोट्यवधी रुपयांची तरतूद करण्यात आली असतानाही नदीत मोठ्या प्रमाणावर रासायनिक सांडपाणी मिसळले जात असल्याने वारकऱ्यांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होण्याची भीती त्यांनी व्यक्त केली.आषाढी वारीपूर्वी इंद्रायणी स्वच्छ करा अशी मागणी त्यांनी सरकारकडे केली.

यावेळी नाना पटोले म्हणाले की, आषाढी वारीदरम्यान लाखो वारकरी परंपरेनुसार इंद्रायणी नदीत स्नान



करतात. नदीच्या पाण्याचे वाढते प्रदूषण लक्षात घेता वारकऱ्यांच्या आरोग्याचा प्रश्न अत्यंत गंभीर बनला आहे. नदीत मिसळणाऱ्या रासायनिक सांडपाण्यामुळे पाण्याची गुणवत्ता खालावली असून त्याचा थेट परिणाम भाविकांवर होऊ शकतो. औद्योगिक आस्थापना, एमआयडीसी क्षेत्रे तसेच काही गृहनिर्माण संस्थांकडून सांडपाण्याचे शुद्धीकरण न करता ते थेट नदीपात्रात सोडले जात आहे. वारकऱ्यांना स्वच्छ, सुरक्षित आणि प्रदूषणमुक्त पाणी उपलब्ध करून देण्यासाठी सरकारने स्पष्ट कृती आराखडा जाहीर करावा. आषाढी वारीपूर्वी इंद्रायणी स्वच्छ करावी आणि प्रदूषणास जबाबदार असलेल्या घटकांवर कठोर कारवाई करावी.

# मंत्री गैरहजर! विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांमध्ये गदारोळ

■ मुंबई

**राज्याच्या** पावसाळी अधिवेशनात आज मंत्र्यांच्या अनुपस्थितीवरून विधानसभा आणि विधान परिषद या दोन्ही सभागृहांत गदारोळ झाला. महत्त्वाच्या विषयांवर चर्चा सुरू असताना संबंधित खात्यांचे मंत्री उपस्थित नसल्याने विरोधकांसह सत्ताधारी पक्षातील आमदारांनीही नाराजी व्यक्त केली. यामुळे विधानसभेचे कामकाज दोन वेळा तहकूब करावे लागले, तर विधान परिषदेतही सरकारमधीलच मंत्री उदय सामंत यांनी याबाबत नाराजी व्यक्त केली.



आमदारांनी सभागृहात असा सवाल केला की, मुंबईत मुसळधार पाऊस असतानाही आमदार दोन-दोन तासांचा प्रवास करून वेळेत सभागृहात पोहोचले. मग मंत्री का आले नाहीत? मंत्र्यांनाच गांभीर्य नसेल, तर कामकाज कसे चालणार? वाढता गदारोळ लक्षात घेऊन तालिका अध्यक्षांनी सुरुवातीला पाच मिनिटांसाठी आणि नंतर पुन्हा दहा मिनिटांसाठी विधानसभेचे कामकाज तहकूब केले होते. विधान परिषदेत विरोधी पक्षाने नियम २६० अंतर्गत मांडलेल्या प्रस्तावावर चर्चा करण्यासाठी विशेष बैठक बोलावली होती. मात्र, यावेळीही अनेक मंत्री अनुपस्थित होते. यावर उद्योगमंत्री उदय सामंत म्हणाले की, रात्री उशिरापर्यंत सभागृहाचे कामकाज सुरू असते.

अधिकारी रात्री दोन वाजता घरी जाऊन सकाळी सहा वाजता पुन्हा कामावर येतात. सकाळी मला फोन करून सभागृहात उपस्थित राहण्यास सांगितले जाते. मग इतर मंत्र्यांची जबाबदारी नाही का? काही कार्यक्षम मंत्र्यांनाच सतत लक्ष्य केले जात आहे का? अशी पद्धत योग्य नाही. यामध्ये सुसूत्रता आणली नाही तर रोजच सभागृहाचे कामकाज ठप्प होईल.



# बीकेसी क्रेन दुर्घटनेप्रकरणी कंत्राटदाराला १ कोटींचा दंड

■ मुंबई

**मुंबईतील** बीकेसी परिसरात मेट्रो मार्गिकेच्या बांधकामस्थळी क्रेन कोसळून झालेल्या अपघाताप्रकरणी संबंधित कंत्राटदारावर १ कोटी रुपये, तर प्रकल्पाच्या सामान्य सल्लागारावर ५० लाख रुपयांचा दंड आकारण्यात आला आहे. तसेच संबंधित सल्लागार संस्थेच्या जबाबदार अधिकाऱ्याला प्रकल्पातून तत्काळ हटविण्यात आल्याची माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानसभेत दिली.

आमदार धर्मरावबाबा आत्राम आणि नरेंद्र भोंडेकर यांनी बीकेसीतील डी. एन. नगर-मंडाळे मेट्रो मार्गिकेच्या कामादरम्यान १५ एप्रिल रोजी झालेल्या क्रेन दुर्घटनेबाबत तारांकित प्रश्न उपस्थित केला होता.यावर लेखी उत्तरात शिंदे म्हणाले की, प्री-कास्ट बीम उचलण्याच्या कामादरम्यान ४०० टन क्षमतेच्या क्रेनच्या यांत्रिक गिअरमध्ये बिघाड झाल्याने संतुलन बिघडले आणि क्रेन असंतुलित झाली. तपासणीत अपघाताचे कारण यांत्रिक बिघाड असल्याचे स्पष्ट झाले आहे. मुंबई मेट्रो मार्ग-९ प्रकल्पाच्या मिरागाव स्थानकावरील डिसेंबर २०२४ मधील अपघातप्रकरणीही संबंधित अभियंत्यांना निलंबित करण्यात आले असून कंत्राटदारावर ३० लाख रुपयांचा दंड आकारण्यात आले आहे.




# वसई-विरारमधील नालेसफाईची आठ दिवसांत चौकशी होणार



■ वसई

**वसई-विरार** शहरातील नालेसफाईच्या कामांची आठ दिवसांत चौकशी करून अहवाल सादर करण्याचे निर्देश नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी दिले आहेत. गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे वसई-विरार शहरातील अनेक भाग जलमय झाले आहेत.

या पार्श्वभूमीवर वसईच्या आमदार स्नेहा दुबे-पंडित यांनी विधानसभेत लक्षवेधीद्वारे प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते. शहरातील पूरस्थिती ही केवळ नैसर्गिक नसून प्रशासनाची निष्क्रियता आणि नालेसफाईतील कथित भ्रष्टाचाराचा परिणाम असल्याचा आरोप त्यांनी केला. रस्त्यांची उंची वाढविणे, फ्लड गेट बसविणे आणि पूरनियंत्रणाची विविध कामे पूर्ण झाल्याचा दावा प्रशासनाकडून केला जात असला, तरी प्रत्यक्षात त्याचा कोणताही परिणाम दिसून येत नसल्याचे त्यांनी सांगितले. केवळ नालेसफाईच्या कामांची चौकशी न करता निविदा प्रक्रिया, दरनिश्चिती, आर्थिक मंजुरी, कंत्राटदारांना करण्यात आलेली देयके आणि संबंधित अधिकाऱ्यांच्या भूमिकेचीही सखोल चौकशी करण्याची मागणी त्यांनी केली. यावर उत्तर देताना नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी नालेसफाईच्या कामांची आठ दिवसांत चौकशी करून अहवाल सादर करण्यात येईल. १५ दिवसांच्या आत वसई-विरार महानगरपालिकेत सक्षम शहर अभियंत्याची नियुक्ती करण्यात येईल, असे सांगितले.

# रोथे कंपनीच्या आंदोलकांचा आ. खोसकरांच्या मळ्यात ठिय्या

■ मुंबई

**नाशिकच्या** इगतपुरी तालुक्यातील गोंदे औद्योगिक वसाहतीतील रोथे एर्डे कंपनीमधील कामगारांचे आंदोलन चिघळले आहे. आपल्या विविध मागण्यांसाठी सिटूच्या नेतृत्वाखाली बेमुदत संप पुकारलेल्या कामगारांनी आमदार हिरामण खोसकर यांच्या मळ्यात आंदोलन सुरू केल्याचा मुद्दा आज सभागृहात उपस्थित करण्यात आला.

रोथे एर्डे इंडिया प्रायव्हेट लिमिटेड ही थिसेनक्रुप या जर्मन समूहाची उपकंपनी आहे. मनिष अगरवाल आणि सर्वेश वर्मा हे तिचे व्यवस्थापकीय संचालक आहेत. कामगारांच्या आंदोलनाबाबत चिंता व्यक्त करत आमदार हिरामण खोसकर यांनी आपल्या मळ्याला आणि तेथील कर्मचाऱ्यांना सुरक्षा पुरविण्याची मागणी केली.

खोसकर म्हणाले की, गेल्या दोन महिन्यांपासून माझ्या मतदारसंघातील रोथे एर्डे कंपनीतील सुमारे १६० कामगार विविध मागण्यांसाठी आंदोलन करत आहेत. आज या कामगारांसह त्यांच्या कुटुंबियांनीही आंदोलनात सहभाग घेतला असून सुमारे ४०० ते ५०० जण आमच्या मळ्यात जाऊन आंदोलन करत आहेत. सध्या मी अधिवेशनाच्या कामकाजासाठी मुंबईत आहे. माझ्या मळ्यात आंदोलन सुरू असून तेथे तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे माझ्या मळ्याला आवश्यक सुरक्षा पुरविण्यात यावी.

# स्मार्ट मीटरबाबत अधिकाऱ्यांकडून खोटी माहिती! निलेश राणेंचा आरोप

■ मुंबई

**राज्यातील** स्मार्ट मीटर योजनेवरून विधानसभेत आज जोरदार वाद रंगला. अधिकाऱ्यांकडून ऊर्जा राज्यमंत्र्यांना स्मार्ट मीटरच्या तक्रारींबाबत चुकीची माहिती दिली जात असल्याचा आरोप शिंदे गटाचे आमदार निलेश राणे यांनी केला. ग्रामीण भागात ग्राहकांची पूर्वपरवानगी न घेता मीटर बसवले जात असल्याचा आरोप करत सरकारने तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी त्यांनी केली. मात्र, ऊर्जा राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी स्मार्ट मीटरमुळे वीजबिले वाढतात हा गैरसमज असल्याचे सांगत राज्यात आलेल्या तक्रारींचे प्रमाण अत्यल्प असल्याचा दावा केला.

आरोपांना उत्तर देताना ऊर्जा राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी सांगितले की, राज्यात आतापर्यंत १ कोटी २३ लाख स्मार्ट मीटर बसवली असून दोन कोटी ग्राहकांपैकी केवळ तीन लाख तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. पुणे परिमंडळातील तपासणीत ११ हजारांहून अधिक तक्रारींपैकी केवळ चार मीटरमध्ये तांत्रिक दोष आढळले.

# हाफकिनचे खासगीकरण नाही मंत्री नरहरी झिरवाळांची ग्वाही

■ मुंबई

**सार्वजनिक** आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आणि ऐतिहासिक वारसा लाभलेली हाफकिन संस्था कोणत्याही परिस्थितीत खासगीकरणाच्या मार्गावर नेली जाणार नाही, अशी स्पष्ट ग्वाही अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी आज विधानसभेत दिली.

प्रश्नोत्तराच्या तासात काँग्रेसचे आमदार विजय वडेट्टीवार यांनी हाफकिन संस्थेच्या कथित खासगीकरणाच्या हालचालींवरून सरकारला प्रश्न विचारला. यावेळी वडेट्टीवार म्हणाले की, हाफकिन संस्थेच्या खासगीकरणाचा विषय यापूर्वीही चर्चेत आला होता. सुरुवातीला सरकारने संस्थेची एक इंचही जमीन कोणाला दिलेली नसल्याचा दावा केला होता. नंतर टाटा समूहाला संशोधन केंद्रासाठी पाच एकर जमीन कराराद्वारे देण्यात आल्याचे स्पष्ट झाले. या व्यवहारात पूर्ण पारदर्शकता असणे आवश्यक आहे. यावर उत्तर देताना मंत्री नरहरी झिरवाळ यांनी विरोधकांचे आरोप फेटाळत सरकारची भूमिका स्पष्ट केली. हाफकिन ही राज्यातील एक स्वायत्त आणि महत्त्वाची संस्था आहे. तिचे खासगीकरण करण्याचा कोणताही विचार सरकारच्या मनात नाही. संस्थेचे शासकीय अस्तित्व कायम राहील. हाफकिन संस्थेच्या बळकटीकरणासाठी तसेच सध्या भेडसावत असलेल्या अडीअडचणींवर तोडगा काढण्यासाठी संबंधित अधिकारी आणि आमदारांची विशेष बैठक लवकरच मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली घेतली जाणार आहे.

# भाजपा जगातला सर्वात मोठा निर्लज्ज राजकीय पक्ष

## खा. राऊतांचा घणाघात

■ मुंबई

**मुंबईत** पाऊस सुरू होताच अवघ्या चार दिवसांत दोन भिन्न घटनांमध्ये दोन जणांचा मृत्यू झाला. यावर भाजपाचे मुंबई अध्यक्ष अमित साटम यांनी काल विधान भवनाच्या आवारात हसत हसत केलेल्या टिप्पणीवरून उबाठाचे प्रवक्ते खासदार संजय राऊत यांनी साटम आणि भाजपावर घणाघाती टीका केली. भाजपा हा जगातला सर्वात मोठा निर्लज्ज राजकीय पक्ष आहे,असे राऊत म्हणाले.

मागील चार दिवसांत मुंबईत दोन जणांचा दोन भिन्न घटनांमध्ये अपघाती मृत्यू झाला.त्यात एका शाळकरी विद्यार्थ्याचा समावेश आहे. अवघ्या अकरा वर्षे वयाच्या त्या मुलाच्या अशाप्रकारे जाण्याने त्याच्या आईवडिलांवर किती मोठे संकट कोसळले याची कल्पनाही करवत नाही. त्यांचा आक्रोश सुरू असताना भाजपाचा मुंबई अध्यक्ष दात वेंगाडून ज्या पद्धतीने हसत हसत बोलला ते अत्यंत क्रूर आणि विकृत आहे. भाजपा आतून किती विकृत आणि क्रूर आहे हेच अमित साटम यांच्या बोलण्यातून स्पष्ट झाले. भाजपावाल्यांना सत्तेपुढे कोणाचीही कसलीही पर्वा नाही. निदान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यामध्ये काही संवेदना शिल्लक असेल तर त्यांनी साटम यांना पदावरून हाकलून दिले पाहिजे. तुम्ही नालेसफाई केली नाही. धोकादायक अवस्थेत असलेल्या झाडांबद्दल रहिवाशांनी तक्रारी करूनदेखील झाडांची कापणी केली नाही. वरून निर्लज्जासारखे हसता, हा विकृतीचा कळस आहे.

# बेस्टला २ हजार कोटींचे पॅकेज द्या
## भातखळकरांची विधानसभेत मागणी

■ मुंबई

**विधानसभेत** कांदिवली पूर्वचे भाजपा आमदार अतुल भातखळकर यांनी बेस्ट उपक्रमाच्या आर्थिक स्थितीचा मुद्दा उपस्थित करत मुंबई महापालिकेने बेस्टला तातडीने २ हजार कोटी रुपयांचे आर्थिक पॅकेज द्यावे, अशी मागणी केली. यावेळी त्यांनी मुंबई शहराशी संबंधित विविध समस्यांकडेही सभागृहाचे लक्ष वेधले.

अतुल भातखळकर म्हणाले की, बेस्टची आर्थिक स्थिती चिंताजनक असून मुंबईकरांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित असलेल्या या महत्त्वाच्या उपक्रमाला तातडीने आर्थिक मदतीची गरज आहे. त्यामुळे मुंबई महापालिकेने बेस्टला २ हजार कोटी रुपयांचे विशेष आर्थिक पॅकेज द्यावे.तसेच, बेस्ट कर्मचाऱ्यांची प्रलंबित ग्रॅच्युइटी तात्काळ अदा करण्यात यावीग्रॅच्युइटी रोखून धरणे हे केवळ बेकायदेशीरच नाही, तर कर्मचाऱ्यांवर अन्याय करणारे पापदेखील आहे. सुमारे सव्वा हजार कोटी रुपयांची ग्रॅच्युइटी थकीत आहे. कर्मचाऱ्यांचे हक्क अबाधित ठेवणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. बेस्ट हा मुंबईकरांचा जीवनावश्यक उपक्रम आहे.




संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

## संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# नीटबरोबर बोर्डाच्याही गुणांचा विचार करा

गेली तीन वर्षे राष्ट्रीय प्रवेश परीक्षा म्हणजेच नीट परीक्षांचा गोंधळ सुरू आहे. यावर्षी तर या गोंधळाने कळस गाठला गेला. आणि लाखो विद्यार्थ्यांना तसेच पालकांना अनावश्यक अशा मनस्तापाला सामोरे जावे लागेल. बारावीचे वर्षे सुरू होत असतानाच विद्यार्थ्यांचा नीट परीक्षेचाही अभ्यास सुरू असतो. बऱ्याच वेळेला तर बोर्डाच्या परीक्षेसाठी कराव्या लागणाऱ्या अभ्यासापेक्षा विद्यार्थ्यांचे नीटच्या अभ्यासाकडे अधिक लक्ष असते. अशा परिस्थितीत जेव्हा पेपरफुटीसारखे प्रकार घडतात, तेव्हा त्यांनी केलेल्या वर्षभराच्या परिश्रमावरच पाणी फिरवण्याचा प्रकार घडतो. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करूनही पेपरफुटीचा प्रकार थांबायला तयार नाही. महाराष्ट्राच्या टीईटी परीक्षेचा पेपर फुटण्याचाही प्रकार लगोलग घडला. खरे तर नीट परीक्षेच्या पेपरफुटीचे केंद्रदेखील महाराष्ट्रच होते. आणि आता टीईटीच्या परीक्षेचाही पेपर फोडण्यात महाराष्ट्राने आपला अग्रक्रम ठेवला आहे. दहावी-बारावीच्या परीक्षा या प्रत्येक विद्यार्थ्याच्या आयुष्यासाठी निर्णायक स्वरूपाच्या असतात. तिथूनच पुढच्या आयुष्याचा प्रवास निश्चित होतो. ज्यावेळी या प्रवेश परीक्षांचे फॅड नव्हते, त्यावेळी दहावी-बारावीत मिळणाऱ्या मार्कांवरच पुढच्या अभ्यासक्रमांना प्रवेश मिळत असत. परंतु आता या प्रवेश परीक्षांच्या वर्चस्वामुळे बोर्डाच्या परीक्षांना फारसे महत्त्व उरलेले नाही. नीट परीक्षांचा गोंधळ त्याचा विद्यार्थी आणि पालकांवर होणारा परिणाम या परीक्षांच्या अपयशातून येणारं नैराश्य या सगळ्या गोष्टी लक्षात घेऊन आता केंद्र सरकारलाही जाग येऊ लागलेली दिसते. सध्या नीट परीक्षांवर जो सर्वाधिक भर दिला जातो, तो कमी करण्याच्या उद्देशाने यापुढे बोर्डाच्या परीक्षेतल्या पन्नास टक्के गुणांचाही पुढच्या अभ्यासक्रमासाठी विचार केला जावा अशा प्रकारची शिफारस केंद्रीय शिक्षण मंत्रालयाकडून केली गेली आहे. अनेक महत्त्वाच्या अभ्यासक्रमांना प्रवेश घेताना विद्यार्थ्यांच्या बोर्डाच्या परीक्षेतले गुण पूर्णपणे दुर्लक्षित होऊ नयेत आणि नीट परीक्षांचे, अभ्यासाचे येणारे दडपण कमी करणे यातून नीट परीक्षांमधल्या गैरप्रकारांनादेखील आळा बसण्याची शक्यता शिक्षण खात्याने व्यक्त केली आहे. याचा अर्थ नीटबरोबर बोर्डाच्या परीक्षांनाही महत्त्व देण्याचा सरकारचा विचार हे उशिरा सुचलेले शहाणपण म्हटले पाहिजे.

**प्रवेश परीक्षा हीच एक समस्या**

यावर्षी नीट परीक्षांच्या गोंधळाने केंद्र सरकारच्या शिक्षणखात्याला मोठ्या समस्येला सामोरे जावे लागेल. हा सगळा प्रकार निस्तरता निस्तरता शिक्षण मंत्र्यांच्या तोंडालाही फेस आला. म्हणूनच या सर्व गैरप्रकारांवरचा उपाय म्हणून पुढच्या वर्षापासून काही नव्या सुधारणा लागू होण्याची शक्यता आहे. त्यासाठी एका नऊ सदस्यीय समितीची स्थापना केली गेली आहे. या महिनाभरामध्ये ही समिती आपला अहवाल सरकारला सादर करेल. यात प्रामुख्याने प्रवेश परीक्षांमधली पारदर्शकता, कोचिंग क्लासेसचा प्रभाव, बनावट शाळांचा सुळसुळाट या मुद्यांचा समितीने विचार केलेला आहे. खरे तर ही समिती स्थापन करून एक वर्ष पूर्ण होईल. जर सहा महिन्यांपूर्वीच या समितीचा अहवाल आला असता आणि यंदापासूनच जर प्रवेश परीक्षांबाबत बोर्डाच्या परीक्षेतले गुणही गृहित धरले गेले असते तर लाखो विद्यार्थ्यांची पुन्हा परीक्षा देण्याची वेळ आली नसती. निदान पुढच्या वर्षापासून या बोर्ड परीक्षांमध्ये मिळालेल्या गुणांना पन्नास टक्के महत्त्व दिले जाईल, आणि पन्नास टक्के महत्त्व हे प्रवेश परीक्षांच्या गुणांना असेल. याच्याबरोबरीने कदाचित पुढच्या वर्षापासून लेखी प्रवेश परीक्षा न घेता ती संगणकावर किंवा ऑनलाईन घेण्याचाही उपाय अंमलात येऊ शकतो. सरकारला प्रवेश परीक्षांमधल्या गोंधळाचे चटके चांगलेच जाणवले आहेत. म्हणूनच आता ताकही फुंकून पिण्याची वेळ सरकारवर आलेली आहे. विद्यार्थ्यांच्या हितासाठी जरी ही नीट परीक्षा घेतली जात असली तरी त्याचे व्यवस्थापन नीट नसल्याने त्याचा भूर्दंड लाखो विद्यार्थ्यांना सोसावा लागतो. अक्षरशः वर्षभर दोन्ही परीक्षांचा अभ्यास केल्यानंतर सोसावा लागणारा मनस्ताप धोकादायक ठरलेला आहे. पेपरफुटीचे प्रकार रोखण्यापासून ते विद्यार्थ्यांवरचे दडपण कमी करण्यापर्यंत निश्चितच अशा काही सुधारणांची आवश्यकता होती. आता या प्रस्तावित सुधारणांना लवकरात लवकर मंजुरी दिली गेली पाहिजे.

**कोचिंग क्लासेसचा प्रभाव**

आपल्या देशाच्या एकूण सामाजिक आणि भौगोलिक परिस्थितीचा विचार करून काही गोष्टींचा विचार झाला पाहिजे. विद्यार्थ्यांवर अभ्यास आणि परीक्षांचे ओझे लादत असताना तशा प्रकारच्या सोयीसुविधा आपण देत आहोत का, नीटसारख्या परीक्षेचा अभ्यास करण्याकरता ग्रामीण किंवा आदिवासी भागात कोचिंग क्लासही उपलब्ध होत नाहीत. शहरांमधून कोचिंग क्लासेसचे एवढे प्रस्थ वाढले आहे की, त्यासाठी लाखो रुपयांची फी मोजली जाते. आणि आपल्या क्लासचे वर्चस्व सिद्ध करण्यासाठी तितकेच लाखो रुपये मोजून पेपर फोडण्याचे प्रकार होतात. गेल्या तीनही वर्षांमध्ये नीटचे सगळे पेपर हे कोचिंग क्लासवाल्यांनीच फोडल्याचे सिद्ध झाले आहे. स्वाभाविकपणे विद्यार्थ्यांना शाळांमधल्या अभ्यासापेक्षाही कोचिंग क्लासमधला अभ्यास महत्त्वाचा वाटतो. म्हणजेच शाळांपेक्षा बारावीचे विद्यार्थी कोचिंग क्लासवर जास्त अवलंबून राहतात. सामाजिकदृष्ट्या विचार करता आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या विद्यार्थ्यांनी नीट परीक्षांचा अभ्यास करताना अडचणी येतात. आपल्या इथल्या गैरव्यवस्था अनेक प्रकारच्या असतात. परीक्षा केंद्रांवर विद्यार्थी वेळेवर पोहोचेलच याची खात्री देता येत नाही. कारण वाहतूक कोंडी, मोर्चे, निदर्शने अशा अनेक समस्यांना तोंड देत विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्र गाठावे लागते. म्हणजेच भौगोलिक परिस्थितीचाही विचार करणे क्रमप्राप्त ठरते. गेल्या काही वर्षांत बोर्डाच्या परीक्षांपेक्षा प्रवेश परीक्षांचे निर्माण झालेले दडपण कमी करण्याची आवश्यकता होती. जर आता बोर्डाच्या परीक्षांमधल्या गुणांना पन्नास टक्के महत्त्व देण्याचा उपाय केला जात असेल तर तो निश्चितच स्वागतार्ह ठरेल.


## सुविचार

**विलास कोळेकर**
**मालेवाडी, जि. सांगली.** मोबा.९४२२४२०६११

माणूस कितीही हवेत उडायला लागला, तर कधी तरी त्याला जमिनीवर यावंच लागतं. वेळ आणि परिस्थिती कधीही बदलू शकते. म्हणून कधी स्वतःच्या पदाचा आणि प्रतिष्ठेचा गर्व करू नये.

## पंचांग

**शनिवार, ४ जुलै २०२६**
**शक १९४८ पराभवनामसंवत्सर**
*** निज ज्येष्ठ कृष्ण चतुर्थी**
**नक्षत्र : धनिष्ठा**
**-: जन्मराशी :-**
**००-०१ ते ००-४७ मकर**
**००-४८ ते २४-०० कुंभ**



**रवी उदय- ०६-०७**
**रवी अस्त- १९-१९**

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफिस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)

संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिराती: ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः contact@navakal.in
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक 'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

## पाककृती




### मासवडी



★ **साहित्य :** मासवडीच्या आवरण/पिठासाठी: बेसन- २ वाट्या, पाणी- ४ ते ५ वाट्या (पिठाच्या गरजेनुसार), हळद- १/२ चमचा, तिखट किंवा हिरवी मिरची व लसूण वाटण- १ चमचा, तेलः- २ चमचे, मीठ- चवीनुसार.
आतील सारणासाठी: किसलेले सुके खोबरे- १.५ कप, भाजलेले तीळ- १/२ कप, शेंगदाण्याचा कूट- १/४ कप, बारीक चिरलेला कांदा- १.५ कप (आवश्यकतेनुसार), लसूण पाकळ्या- ८ ते १०, गरम मसाला किंवा गोडा मसाला- २ चमचे, कांदा-लसूण मसाला किंवा लाल तिखट- १ ते २ चमचे, कोथिंबीर- बारीक चिरलेली, तेल- २ चमचे.

★ **कृती :** सारण- एका पॅनमध्ये २ चमचे तेल गरम करून बारीक चिरलेला कांदा सोनेरी रंगापर्यंत परतून घ्या. नंतर त्यात लसूण घालून परता. आता किसलेले खोबरे, तीळ आणि शेंगदाण्याचा कूट घालून मंद आचेवर हलके लाल होईपर्यंत भाजून घ्या. यामध्ये गोडा मसाला, लाल तिखट, मीठ आणि भरपूर कोथिंबीर घालून मिश्रण चांगले एकजीव करा. हे झाले सारण तयार. आता मासवडीचे आवरण- एका भांड्यात पाणी उकळायला ठेवा. त्यात हळद, तिखट/मिरची वाटण, तेल आणि मीठ टाका. उकळी आल्यावर गॅस बारीक करा आणि हळूहळू बेसन पिठात सोडा, जेणेकरून गुठळ्या होणार नाहीत. हे मिश्रण चांगले घट्ट होईपर्यंत वाफवून घ्या आणि चमच्याने एकजीव करा. वडी वळणे- एका ताटाला किंवा पाटाला थोडे तेल लावा. तयार झालेले गरम बेसन यावर हाताला थोडे पाणी लावून एकसारखे पातळ पसरून (थापून) घ्या. आता या बेसनावर तयार केलेले सुके सारण सर्वत्र पसरा आणि हाताने दाबून घ्या. ताटाच्या एका बाजूने घट्ट गुंडाळी करत वडी वळा. हे रोल थंड झाल्यावर सुरीने हव्या त्या आकारात मासवड्या कापून घ्या. ही वडी अशीही खाऊ शकता.




# पोर्तुगालचा क्रोएशियावर २-१ ने दमदार विजय

## ७ जुलैला उपउपांत्यपूर्व फेरीत स्पेनशी भिडणार



**फिफा विश्वचषकाच्या बाद फेरीत पोर्तुगालने पुन्हा दमदार खेळ करून क्रोएशियाचा २-१ असा थरारक पराभव करत उपउपांत्य फेरीत प्रवेश केला. पोर्तुगालकडून स्टार खेळाडू ख्रिस्तियानो रोनाल्डो आणि रामोस यांनी प्रत्येकी एक-एक गोल आणि क्रोएशियाच्या पेरिसिचने देखील एक गोल केला. अतिरिक्त वेळेतील व्हीएआर निर्णयामुळे हा सामना अधिकच रंगतदार ठरला. आता ७ जुलै रोजी पोर्तुगाल स्पेन विरुद्ध उपउपांत्यपूर्व फेरीत सामना खेळणार आहे.**

■ टोरँटो

**सामन्याच्या** पहिल्या हाफमध्ये पोर्तुगालचा ख्रिस्तियानो रोनाल्डो आणि ब्रुनो फर्नांडिस यांना गोल करण्याच्या संधी मिळाल्या. मात्र क्रोएशियाच्या भक्कम बचावफळीने त्या निष्फळ ठरवल्या. त्यामुळे पहिल्या हाफमध्ये दोन्ही संघांना एकही गोल करता आला नाही. त्यानंतर क्रोएशियाच्या पेरिसिचने दुसऱ्या हाफच्या ५३ व्या मिनिटाला गोल करून आपल्या संघाला १-० अशी आघाडी मिळवून दिली.

या गोलनंतर पोर्तुगालने जोरदार पुनरागमन केले आणि यानंतर पोर्तुगालला व्हीएआरच्या हस्तक्षेपामुळे मोठी संधी मिळाली. कॉर्नर किकदरम्यान बचावपटू रेनाटो वेइगाला दंडक्षेत्रात पाडण्यात आले. सुरुवातीला पंचांनी खेळ सुरू ठेवला होता. मात्र व्हीएआर तपासणीनंतर त्यांनी निर्णय बदलत पोर्तुगालला पेनल्टी बहाल केली आणि ६४ व्या मिनिटाला पेनल्टीवर ख्रिस्तियानो रोनाल्डोने अचूक गोल करत सामना १-१ असा बरोबरीत आणला. त्यानंतर ८१ व्या मिनिटाला रोनाल्डोला बदली करण्यात आले आणि त्याच्या जागी रुबेन नेवेस आला. ९० मिनिटांचा खेळ पूर्ण झाल्यावर १० मिनिटांच्या अतिरिक्त वेळेत खरी उत्कंठा पाहायला मिळाली. ९० व्या मिनिटाला राफेल लिओने दिलेल्या क्रॉसवर रामोसने हेडरद्वारे गोल करून पोर्तुगालला २-१ अशी आघाडी मिळवून दिली. अतिरिक्त वेळेत जोस्को ग्वार्डिओल याने क्रोएशियासाठी गोल केला होता. मात्र चेंडूच्या उभारणीत ऑफसाईड झाल्याचे व्हीएआर तपासणीत स्पष्ट झाल्याने हा गोल रद्द करण्यात आला. या विजयासह पोर्तुगालने उपउपांत्य फेरीत धडक मारली.

**५ जुलैचा उपउपांत्य पूर्व सामना**

| भारतीय वेळ | संघ |
|---|---|
| मध्यरात्री २.३० | पराग्वेविरुद्ध फ्रान्स |

# अल्जेरियाचा २-० ने पराभव करून स्वित्झर्लंड उपउपांत्यपूर्व फेरीत

■ व्हँकुव्हर

**ब्रील** एम्बोलो आणि डॅन न्दोये यांच्या शानदार गोलच्या जोरावर स्वित्झर्लंडने अल्जेरियाचा २-० ने पराभव करत विश्वचषकाच्या उपउपांत्यपूर्व फेरीत धडक मारली. २०१४ नंतर प्रथमच विश्वचषकात पुनरागमन करणाऱ्या अल्जेरियासाठी ही स्पर्धा निराशाजनक ठरली.

अल्जेरियाचे प्रशिक्षक व्लादिमीर पेटकोविच यांनी एकेकाळी स्वित्झर्लंड संघाचे यशस्वी नेतृत्व केले होते, त्यांना आपल्या माजी संघाविरुद्ध पराभवाचा सामना करावा लागला. सामन्याच्या सुरुवातीला पहिल्या १० मिनिटांत अल्जेरियाचे वर्चस्व दिसून आले होते. मात्र त्यानंतर स्वित्झर्लंडने सामन्याची सूत्रे हाती घेतली. योहान मानझांबीच्या चपळ असिस्टवर ब्रील एम्बोलोने गोल करून संघाला १-० अशी आघाडी मिळवून दिली. एम्बोलोचा हा २६ वा आंतरराष्ट्रीय गोल ठरला. दुसऱ्या हाफची सुरुवात होताच अवघ्या काही सेकंदात डॅन न्दोयेने बॉक्सच्या बाहेरून एक जोरदार फटका मारला. अल्जेरियाचा गोलकीपर लुका झिदानने झेप घेऊन चेंडू अडवण्याचा प्रयत्न केला.

# स्पेनची ऑस्ट्रियावर ३-० ने मात

■ लॉस एंजेलिस

**लॉस** एंजेलिस स्टेडियमवर झालेल्या फिफा विश्वचषकाच्या बाद फेरीत विजेतेपदाचे दावेदार असलेल्या स्पेनने ऑस्ट्रियावर ३-० असा विजय नोंदवला. गतविजेत्या युरोपियन चॅम्पियन स्पेनने सुरुवातीपासूनच सामन्यावर वर्चस्व गाजवले. स्पेनच्या आक्रमक खेळासमोर ऑस्ट्रियन संघ हतबल दिसत होता. या दणदणीत विजयासह संघाने उपउपांत्य फेरीत आपले स्थान निश्चित केले. सामन्याच्या पहिल्या हाफमध्ये स्पेनचे स्टार खेळाडू लॅमिन यामाल, लेक्स बाएना आणि मार्क कुकुरेला यांनी सतत आक्रमण करून ऑस्ट्रियाच्या बचावाला खिंडार पाडले. मात्र, ऑस्ट्रियाचा गोलकीपर अलेक्झांडर श्लागरने पहिल्या अर्ध्या तासात काही उत्कृष्ट बचाव करून स्पेनला रोखून धरले. अखेरीस ३६ व्या मिनिटाला कुकुरेलाने जवळून दिलेल्या अचूक लो क्रॉसवर मिकेल ओयाझाबालने गोल करून स्पेनला १-० अशी आघाडी मिळवून दिली.

# विम्बल्डन महिला दुहेरीत मुहम्मद-स्टोलरची आगेकूच

**लंडन** - विम्बल्डन टेनिस स्पर्धेच्या महिला दुहेरी प्रकारात एशिया मुहम्मद आणि फैनी स्टोलर या जोडीने नादिया किचेनोक आणि माकोतो निनोमियावर ७-५, ६-२ असा विजय मिळवून दुसऱ्या फेरीत धडक मारली. या सामन्याच्या अत्यंत चुरशीच्या ठरलेल्या पहिल्या सेटमध्ये मुहम्मद आणि स्टोलर जोडीने बाजी मारत ७-५ अशी आघाडी घेतली. दुसऱ्या सेटमध्ये अधिक आक्रमक खेळ करून त्यांनी ६-२ अशा फरकाने सहज विजय मिळवला. या विजयासह ही जोडी आता दुसऱ्या फेरीत युलिया स्टारोडुबत्सेवा आणि पेटन स्टर्न्स या जोडीविरुद्ध खेळेल.

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

**ई-निवीदा सूचना**

ई - नोंदणीकृत शासकीय निमशासकीय नोंदणीकृत व अनुभवी कंत्राटदारांकडून, ई - निवीदा कार्यकारी अभियंता (स्था) रत्नागिरी, ईटी - ०९/२०२६-२७ व ईटी - १०/२०२६-२७ स्थापत्य कामासाठी मागविण्यात येत असून त्याबद्दलचा इतर सर्व सविस्तर तपशिल कंपनीच्या https://etender.mahadiscom.in/eatAPP या वेबसाईटवर उपलब्ध असून, ई-निवीदा विक्री करणेचा कालावधी दि. ०४.०७.२०२६ ते ११.०७.२०२६ सकाळी ११.०० पर्यत व निवीदा सादर करण्याची तारीख ११.०७.२०२६ रोजी दुपारी १३.०० पर्यत आहे. ई-निवीदा फी व ई-निवीदा बयाणा रक्कम ऑनलाईन माध्यमातून भरुन सर्व तपशीलांसह विहीत नमुन्यात ई-निवीदा सादर करावी. सदरील निवीदेत काही शुध्दीपत्रक असेल तर ते फक्त महावितरणच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. संपर्क अधिकारी कार्यकारी अभियंता (स्थापत्य) रत्नागिरी. दूरध्वनी क्र. ०२३५२-२२२१७७ मो. नं. ७८७५७६५०१६.
PRO No.:- PRO/KZR/४९/२०२६-२७ Dt. ०१.०७.२०२६
**कार्यकारी अभियंता (स्था.) रत्नागिरी**

**जाहीर सूचना**

माझे अशील, **श्री. समीरुद्दीन सुजाउद्दीन काद्री, श्री. सिराजुद्दीन सुजाउद्दीन काद्री आणि श्री. शकील सुजाऊद्दीन काद्री** यांच्याद्वारे सदर सूचना देण्यात येते की, त्यांची आई, दिवंगत **श्रीमती शमिम बानू सुजाऊद्दीन काद्री**, ज्यांचे दि. २८.०३.२०२३ रोजी निधन झाले होते, त्या विद्या यशोमंदिर को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लिमिटेड (आता गोदावरी प्रवरा को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लिमिटेडमध्ये जोडण्यात आली आहे) (**"संस्था"**), महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा, १९६०च्या तरतुदींअंतर्गत नोंदणी क्र. बीओएम/एचएसजी/३७२८ वर्ष १९७२ नुसार नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या नोंदणीकृत सदस्य आणि भागधारक होत्या. दिवंगत श्रीमती शमिम बानू सुजाऊद्दीन काद्री यांच्या निधनानंतर, केवळ माझे अशील श्री. समीरुद्दीन सुजाउद्दीन काद्री, श्री. सिराजुद्दीन सुजाउद्दीन काद्री आणि श्री. शकील सुजाऊद्दीन काद्री हेच दिवंगत श्रीमती शमिम बानू सुजाऊद्दीन काद्री यांचे कायदेशीर वारस आहेत. संस्थेने माझ्या अशिलांच्या नावे भाग प्रमाणपत्र क्र. ४६, दिनांक ६ डिसेंबर, २०२५ द्वारे दर्शविण्यात येणारे डिस्टिंक्टिव्ह क्र. ४५१ ते ४६० (दोन्ही समाविष्ट) धारण केलेले संस्थेचे १० पूर्णतः भरणा केलेले समभाग पारित केले होते आणि ते जुन्या जागेच्या अनुरोधाने वाटप केलेल्या, याखाली लिहिलेल्या अनुसूचीमध्ये अधिक तपशिलवारपणे वर्णन केलेली नवीन निवासी सदनिका (**"नवीन जागा"**) आणि विकास करारपत्र दिनांक २१ ऑक्टोबर, २०२१ अन्वये सदस्यत्व धारण करण्यास, ताबा घेण्यात आणि उपभोग घेण्यास संपूर्ण आणि अनन्य हक्कदार आहेत. माझ्या अशिलांनी कायमस्वरूपी पर्यायी निवासस्थान करारपत्र बनविण्याकरिता आणि नोंदणी करण्याकरिता आणि त्यांना सम प्रमाणात नवीन जागा व त्यासह कार पार्किंग जागेचा ताबा देण्याकरिता रुणवाल डेव्हलपर्स लिमिटेड यांना संपर्क केला आहे
कोणी व्यक्ती/पक्षकार/पक्षकारांचा संस्थेमधील सदर नवीन जागा आणि समभाग यासह किंवा त्याच्या कोणत्याही भागाविरुद्ध किंवा मध्ये किंवा वर वारसा, इच्छापत्र, उत्तराधिकार, मृत्युपत्र, गहाणवट, ताबा, विक्री, हस्तांतरण, भेट, देवाणघेवाण, भाडेपट्टी, धारणाधिकार, प्रभार, भाडेकरू, न्यास, परवाना, देखभाल, वहिवाट या मार्गे किंवा अन्यथा कशाही प्रकारे कोणत्याही करारपत्र, लिखित, उत्तराधिकार, कौटुंबिक व्यवस्था/तडजोड, खटला, हुकूम किंवा न्यायालयीन आदेश या मार्गे किंवा अन्यथा कशाही प्रकारे कोणताही दावा, हक्क, शीर्षक, हितसंबंध, हिस्सा, मागणी आक्षेप असल्यास त्यांनी त्याबाबत निम्नस्वाक्षरीकार यांना त्या दाव्याच्या समर्थनार्थ आवश्यक कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरुपात, खाली दिलेल्या पत्त्यावर येथील दिनांकापासून चौदा (१४) दिवसांच्या आत सूचित करणे याद्वारे आवश्यक आहे. जर सदर सूचना कालावधीमध्ये असा कोणताही दावा न करण्यात आल्यास, रुणवाल डेव्हलपर्स लिमिटेड **श्री. समीरुद्दीन सुजाउद्दीन काद्री, श्री. सिराजुद्दीन सुजाउद्दीन काद्री आणि श्री. शकील सुजाऊद्दीन काद्री** यांच्या नावे सदर नवीन जागेच्या संदर्भात कायमस्वरूपी पर्यायी निवासस्थान करारपत्र बनवतील आणि त्यांना ताबा देतील. सदर सूचना कालावधीच्या नंतर कोणताही दावा किंवा दावे करण्यात आल्यास ते सर्व हेतू आणि कारणांकरिता सोडून दिले असे समजण्यात येईल आणि माझ्या अशिलावर बंधनकारक नसतील.

**वरील उल्लेखित अनुसूची**
**(नवीन जागा)**

वाय.एम.सी.ए.जवळ, अंधेरी (पश्चिम), मुंबई - ४०००५३ येथील सीटीएस क्र. १९५ (भाग) धारण केलेल्या जमिनीच्या भूखंडावर बांधलेल्या "कोडनेम रेअर बाय रुणवाल" या प्रकल्पामधील टॉवर क्र. ए मधील ७ व्या मजल्यावरील सदनिका क्र. ७०३, क्षेत्रफळ मोजमाप अदमासे ७९३ चौ.फू. रेरा कार्पेट क्षेत्रफळ आणि भाग प्रमाणपत्र क्र. ४६, दिनांक ६ डिसेंबर, २०२५ द्वारे दर्शविण्यात येणारे डिस्टिंक्टिव्ह क्र. ४५१ ते ४६० (दोन्ही समाविष्ट) धारण केलेले संस्थेचे समभाग.

दिनांक ०४ जुलै, २०२६
सही/-
**ॲड. प्रशांत एम. देशमुख**
**कार्यालय सी-२६, बी-१०१, गोकुळधाम, गोरेगाव (पूर्व), मुंबई ४०००६३.**

**फॉर्म बी**
**जाहिर घोषणा**
*(इन्सॉल्व्हन्सी ॲण्ड बँकरप्टसी बोर्ड ऑफ इंडिया (परिसमापन प्रक्रिया) रेग्युलेशन्स, २०१६ चे नियम १२ अन्वये)*

**सनराईझ प्रॉपर्टीज प्रायव्हेट लिमिटेडच्या भागधारकांचे लक्ष वेधण्याकरिता**

| अ.क्र. | तपशिल | वर्णन |
|---|---|---|
| १ | कॉर्पोरेट ऋणकोचे नाव | **सनराईझ प्रॉपर्टीज प्रायव्हेट लिमिटेड** |
| २ | कॉर्पोरेट ऋणकोची स्थापना तारीख | १७ जुलै १९८६ |
| ३ | ज्या प्राधिकरणाअंतर्गत कॉर्पोरेट ऋणकोची स्थापना/नोंदणीकरण झाले आहे | आरओसी मुंबई |
| ४ | कॉर्पोरेट ऋणकोचे कॉर्पोरेट ओळख क्र./मर्यादित दायित्व ओळख क्र. | U45200MH1986PTC040429 |
| ५ | कॉर्पोरेट ऋणकोचे नोंदणीकृत कार्यालय व प्रधान कार्यालयाचा (काही असल्यास) पत्ता | दुकान क्र. १५५, वीणा मॉल, कांदिवली पूर्व, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे जवळ, मुंबई, महाराष्ट्र, भारत, ४००१०१ |
| ६ | दिवाळखोरी ठराव प्रक्रिया बंद करण्याची तारीख (१८० दिवस) | २२ एप्रिल २०२५ |
| ७ | कॉर्पोरेट ऋणकोंची परिसमापन प्रारंभ तारीख | आदेश दिनांक : २५ जून २०२६<br>आदेश प्राप्त दिनांक : १ जुलै २०२६ |
| ८ | परिसमापक म्हणून कार्यरत दिवाळखोरी अधिकाऱ्याचे नाव व नोंदणी क्रमांक | एजिस रिझोल्यूशन सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड<br>अधिकृत स्वाक्षरीकर्ता सिद्धांत अग्रवाल यांच्यामार्फत<br>नोंदणी क्र. IBBI/IPE-0118/IPA-1/2022-23/50041 |
| ९ | मंडळासह नोंदणीकृत प्रमाणे परिसमापकाचे पत्ता व ई-मेल | नोंदणीकृत पत्ता: १०६, पहिला मजला, कनाकिया ॲट्रियम २, क्रॉस रोड ए, कोर्टयार्ड मॅरियटच्या मागे, चकाला, अंधेरी पूर्व, मुंबई - ४०००९३<br>ई-मेलः avil@caavil.com |
| १० | परिसमापकासह पत्रव्यवहाराकरिता बापरावयाचे पत्ता व ई-मेल | पत्ता: १०६, पहिला मजला, कनाकिया ॲट्रियम २, क्रॉस रोड ए, कोर्टयार्ड मॅरियटच्या मागे, चकाला, अंधेरी पूर्व, मुंबई - ४०००९३<br>ई-मेलः ip.siddhantagrawal@gmail.com/ irp.sppl@aegisipe.com |
| ११ | दावा सादर करण्याची अंतिम तारीख | १५ जुलै २०२६ |

येथे सूचना देण्यात येत आहे की, राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ यांनी २५ जून २०२६ (आदेश १ जुलै २०२६ रोजी प्राप्त) **सनराईझ प्रॉपर्टीज प्रायव्हेट लिमिटेड**चे परिसमापन सुरू करण्याचे आदेश दिले आहेत. **सनराईझ प्रॉपर्टीज प्रायव्हेट लिमिटेड**च्या भागधारकांना (ज्यांनी दिवाळखोरी प्रक्रिया सुरू झाल्याच्या तारखेपर्यंत कॉर्पोरेट दिवाळखोरी निवारण प्रक्रियेदरम्यान दावा सादर केलेला नाही) १५ जुलै २०२६ रोजी किंवा त्यापूर्वी पुराव्यासह त्यांचे दावे बाब क्र.१० विरुद्ध नमूद केलेल्या पत्त्यावर परिसमापकाकडे सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. वित्तीय धनकोंनी (ज्यांनी दिवाळखोरी प्रक्रिया सुरू झाल्याच्या तारखेपर्यंत कॉर्पोरेट दिवाळखोरी निवारण प्रक्रियेदरम्यान दावा सादर केलेला नाही) त्यांचे दावे पुराव्यासह इलेक्ट्रॉनिक माध्यमातूनच सादर करावेत. इतर सर्व धनको पुराव्यासह वैयक्तिकरित्या, पोस्टाने किंवा इलेक्ट्रॉनिक माध्यमातून दावे सादर करू शकतात.
दाव्यांचा खोटा किंवा दिशाभूल करणारा पुरावा सादर केल्यास दंड आकारला जाईल.
दिनांक : ०४ जुलै २०२६
ठिकाण: मुंबई
सही/-
एजिस रिझोल्यूशन सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड
अधिकृत स्वाक्षरीकर्ते सिद्धांत अग्रवाल यांच्यामार्फत,
सनराईज प्रॉपर्टीज प्रायव्हेट लिमिटेड यांचे परिसमापक म्हणून.
नोंदणी क्र.: IBBI/IPE-0118/IPA-1/2022-23/50041
असाइनमेंटसाठी प्राधिकरण वैधता ३० जून २०२७ पर्यंत

**बृहन्मुंबई महानगरपालिका**
**सार्वजनिक आरोग्य खाते**
**मुंबई जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण संस्था**
**क्र. एचओ /2401/NUHM/ दि. १.७.२६**

**ई-निविदा सूचना**

सदस्य सचिव, मुंबई जिल्हा आरोग्य एकात्मिक आरोग्य कुटुंब कल्याण संस्था सार्वजनिक आरोग्य खाते हे मुंबई जिल्हा आरोग्य एकात्मिक आरोग्य कुटुंब कल्याण संस्था अध्यक्षांच्या वतीने खाली नमुद केलेली ९५ संच (१ संगणक आणि १ प्रिंटर) १५ वा वित्त आयोग अंतर्गत राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियानाकरीता उपलब्ध करण्यासाठी ई - निविदा मागवित आहेत.

| अ.क्र. | निविदा क्र. | तपशील | नग |
|---|---|---|---|
| १ | GEM/2026/B/ 7730397 | १५ वे वित्त आयोगअंतर्गत (१ संगणक आणि १ प्रिंटर) संच खरेदीबाबत | 95 |

पुर्व बोली सभा तारीख व वेळ : ०७/०७/२०२६ दुपारी १३. ३०:०० वाजता
बोलीची सुरुवात तारीख व वेळ : ०१ /०७/२०२६ सकाळी १७:००:०० वाजता.
बोलीची अंतिम दिनांक : १६/०७/२०२६ संध्याकाळी २१.००:०० वाजे पर्यंत.
संपर्क अधिकाऱ्यांचे नाव : डॉ. वर्षा पुरी (उप कार्यकारी आरोग्य अधिकारी)
ई-मेल व दूरध्वनी क्र. : nuhm.mum@gmail.com/022-24106364

ई-निविदाबाबतची सर्व माहिती http://gem.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे निविदाकाराने सर्व कागदपत्रांसह online ई-निविदा भरावे.

सही/-
**डॉ. वर्षा पुरी**
उप-कार्यकारी आरोग्य अधिकारी
(कुकमांबासं/एनयुएचएम)

पीआरओ/७२९/जाहि./२०२६-२७

**थोडासाही ताप येता, डॉक्टरांना जाऊन भेटा.**

देश विदेश

# अमेरिकन महिलेला मंदिरामध्ये प्रवेशासाठी हायकोर्टाची परवानगी

■ चेन्नई

**हिंदू** धर्म स्वीकारणाऱ्या अमेरिकन महिलेला मंदिरात प्रवेश करण्यास आणि इतर कोणत्याही हिंदू भाविकाप्रमाणे पूजा-अर्चना करण्यास परवानगी द्यावी, असे निर्देश मद्रास उच्च न्यायालयाने तामिळनाडूच्या तंजावर जिल्ह्यातील श्री अरुलमिघू अभिष्ट वरदराज पेरुमल मंदिराचे प्रशासन आणि 'हिंदू धार्मिक व धर्मादाय विभाग' यांना दिले आहेत.

लॉरा फ्रान्सिस या महिलेने १७ सप्टेंबर २०२३ रोजी याच मंदिरात वरदा बालाजी व्यंकटकृष्णन नावाच्या एका हिंदू पुरुषाशी लग्न केले. तिच्या पतीचे आजोबा देखील या मंदिराचे विश्वस्त होते. जेव्हा तिने अलीकडेच मंदिराला भेट दिली. तेव्हा ती हिंदू नाही, असे समजून स्थानिकांनी तिच्या प्रवेशास आक्षेप घेतला. त्यानंतर तिच्या पतीने मंदिरात पूजा करण्याची परवानगी मागण्यासाठी अधिकाऱ्यांना पत्र पाठवले.




ज्यामुळे विभागाने तिला प्रवेशबंदीचा आदेश जारी केला. त्यानंतर महिलेने मद्रास उच्च न्यायालयात धाव घेतली. तिच्या याचिकेवर न्यायमूर्ती भरत चक्रवर्ती यांनी निरीक्षण नोंदवले की, याचिकाकर्तीचे वर्तन आणि तिची श्रद्धा हे ती हिंदू धर्माचे पालन करत असल्याचे स्पष्टपणे सिद्ध करतात. केवळ तिचे (लॉरा फ्रान्सिस) नाव ख्रिश्चन आहे किंवा ती अमेरिकेची नागरिक आहे. या कारणास्तव तिला हिंदू म्हणून मान्यता नाकारता येणार नाही. या महिलेला इतर कोणत्याही हिंदू स्त्री भक्ताप्रमाणे समान हक्क असतील. तिला अन्य भक्तांपेक्षा कोणत्याही विशेष विशेषाधिकार किंवा प्राधान्याचा दावा करता येणार नाही. या महिलेला मंदिरात प्रवेश आणि पूजा-अर्चना करण्याची परवानगी देताना मंदिर परिसरातील रूढी, परंपरा आणि आगम नियमांचे पालन करणे बंधनकारक असेल.

# इंडोनेशियात अमेरिकन वैमानिकाची गोळ्या झाडून हत्या! विमानालाही आग

■ याहुकिमो

**इंडोनेशियाच्या** पापुआ प्रांतातील याहुकिमो भागात फुटीरतावादी बंडखोरांनी अमेरिकन वैमानिकाची गोळ्या झाडून हत्या केली आणि विमानालाही आग लावली.



वेस्ट पापुआ नॅशनल लिबरेशन आर्मी या सशस्त्र फुटीरतावादी संघटनेने या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली.

निकोलस एफ. गॉसेलिन, असे मृत वैमानिकाचे नाव आहे. विमान वामेना शहरातून ७ स्थानिक प्रवाशांना घेऊन आले होते. विमानतळावर उतरल्यानंतर लगेचच बंडखोरांनी विमानाला वेढा घातला आणि वैमानिकाची गोळ्या झाडून हत्या करून विमानाला आग लावली. हे विमान पीटी एएमए या स्थानिक विमान कंपनीचे होते. जे दुर्गम भागात अन्न आणि इंधन पुरवण्याचे काम करते. त्यांनी हा हल्ला अमेरिका व इंडोनेशिया सरकारसाठी राजकीय संदेश असल्याचे म्हटले. विमान जळालेल्या अवस्थेत मिळाल्याला इंडोनेशियन अधिकाऱ्यांनी दुजोरा दिला. मात्र, प्रवाशांच्या सुरक्षिततेबाबत आणि वैमानिकाच्या मृत्यूच्या अधिकृत पुष्टीकरणाबाबत तपास सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. या भागामध्ये इंडोनेशियन सुरक्षा दल आणि स्थानिक बंडखोरांमध्ये गेल्या अनेक दशकांपासून संघर्ष सुरू आहे.

# कॅनडात वटवाघळाच्या दंशानंतर ११ वर्षांच्या मुलाचा रेबीजने मृत्यू

■ ओंटारियो

**कॅनडातील** एका ११ वर्षीय मुलाच्या चेहऱ्यावर वटवाघळाने दंश केल्याने त्याचा मृत्यू झाला. विशेष म्हणजे, त्याच्या चेहऱ्यावर वटवाघळाच्या दंशाच्या कुठल्याही खुणा नव्हत्या. तरीही त्याचा रेबीजने मृत्यू झाल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.



हा मुलगा सकाळी झोपून उठल्यानंतर त्याच्या चेहऱ्यावर वटवाघूळ बसल्याचे त्याला आढळले. त्याने वटवाघळाला झटकून बाजूला फेकले, तर त्याच्या वडिलांनी वटवाघळाला पकडून बाहेर सोडून दिले. मुलाच्या अंगावर चावल्याच्या किंवा ओरखड्याच्या कोणत्याही स्पष्ट खुणा नव्हत्या. तो पूर्णपणे निरोगी दिसत होता. त्यामुळे कुटुंबाने मुलावर लगेच उपचार केले नाहीत. १९ दिवसांनंतर त्याच्यात उलट्या होणे आणि चेहरा सुन्न होणे यांसारखी लक्षणे दिसू लागली. त्यानंतर त्याला आपत्कालीन विभागात दाखल करण्यात आले, तिथे डॉक्टरांनी त्याच्यावर उपचार केले. पण त्याला आधीच रेबिजचा प्रादुर्भाव झाला होता. त्याला जीवनरक्षक प्रणालीवर ठेवण्यात आले. दोन आठवड्यांहून अधिक काळ उपचार करूनही, मुलाची प्रकृती खालावतच गेली.

# दिल्लीत राहुल गांधींचे 'आय एम सॉरी'पोस्टर

■ नवी दिल्ली




**दिल्लीच्या** मंडी हाऊस परिसरात भाजपा नेते तजिंदर पाल सिंह बग्गा यांनी लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधींचे 'आय एम सॉरी'असे पोस्टर लावण्यात आले आहे. त्यात राहुल गांधींना कान धरलेले दाखवण्यात आले. केंद्रीय मंत्री शिवराज सिंह चौहान यांच्या मुलाबद्दल केलेल्या विधानावरून राहुल गांधी यांनी न्यायालयात खेद व्यक्त केला होता. या पार्श्वभूमीवर हे पोस्टर्स लावण्यात आले आहेत.

या पोस्टर्सवर राहुल गांधी यांचा कान पकडलेला फोटो लावून त्यांना 'माफीवीर'असे म्हटले गेले आहे. पोस्टर्सवर 'आय एम ओरी, आय एम सॉरी'असे लिहिण्यात आले असून, हे पोस्टर्स सोशल मीडियावरील एका प्रसिद्ध ट्रेंडशी जोडण्यात आले होते. प्रदेश उच्च न्यायालयात मानहानीच्या खटल्याप्रकरणी राहुल गांधी यांनी चुकीच्या माहितीसाठी लेखी खेद व्यक्त केला होता. त्यानंतरच दिल्लीत हे पोस्टर वॉर सुरू झाले.

# दिल्लीत सर्व खासगी शाळांना 'शालेय शुल्क समिती' बंधनकारक

■ नवी दिल्ली

**दिल्लीतील** खासगी शाळांमधील मनमानी शुल्कवाढीला पूर्णपणे आळा घालण्यासाठी दिल्ली सरकारने कठोर उपाययोजना केल्या. शिक्षणमंत्री आशिष सूद यांनी घोषणा केली की, दिल्लीतील सर्व खासगी विनाअनुदानित मान्यताप्राप्त शाळांना १५ जुलैपर्यंत शालेय स्तरावरील शुल्क नियमन समिती स्थापन करणे बंधनकारक असेल. समितीमध्ये समाविष्ट होणारे ५ पालक प्रतिनिधी आणि ३ शिक्षक प्रतिनिधी यांची निवड सार्वजनिक आणि व्हिडिओ रेकॉर्डिंगसह चिठ्ठी काढून केली जाईल. लॉटरी काढण्याच्या किमान ७ दिवस आधी शाळांना सार्वजनिक



सूचना देणे आवश्यक असेल आणि संपूर्ण प्रक्रियेवर सरकारने नियुक्त केलेल्या पर्यवेक्षकांकडून देखरेख ठेवली जाईल. ते पुढे म्हणाले की, हा निर्णय 'दिल्ली शालेय शिक्षण कायदा, २०२५' लागू झाल्यानंतर घेण्यात आला आहे.

# थायलंडमध्ये मुलाने गाडी यात्रेत घुसवली! ९ भिक्षूंचा मृत्यू

■ बँकॉक

**थायलंडमधील** मुकदाहान प्रांतात आज ११ वर्षीय मुलाने पिकअप गाडी पायी यात्रेत घुसवल्याने एकच गोंधळ उडाला. त्यात ९ भिक्षूंचा मृत्यू झाला. मुकदाहानच्या मुएंग जिल्ह्यात ३५ बौद्ध भिक्षू आणि ५ अनुयायींची २६० किलोमीटर अंतराची पायी यात्रा शेजारच्या उबोन रत्चाथानी प्रांतातील मंदिराकडे निघाली होती. या मुलाने आपल्या पालकांची परवानगी न



घेता पिकअप गाडी चालवली आणि सुमारे १० किमी अंतर पार केल्यानंतर त्याचे गाडीवरील नियंत्रण सुटले. तो भरधाव गाडी

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

थेट भिक्षूंच्या यात्रेत घुसली. अपघातातून वाचलेल्या 'फ्रा सोम्पॉन्ग' नावाच्या भिक्षूने सांगितले की, त्यांनी मुलाला गाडी चालवताना पाहिले आणि काही सेकंदांतच गाडीने मागून भिक्षूंना चिरडले. त्यामुळे अनेक भिक्षू फेकले गेले. त्यात ५ भिक्षूंचा घटनास्थळीच मृत्यू झाला.



# हेडगेवारांच्या नाटकाला ४५ लाख रोहित पवारांचा सरकारवर निशाणा

■ मुंबई

**राज्य** सरकारने राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संस्थापक डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांच्या जीवनावर आधारित युगप्रवर्तक - डॉ. हेडगेवार या नाटकाच्या सहा प्रयोगांसाठी ४५ लाख रुपयांच्या खर्चाला मंजुरी दिल्यानंतर राज्यात राजकीय वाद निर्माण झाला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट)चे आमदार रोहित पवार यांनी सरकारवर टीका केली.

रोहित पवार यांनी दोन्ही शासन निर्णयांची प्रत पोस्ट करत सरकारच्या प्राधान्यक्रमावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. त्यांनी म्हटले, स्वातंत्र्यलढ्यात काडीचंही योगदान नसलेल्या विभाजनकारी विचारसरणीच्या डॉ. हेडगेवार यांच्यावरील नाटकासाठी राज्य सरकारने ४५ लाख रुपये मंजूर केले. मात्र, छत्रपती शिवाजी महाराजांनंतर प्रतिकूल परिस्थितीतही स्वराज्य वाढवणाऱ्या, सांभाळणाऱ्या आणि बलिदान देणाऱ्या छत्रपती संभाजी महाराजांच्या कार्यक्रमासाठी १० लाख रुपये मंजूर केले. हा भेदभाव का? सरकारला नेमके काय दाखवायचे आहे? छत्रपतींना कमी लेखण्याचा व लोकांना मान्य नसलेली विचारसरणी त्यांच्यावर लादण्याचा हा प्रयत्न नाही ना? महाराष्ट्र हे कदापि सहन करणार नाही.दरम्यान धुळ्यात या नाटकचे पोस्टर पुरोगामी

# मुंबई लोकलमधील महिला सुरक्षेचे पोलिसांचे तास वाढविले

■ मुंबई

**मुंबई** लोकलमधून प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या, विशेषतः महिला प्रवाशांच्या सुरक्षेच्या दृष्टीने राज्य सरकारने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. आता लोकलच्या महिला डब्यांमध्ये रात्री ९ वाजल्यापासून सकाळी ८ वाजेपर्यंत पोलीस आणि होमगार्ड तैनात राहणार आहेत. यापूर्वी ही सुरक्षा व्यवस्था केवळ सकाळी ६ वाजेपर्यंतच मर्यादित होती. सकाळच्या वेळेत महिला डब्यांमध्ये वाढत्या गुन्हेगारीच्या घटनांबाबत चिंता व्यक्त करण्यात आल्यानंतर गृह राज्यमंत्री योगेश कदम यांनी विधान परिषदेत ही घोषणा केली. विधान परिषदेत आमदार रवींद्र फाटक यांनी मुंबई लोकलमधील वाढती गुन्हेगारी आणि प्रवाशांच्या सुरक्षेचा मुद्दा उपस्थित करत लक्षवेधी सूचना मांडली होती.

# सीए परीक्षेत नाशिकची साक्षी जैन देशात पहिली

■ मुंबई

**द** इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडियाने आज, ३ जुलै रोजी सीए फाऊंडेशन मे २०२६ परीक्षेचा निकाल जाहीर केला. यासोबतच ऑल इंडिया रँक गुणवत्ता यादीही प्रसिद्ध करण्यात आली आहे. या परीक्षेत नाशिकच्या साक्षी जैन हिने ४०० पैकी ३७१ गुण मिळवत ९२.७५ टक्क्यांसह देशात प्रथम क्रमांक पटकावला. या यादीतील पहिले तीन विद्यार्थी महाराष्ट्रातील आहेत. या परीक्षेत चंद्रपूरच्या अयानब्बास अजानी याने ३६७ गुणांसह (९१.७५ टक्के) दुसरा क्रमांक, तर पुण्याच्या राधा उन्मेश मुळे हिने ३६५ गुणांसह (९१.२५ टक्के) तिसरा क्रमांक मिळवला आहे. १४ ते २० मे या कालावधीत ही परीक्षा घेण्यात आली होती. अधिकृत आकडेवारीनुसार, देशभरातून ९०,२१७ उमेदवार परीक्षेला बसले होते. त्यापैकी १८,१२४ उमेदवार उत्तीर्ण झाले असून, परीक्षेचा एकूण निकाल २०.०९ टक्के लागला आहे.

जाहीर सूचना

तमाम नागरिकांना याद्वारे सूचित करण्यात येते की, उपरोक्त संस्थेतील दोन **सदनिका सिद्धी १०३ आणि १०४** या मूळ मालक **फिलोमिना ब्रिगेड डिसूझा** आणि **जीन आयरिस डिसुझा** यांचे नावे होत्या. त्यांच्या मृत्यूपश्चात या दोन्ही सदनिका त्यांचे **बंधू पीटर थॉमस डिसोजा** यांच्या नावे कायदेशीररित्या हस्तांतरित करण्यात आल्या होत्या. **पीटर थॉमस डिसोजा** यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या इच्छापत्रानुसार या सदनिका त्यांची विवाहित बहीण श्रीमती एलिस डिसोजा यांच्या नावे हस्तांतरित व्हाव्या यासाठी **श्रीमती ॲलिस डिसूजा** यांनी संस्थेकडे रीतसर विनंतीपत्र सादर केले आहे. याबाबत आपला/कुणाचा काही आक्षेप/तक्रार असल्यास पुढील **पंधरा दिवसात** संस्थेचे अध्यक्ष/ सचिव यांच्याकडे प्रत्यक्ष भेटून अथवा लेखी स्वरूपात सादर करावा.

सही/-
मा. अध्यक्ष/मा. सचिव
9422490705/8369676312

# मुंबई-गोवा महामार्गावर कंटेनर उलटला! चालक गंभीर जखमी

■ रत्नागिरी

**मुंबई-गोवा** महामार्गावरील अंजनारी घाटात आज पहाटे मुसळधार पावसात कंटेनर उलटून भीषण अपघात झाला. यात चालक गंभीर जखमी झाला असून, काही काळ तो कंटेनरच्या केबिनमध्ये अडकून पडला होता. अपघातामुळे महामार्गावरील वाहतूकही विस्कळीत झाली होती.

हा कंटेनर मुंबईहून गोव्याच्या दिशेने जात होता. लांजा तालुक्यातील अंजनारी घाटात पोहोचताच मुसळधार पाऊस आणि निसरड्या रस्त्यामुळे कंटेनर रस्त्याच्या कडेला उलटला. ही धडक एवढी जोरदर होती की, कंटेनरची केबिन चेंगरली आणि चालक त्यामध्येच अडकला. घटनेची माहिती मिळताच लांजा पोलीस, स्थानिक प्रशासन आणि बचाव पथके तातडीने घटनास्थळी दाखल झाली.

# अंधेरीत युनायटेड इमारतीला आग

**मुंबई** - अंधेरी पश्चिमेकडील गावदेवी डोंगर परिसरातील नूर मशीदजवळ असलेल्या युनायटेड सोसायटीच्या एसआरए इमारत क्रमांक २ ला आज सायंकाळी भीषण आग लागली. आगीच्या ज्वाळा आणि दाट धुरामुळे अनेक रहिवासी अडकले होते. जीव वाचवण्यासाठी काही रहिवाशांनी खिडक्यांमधून आणि बाल्कनीतून उड्या मारल्या. या घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दल, डी. एन. नगर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली.

# जळगाव-शहादा एसटीच्या छतातून गळतीने प्रवासी हैराण

■ जळगाव

**जळगाव**-शहादा एसटी बसच्या छतातून पावसाच्या पाण्याची गळती झाल्यामुळे प्रवासी हैराण झाले. अंगावर पाण्याच्या धारा सुरू झाल्यामुळे प्रवाशांना चक्क एसटीमध्ये बसून छत्री उघडी ठेवण्याची वेळ आली. त्यामुळे त्यांनी एसटी प्रशासनाविरोधात संताप व्यक्त केला.

या एसटीतून प्रवास करणाऱ्या ठाकरे गटाच्या महिला जिल्हाप्रमुख रोहिणी पाटील यांनी परिवहन मंत्र्यांनी गळक्या एसटीतून प्रवास करावा, अशा शब्दांत संताप व्यक्त केला. त्या पुढे म्हणाल्या की, शहादा स्थानकात आम्ही एसटीत बसलो होतो. काही अंतरावर गेल्यानंतर पाऊस पडताच एसटीच्या छतातून पाण्याची मोठी गळती सुरू झाली. या एसटीचे ७५ ते ८० टक्के छतातून पाणी गळत होते.

# सांगली जिल्हा बँकेतील नोकर भरतीला अखेर स्थगिती

■ सांगली

**सांगली** जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील ४४४ कनिष्ठ लिपिक पदांच्या बहुचर्चित नोकरभरती प्रक्रियेला अखेर राज्य शासनाच्या सहकार विभागाने स्थगिती दिली आहे. बँकेची निवडणूक प्रक्रिया सुरू झाल्यामुळे निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत ही भरती थांबवण्याचे आदेश जारी करण्यात आले आहेत. हा आदेश म्हणजे राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे नेते आमदार जयंत पाटील गटाला धक्का मानला जात आहे. या भरतीसाठी २४ जूनपासून ऑनलाईन अर्ज भरण्यास सुरुवात झाली होती. आयबीपीएस कंपनीमार्फत सुरू असलेल्या या प्रक्रियेला उमेदवारांनी प्रतिसाद दिला होता. १ जुलैअखेर बँकेकडे एकूण १४ हजार १५७ उमेदवारांनी अर्ज केले होते. त्यापैकी ५ हजार जणांनी परीक्षा शुल्कासह अर्ज पूर्ण केले होते, तर ९ हजार १५७ उमेदवारांचे अर्ज कागदपत्रांअभावी अपूर्ण होते.

वाडा नगरपंचायत
ता.वाडा, जि.पालघर
मु.पो.ता. वाडा जि. पालघर पिन - ४२१३०३.
www.wadanagarpanchayat.in nagarpanchayatwada@gmail.com
whatsapp no. 9922770550 TOLL FREE complaint no. 18002331180

जा.क्र. वानप/WADAOTW26270001454/२०२६ दि.०३/०७/२०२६

निविदा सूचना

मुख्याधिकारी वाडा नगरपंचायत यांचे तर्फे वाडा नगरपंचायत, जिल्हा पालघर अग्निशमन वाहन २४ तास तीन पाळीमध्ये १२ महिने कालावधीसाठी कंत्राटपद्धतीने चालविण्याकरिता अग्निशमन सेवार्थ (फायरमन व अग्निशमन वाहन चालक) मनुष्यबळ पुरवठा करणे करिता अभिकर्ता नेमणे, या कामासाठी निविदा फॉर्म प्राप्त करण्यासाठी, बयाणा रक्कम भरण्यासाठी व फॉर्म सबमिट करण्यासाठी दि. ०४/०७/२०२६ ते दि. १०/०७/२०२६ अखेर वेळ देण्यात येत आहे. या मुदतीत ठेकेदार यांनी बिनचूक तांत्रिक लिफाफ्यासह निविदा सादर कराव्यात. सदरचे टेंडर महाराष्ट्र शासनाच्या महा-ई-टेंडर www.mahaetenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
जा.क्र.१४५४/२०२६, दि. ०३/०७/२०२६

सही/-
(मनोज पष्टे)
मुख्याधिकारी
वाडा नगरपंचायत

MAHAVITARAN
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

TENDER NOTICE

| Sr. NO. | (Tender NO)/estimated Amt./Tender form fee/ EMD Amt./Name of work | Sale period of Tender ONLINE ONLY | Submission due date ONLINE ONLY |
|---|---|---|---|
| 1 | (SE/KC-II/HR/OS/ULH DN-I/2026-27/T-18)/Limited to Tender Amount Rs. 3,50,000,00/- Tender Fee- Rs. 5,900/- EMD Amount Rs. 1,75,000/- Providing Outsourced Skilled & Unskilled Manpower under Ulhasnagar Division –I, Kalyan Circle II (Office) & Kalyan Testing Division II. | From Dt. 30.06.2026 to 14.07.2026 | Dt. 14.07.2026 to 15.00 Hrs. |

Tenders are invited from eligible bidders for following works by **E-tendering method**
The bidders are requested to get registered for e-tendering procedure.
**Contact Person-** Executive Engineer (Adm.), Kalyan circle –II
**Tel No.** 0251-2328283-Ext No. 302, Mob:EE(Adm) 8879626969
**Add:** M.S.E.D.C.Ltd., Kalyan Circle-II (O&M), Tejshree Build., Third Floor, Kalyan (W)- 421 301
**Email-** sekalyan2@gmail.com/amhrkck2@gmail.com
**Website-** www.mahadiscom.in

# कल्याण-मुरबाड रेल्वेमार्गाच्या भूसंपादनाला हिरवा कंदील

**मुरबाड** - गेल्या अनेक दशकांपासून प्रलंबित असलेल्या बहुप्रतीक्षित कल्याण-मुरबाड नवीन रेल्वे मार्गाच्या कामाला गती मिळाली असून, भारत सरकार व केंद्रीय रेल्वे विभागाने १६ जून रोजी कल्याण तालुक्यातील बाधित जमीनमालकांची यादी प्रसिद्ध करून येत्या तीस दिवसांत हरकती व आपले मत व्यक्त करण्याची मुदत दिली आहे. यापूर्वी मुरबाड तालुक्यातील बाधित शेतकऱ्यांची हरकती व मत तत्कालीन प्रांत अधिकारी यांनी केंद्र सरकारला कळवले आहे.

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

ई-निविदा सूचना

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत

स्थापत्य विभाग, महावितरण, भांडुप कार्यालय अंतर्गत असणा-या विविध प्रकारच्या स्थापत्य कामांकरिता टी-३८(4th call), टी-३९(2nd call), टी-४०(2nd call), टी-४१(2nd call), आणि टी-४२ (२०२६-२७) अशा एकुण **पाच** निवीदा महावितरण कंपनीच्या www.mahadiscom.in या e-Tender च्या संकेतस्थाळावर उपलब्ध करण्यात आल्या आहेत. सदर निवीदा विक्रीसाठी **दि. ०४.०७.२०२६ पासून ते दि. १३.०७.२०२६ @१३.००** वाजेपर्यंत उपलब्ध राहतील व निवीदा भरण्याची अंतिम तारीख **दि. १३.०७.२०२६** ला **१५.००** वाजेपर्यंत आहे. निवीदेच्या आवृत्तीत/तारखा/ इ. कोणताही बदल झाल्यास, शुध्दीपत्र यापुढे आमच्या वेबसाईवर प्रकाशित केले जाईल.

(सही)
कार्यकारी अभियंता (स्था.) स्थापत्य विभाग भांडुप

Government of Maharashtra
Skill, Employment, Entrepreneurship and Innovation Department
**Directorate of Vocational Education and Training, Maharashtra State**
3, Mahapalika Marg, Post Box No. 10036, Mumbai 400001
Website: https://dvet.gov.in Email: desk13 @dvet.gov.in Phone: 022-22620603/0293

**Notice for Tender**

Directorate of Vocational Education and Training (DVET), Mumbai-01, under Skill, Employment, Entrepreneurship and Innovation Department, Government of Maharashtra invites proposals from reputed and experienced companies for participating in the competitive bidding process of Purchase of following items/Equipment under Daksh Scheme (world bank).

1. **Supply and Installation Workshop Tools and Equipment at Consignee Locations. (Tender ref No.26009/2026-27)**
2. **Supply and Installation Electrical-Electronics Trainers and Equipment at Consignee Locations. (Tender ref No.26010/2026-27)**

Interested bidders should visit the website www.mahatenders.gov.in for the tender document & detailed information from 02/07/2026 12:00 Hrs. Tender last date for submission of tender online will be 16/07/2026, 15:00 Hrs.
Place: Mumbai
Date: 02.07.2026

Sd/-
(Satish Suryawanshi)
Director,
Directorate of Vocational Education & Training, Maharashtra State, Mumbai,
Government of Maharashtra.

क्रमांकः आरओसी-२०२६-२७/क्र.५/सी १४७७

कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण
वैद्यकीय आरोग्य मुख्यालय
शुद्धीपत्रक

संदर्भ:- अभिव्यक्ती स्वारस्य क्र. ०२/२६-२७

कल्याण डोंबिवली महानगरपालिका हद्दीमध्ये महानगरपालिका मालकीचे कल्याण येथील कार्यरत निर्बिजीकरण केंद्रातून भटक्या व मोकाट श्वानांचे निर्बिजीकरण करणे, रेबिज रोगाचे लसीकरण करणे व जंतनाशक औषध देणेकरिता भारतीय जीव जंतू कल्याण मंडळ यांची मान्यता प्राप्त संस्थांकडून सन २०२६-२७ या पाच आर्थिक वर्षाकरिता नमूद केलेल्या अटी व शर्तीस अधीन राहून स्वारस्य अभिव्यक्ती निवेदन उक्त संदर्भान्वये प्रसिद्ध करण्यात आलेले आहे.

सदर अभिव्यक्ती स्वारस्याच्या प्री-बीड बैठकीच्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या सूचनांच्या अनुषंगाने अभिव्यक्ती स्वारस्याच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | तपशील | मूळ अट | सुधारीत अट |
|---|---|---|---|
| १ | सुरक्षा अनामत | सुरक्षा ठेव ही निविदा रकमेच्या ३ टक्के असेल. सदर ३ टक्के सुरक्षा अनामत पैकी १ टक्का (रु. १४,८५,०००/-) रक्कम कार्यादेशापुर्वी महानगरपालिकेकडे रोख स्वरुपात / धनाकर्षद्वारे किंवा बँक गॅरंटी स्वरुपात महानगरपालिकेकडे सादर करणे आवश्यक राहील. उर्वरित २ टक्के रक्कम संस्थेच्या प्रतिमाह देयकामधून सादर केलेल्या देयकाच्या रकमेच्या २ टक्के याप्रमाणे कपात करून घेण्यात येईल. | सुरक्षा अनामत रक्कम ३ टक्के असेल. सदर सुरक्षा अनामत पैकी ०.५ टक्के (रु.७,४२,५००/-) कार्यादेशापूर्वी महानगरपालिकेकडे रोख स्वरुपात /धनाकर्षद्वारे किंवा बँक गॅरंटी स्वरुपात महानगरपालिकेकडे सादर करणे आवश्यक राहील. उर्वरित २.५ टक्के रक्कम संस्थेच्या प्रतिमाह देयकामधून सादर केलेल्या देयकाच्या रकमेच्या २.५ टक्के प्रमाणे कपात करून घेण्यात येईल. |

सदर अभिव्यक्ती स्वारस्याची मुदत ही दि.१०/०७/२०२६ रोजी पर्यंत वाढविण्यात येत आहे.

सही/-
(डॉ. दिपा शुक्ल)
प्र.वैद्यकीय आरोग्य अधिकारी,
कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण.

जा.क्र.कडोंमपा/जसंवि/मुका/२५०
दिनांक : ०३/०७/२०२६

नवाकाळ
Email- contact@navakal.in
24x7 : www.navakal.in





# मीना कुमारींवरील बायोपिकची पटकथा पूर्ण

**चित्रपट** निर्मिती संस्था ऑलमाईटी मोशन पिक्चरने हिंदी चित्रपटसृष्टीतील दिवंगत आणि दिग्गज अभिनेत्री मीना कुमारी यांच्या जीवनावर आधारित आगामी चित्रपटाची पटकथा पूर्ण झाल्याची घोषणा केली आहे. या घोषणेसोबतच संस्थेने 'मीना कुमारी' या नावाच्या सर्व प्रकारच्या सिनेमॅटिक आणि दृकश्राव्य (ऑडिओ-व्हिज्युअल) वापराच्या विशेष व्यावसायिक हक्कांवर (ट्रेडमार्क) आपलाच कायदेशीर हक्क असल्याचे स्पष्ट केले आहे. संस्थेने जाहीर केले आहे की, त्यांच्या परवानगीशिवाय 'मीना कुमारी' या नावाचा वापर करून कोणताही चित्रपट, वेब सीरिज, टेलिव्हिजन निर्मिती, माहितीपट किंवा इतर कोणताही दृकश्राव्य प्रकल्प तयार केल्यास तो बेकायदेशीर मानला जाईल आणि संबंधितांवर कडक कायदेशीर कारवाई केली जाईल.

आपली कायदेशीर बाजू भक्कम करण्यासाठी आणि या ट्रेडमार्कचे संरक्षण करण्यासाठी निर्मिती संस्थेने आधीच विविध व्यापारी मासिके, प्रकाशने आणि राष्ट्रीय प्रसारमाध्यमांमध्ये जाहीर नोटीस प्रसिद्ध केली आहे. मीना कुमारी यांच्या बायोपिकची (चरित्रपट) ही पटकथा सुमारे चार वर्षांच्या सखोल संशोधन, लेखन आणि अथक परिश्रमानंतर पूर्ण झाली असून, येत्या काही महिन्यांत या चित्रपटाच्या प्रत्यक्ष चित्रिकरणाला सुरुवात होणार आहे.



# 'थप्पड क्वीन' उपाधीचे स्वागतच : सौम्या

'धुरंधर' या प्रसिद्ध चित्रपट मालिकेमध्ये अगदी मोजके संवाद असूनही अभिनेत्री सौम्या टंडन हिने आपल्या दमदार अभिनयाने प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले आहे. या चित्रपटात तिने रहमान डकैत या पात्राच्या पत्नीची म्हणजेच उल्फत रहमानची भूमिका साकारली आहे. 'धुरंधर' आणि 'धुरंधर २: द रिव्हेंज' या दोन्ही भागांमध्ये तिने संवाद नसताना केवळ आपल्या डोळ्यांतील भावना, दुःख, राग आणि संयमाच्या जोरावर ही भूमिका जिवंत केली. मात्र, या सगळ्यामध्ये प्रेक्षकांच्या मनात सर्वात जास्त घर करून राहिले ते म्हणजे चित्रपटातील तिचे थप्पड मारण्याचे दृश्य. या दृश्यांमुळे तिला चित्रपटसृष्टीत 'बॉलीवूडची नवी थप्पड क्वीन' ही अनधिकृत पदवी मिळाली आहे. यावर प्रतिक्रिया देताना सौम्या हसून म्हणाली, मी हे कौतुक म्हणून स्वीकारते. पण ते दृश्य केवळ थप्पड मारण्यापुरते मर्यादित नव्हते. त्यामागे प्रचंड मानसिक संघर्ष, भावना आणि वेदना दडलेली होती. माझ्या अभिनय कारकिर्दीतील हे सर्वात कठीण दृश्य होते. त्यामागची पार्श्वभूमी आणि त्यानंतरच्या भावनांवर मला जास्त काम करावे लागले. पुढे बोलताना ती म्हणाली की, खरं तर मला रणवीरला थप्पड मारायची नव्हती. कॅमेऱ्याच्या कोणत्यातरी ट्रिकने हे दृश्य पूर्ण व्हावे अशी माझी इच्छा होती. पण रणवीर स्वतः सतत मला सांगत होता की 'तू बिनधास्त मार.' शेवटी त्याने स्वतः माझा हात पकडला आणि म्हणाला 'मार दे'. त्यानंतर मात्र मला तो सीन करावाच लागला.



# पारुल गुलाटीची ८ लाखांची फसवणूक

**अभिनेत्री** आणि उद्योजिका पारुल गुलाटी हिच्या व्यवसायाला मोठा फटका बसला असून, तिच्या बंगळुरू येथील स्टोअरमध्ये ८ लाख रुपयांची फसवणूक झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. पारुलने सोशल मीडियावर एक व्हिडिओ शेअर करत या प्रकरणाचा भांडाफोड केला आहे. तिने आरोप केला आहे की, तिच्या स्टोअरमधील दोन कर्मचाऱ्यांनी ग्राहकांकडून येणारे पैसे कंपनीच्या अधिकृत खात्यात न भरता स्वतःच्या वैयक्तिक खात्यात वळवून कंपनीची आर्थिक लूट केली आहे. या घटनेनंतर पारुलने पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार नोंदवली आहे.

पारुलने या फसवणुकीत सहभागी असलेल्या दोन कर्मचाऱ्यांचे फोटोही जाहीर केले आहेत. तिने सांगितले की, काही दिवसांपासून स्टोअरच्या कामकाजात तिला आर्थिक तफावत जाणवत होती, परंतु नक्की काय गडबड सुरू आहे हे तिला समजत नव्हते. या संशयातूनच तिने बंगळुरू आउटलेटला अचानक भेट दिली आणि सत्य समोर आले.


पारुलने खुलासा केला की, स्टोअरच्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे ॲक्सेस असलेल्या सेल्स एक्झिक्युटिव्हने अचानक आजारी असल्याचे सांगून सुट्टी घेतली होती, तर स्टोअर मॅनेजर कामावर हजर होता. चौकशी दरम्यान, मॅनेजरने नोकरीला लागल्यानंतर एका महिन्यापासूनच आपण फसवणूक करण्यास सुरुवात केल्याची कबुली दिली. पहिल्या महिन्यात व्यवसायाची पद्धत समजून घेऊन त्यानंतर या दोघांनी मिळून हातसफाई सुरू केली होती, असे पारुलने म्हटले आहे. ग्राहकांनी कोणतीही खरेदी करताना नेहमी बिल मागावे आणि पेमेंटची माहिती अधिकृत असल्याची खात्री करावी, असा सल्लाही तिने दिला आहे.



# २५ वर्षांनी आमीर-आशुतोष पुन्हा एकत्र

**भारतीय** चित्रपटसृष्टीतील मैलाचा दगड ठरलेल्या 'लगान' चित्रपटानंतर तब्बल २५ वर्षांनी अभिनेता आमीर खान आणि दिग्दर्शक आशुतोष गोवारीकर ही जोडी एका नव्या स्पोर्ट्स ड्रामा चित्रपटासाठी पुन्हा एकत्र येत आहे. या बहुप्रतिक्षित चित्रपटाचे नाव 'ललकार' असे निश्चित करण्यात आले आहे. हा चित्रपट भारताचे दिग्गज क्रिकेटपटू लाला अमरनाथ यांच्या जीवनावर आधारित असून, यात १९४७ च्या भारत-पाकिस्तान फाळणीची पार्श्वभूमी पाहायला मिळणार आहे. 'लगान'प्रमाणेच हा चित्रपटही क्रिकेटच्या खेळाभोवती फिरणारी एक अत्यंत भावनिक आणि प्रभावी कथा असणार आहे. ऑक्टोबर २०२६ मध्ये याच्या प्रत्यक्ष चित्रिकरणाला सुरुवात होणार आहे. या चित्रपटाचे आणखी एक मोठे वैशिष्ट्य म्हणजे याचे लेखन प्रसिद्ध दिग्दर्शक राजकुमार हिराणी आणि अभिजित जोशी यांनी केले आहे, तर 'एक्सेल एंटरटेन्मेंट' या चित्रपटाची निर्मिती करत आहे.

हा नवा चित्रपट पुन्हा एकदा सिनेसृष्टीत नवा इतिहास रचणार का, याकडे आता संपूर्ण आणि लागले बॉलिवूडचे प्रेक्षकांचे लक्ष आहे.



# शाहरुखचे पाऊल अमेरिकन क्रिकेटविश्वात

**बॉलीवूडचा** प्रसिद्ध अभिनेता शाहरुख खान आणि नाइट रायडर्स ग्रुपने अमेरिकेतील क्रिकेट विश्वात एक ऐतिहासिक पाऊल टाकत लॉस एंजेलिस येथे नवनिर्मित नाईट रायडर्स क्रिकेट ग्राऊंडचे शानदार उद्घाटन केले आहे. या मैदानावर मेजर लीग क्रिकेटचा (एमएलसी) पहिला महत्त्वाचा सामना खेळवून या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या क्रीडांगणाचे औपचारिक लोकार्पण करण्यात आले. या ऐतिहासिक उद्घाटनपर सामन्यात यजमान लॉस एंजेलिस नाइट रायडर्स आणि वॉशिंग्टन फ्रीडम हे संघ आमनेसामने आले होते. अमेरिकेच्या क्रीडा जगतात क्रिकेटचा विस्तार करण्याच्या दृष्टीने ही घडामोड अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे.

जागतिक स्तरावर कोणत्याही खाजगी क्रिकेट फ्रँचायझीने स्वतः उभारलेले हे पहिलेच आंतरराष्ट्रीय निकषांचे क्रिकेट स्टेडियम आहे. नाईट रायडर्स ग्रुपने जागतिक दर्जाच्या क्रीडा पायाभूत सुविधांमध्ये मोठी गुंतवणूक करून या खेळाच्या प्रगतीसाठी आपली दीर्घकालीन बांधिलकी सिद्ध केली आहे. हे मैदान 'इंटरनॅशनल क्रिकेट कौन्सिल'च्या (आयसीसी) जागतिक मानकांनुसार तयार करण्यात आले असून, यात मुख्य मैदानावर आठ खेळपट्ट्या आणि १२० फूट उंचीचे सहा भव्य प्रकाशझोत (फ्लडलाइट) टॉवर बसवण्यात आले आहेत. या भव्य मैदानाच्या उभारणीसाठी तब्बल ३२ हजार मेट्रिक टन माती हलवून काम करण्यात आले आहे.




# पनवेल महापालिकेकडून लोककल्याण मेळावा आयोजन

■ पनवेल

**पंतप्रधान** पथविक्रेता आत्मनिर्भर निधी योजनेअंतर्गत लाभार्थ्यांपर्यंत योजनेचा अधिक व्यापक लाभ पोहोचविणे, नव्या पथविक्रेत्यांचा समावेश करणे, वित्तीय व्यवहारास चालना देणे तसेच डिजिटल व्यवहारांना प्रोत्साहन देणे या उद्देशाने आयुक्त मंगेश चितळे यांच्या सूचनेनुसार पनवेल महानगरपालिकेच्या दीनदयाळ अंत्योदय योजना, राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियानांतर्गत २ जुलै रोजी सुवर्ण दुर्ग कामाठे प्रभाग कार्यालय येथे लोक कल्याण मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. उपायुक्त अभिषेक पराडकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा मेळावा घेण्यात आला.

मेळाव्याकरीता सहाय्यक आयुक्त डॉ. रूपाली माने उपस्थित होत्या. तसेच यावेळी मार्गदर्शक म्हणून जिल्हा अग्रणी बँकेचे व्यवस्थापक विजय कुलकर्णी, अन्न सुरक्षा अधिकारी सचिन आढाव उपस्थित होते.




# उल्हासनगरमधील २५० ग्राहकांचा वीजपुरवठा युद्धपातळीवर पूर्ववत

■ कल्याण

**शुक्रवारी** सकाळी दहा वाजता दरम्यान अतिवृष्टी सुरू असताना उल्हासनगर येथील सुभाष टेकडी परिसरात मेथडिस्ट मराठी चर्च समोर भलेमोठे आंब्याचे झाड महावितरणच्या लघुदाब वाहिनीवर पडले. त्यामुळे लघू दाब वाहिनीचा पोल पूर्णपणे वाकला. परिणामी लाईनीत असणारे ४-५ पोलची लघुदाब वाहिन्या जमिनीवर पडल्या. परिणामी २५० वीज ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित झाला.

या घटनेची माहिती मिळताच, उल्हासनगर उपविभागाचे लालचक्की शाखेचे कर्मचारी तत्काळ घटनास्थळी पोहोचले आणि खबरदारीचा उपाय म्हणून वीजपुरवठा खंडीत करून युद्धपातळीवर काम सुरू केले. दुपारीच लघुदाब वाहिनीचा नवीन पोल उभा करून तुटलेल्या सर्व लघुदाब वाहिन्या पूर्ववत केल्या. परिणामी दुपारीच सुभाष टेकडी रोड परिसरातील २५० ग्राहकांचा वीजपुरवठा सुरळीत करणे शक्य झाले.

# एफडीए आयुक्त तुकाराम मुंढेंची दूध उत्पादक-विक्रेत्यांकडे नजर

■ मुंबई

**महाराष्ट्र** अन्न आणि औषध प्रशासनाचे (एफडीए) आयुक्त तुकाराम मुंढे यांनी आता दूध उत्पादक, दुग्धजन्य पदार्थांची निर्मिती करणारे, दुधाचे पॅकिंग करणारे आणि अंतिमतः या पदार्थांची घाऊक विक्री करणारे अशा संपूर्ण साखळीकडे लक्ष घातले आहे. नुकतीच या उद्योगातील व्यावसायिकांची मुंढे यांनी बैठक घेतली.

या बैठकीत दूध आणि दुग्धजन्य पदार्थांचा दर्जा आणि सुरक्षेसंबंधीचे सर्व नियम कटाक्षाने पाळण्याचे निर्देश मुंढे यांनी दिले. याची माहिती मुंढे यांनी आज पत्रकार परिषदेत दिली. मे २०२६ मध्ये एफडीएच्या आयुक्तपदाची जबाबदारी स्वीकारल्यापासून मुंढे यांनी सर्वप्रथम अन्न भेसळविरोधात राज्यव्यापी मोहीम सुरू केली. त्यानंतर राज्यात बंदी घातलेल्या गुटख्याची बेकायदेशीर विक्री करणारे, बनावट औषधे आणि बेकायदेशीर अन्न व्यवसायांवर धडक कारवाया केल्या. अन्न आणि औषध सुरक्षा अंमलबजावणी अधिक कडक केली.

त्यानंतर आता त्यांनी दूध आणि दुग्धजन्य पदार्थांच्या व्यवसायाला शिस्त लावण्याचा निर्णय घेतला आहे. याबद्दल माहिती देताना मुंढे यांनी सांगितले की, भारतीय अन्न सुरक्षा आणि मानके प्राधिकरणाने (एफएसएसएआय) २०११ मध्ये जारी केलेले आठ नियम दूध आणि दुग्धजन्य पदार्थांचे उत्पादन, निर्मिती आणि विक्री करणाऱ्या सर्व व्यावसायिकांना लागू आहेत.

# उद्धव ठाकरेंनंतर एकनाथ शिंदे ७ जुलैला परभणी दौरा करणार

■ मुंबई

**उबाठा** पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या परभणी दौऱ्यानंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे ७ जुलैला परभणी दौऱ्यावर जाणार आहेत. शिंदे गटात प्रवेश केलेले खासदार संजय जाधवांनी आयोजित केलेल्या शेतकरी संवाद मेळाव्यात ते सहभागी होणार आहेत. उद्धव ठाकरे यांची साथ सोडून सहा खासदार शिंदे गटात दाखल झाले. त्यानंतर पक्ष संघटना मजबूत करण्यासाठी आणि बंडखोरांवर हल्लाबोल करण्यासाठी उद्धव ठाकरे यांनी २७ ते २९ जूनदरम्यान परभणी, हिंगोली आणि धाराशिव या मतदारसंघांचा दौरा केला होता. या दौऱ्यात मोठ्या प्रमाणात शक्तिप्रदर्शनही करण्यात आले होते. आता उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा परभणी दौरा होत असल्याने मराठवाड्यातील राजकीय वातावरण पुन्हा तापण्याची चिन्हे आहेत.

# आज 'एशियाटिक'ची निवडणूक! नवी स्थगिती याचिका फेटाळली

■ मुंबई

**दक्षिण** मुंबईतील एक ऐतिहासिक आणि अत्यंत महत्त्वाची संस्था असलेल्या एशियाटिक सोसायटीची निवडणूक उद्या शनिवारी ४ जुलै रोजी नियोजित वेळेनुसार होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.कारण निवडणूक प्रक्रियेतून वगळल्याने अन्याय झाल्याचा दावा करत निवडणुकीला आव्हान देणारी नवीन याचिका मुंबई उच्च न्यायालयाने फेटाळून लावली आहे.निवडणूक कार्यक्रमाच्या या टप्प्यावर हस्तक्षेप करण्यासारखे हे प्रकरण नाही, असे निरीक्षण न्यायमर्ती निजामुद्दीन जमादार यांनी यावेळी नोंदवले.

एशियाटिक सोसायटी ऑफ मुंबईच्या व्यवस्थापन समितीच्या निवडणुकीसाठी तयार करण्यात आलेल्या मतदार यादीतून नाव



बेकायदेशीरपणे वगळण्यात आल्याचा आरोप करत सदस्य ज्योती नाडर यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे.या याचिकेत धर्मादाय आयुक्तांनी निवडणूक प्रक्रियेत केलेला हस्तक्षेप तसेच निवडणूक अधिकारी यांनी ९ जून रोजी जारी केलेले पत्र रद्द करण्याची मागणी केली आहे. या याचिकेवर काल गुरुवारी न्यायमूर्ती जमादार यांच्या एकलपीठासमोर सुनावणी घेण्यात

## उच्च न्यायालयाचा हस्तक्षेपास नकार

आली. त्यावेळी याचिकाकर्त्यांनी युक्तिवाद करताना न्यायालयाला सांगितले की,त्या संस्थेच्या वैध सदस्य असून त्यांना सदस्यत्व कार्ड देण्यात आले आहे.सदस्यत्व शूल्क स्वीकारण्यात आले असून त्याचे नूतनीकरण करण्यात आले आहे.

# महिला वसतिगृहाच्या कामासाठी म्हाडाच्या निविदेला प्रतिसाद नाही

■ मुंबई

**नोकरदार** महिलांना राहण्यासाठी ताडदेव एमपी मील कंपाऊंड येथे म्हाडा वसतिगृह बांधणार आहे. मात्र बांधकामाच्या ठेकेदार नियुक्तीसाठी काढलेल्या निविदेत त्याची वार्षिक उलाढाल ६० कोटी रुपये असावी अशी अट घातली होती. या अटीमुळे निविदेला प्रतिसाद मिळाला नाही. आता ही अट शिथिल करून पुन्हा निविदा काढली जाणार आहे.

एमपी मील कंपाऊंडमध्ये म्हाडा ६२ कोटी रुपये खर्चून २२ मजली उंचीचे महिलांसाठी वसतिगृह बांधणार आहे. ३९२ महिलांना राहण्यासाठी ३०० चौरस फूट क्षेत्रफळाच्या १९६ सदनिका बांधण्यात येणार आहेत. या बांधकामासाठी म्हाडाने फेब्रुवारी महिन्यात निविदा काढली होती.

यामध्ये निविदा भरणाऱ्या ठेकेदाराची वार्षिक आर्थिक उलाढाल किमान ६० कोटी रुपये असावी अशी अट होती. या अटीमुळे निविदेला प्रतिसाद मिळू शकला नाही. आता वार्षिक उलाढालीची ६० कोटी रुपयांची अट रद्द करून त्या ऐवजी ७ कोटीवर आणली जाणार आहे आणि पुन्हा नव्याने निविदा काढली जाणार आहे.

# सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेचा तबबल १४७ कोटींचा निधी पडून

## पुढील दोन वर्षांत खर्च करण्याचा प्रयत्न

■ सिंधुदुर्ग

**केंद्रीय** पंधराव्या वित्त आयोगाचा तबबल १४७ कोटी रुपयांचा निधी सिंधुदुर्ग जिल्हा परिषद, पंचायत समित्या आणि ग्रामपंचायतींनी पूर्णपणे खर्च केला नसल्याची माहिती समोर आली आहे. हा अखर्चिक निधी पुढील दोन वर्षांत पूर्णपणे खर्च केला नाहीतर भविष्यात १६ व्या वित्त आयोगाचा निधी मिळणे अवघड होऊ होणार आहे.

२०२०-२१ ते २०२५-२६ या सहा वर्षांच्या कालावधीत केंद्राच्या पंधराव्या वित्त आयोगांतर्गत सिंधुदुर्ग जिल्ह्याला ३४४ कोटी ६९ लाख रुपये निधी प्राप्त झाला आहे. त्यापैकी जिल्ह्यातील ग्रामपंचायतींकडे ९४ कोटी ९ लाख रुपये, आठ पंचायत समित्यांकडे २५ कोटी ५७ लाख रुपये, तर जिल्हा परिषदेकडे २७ कोटी ७३ लाख रुपये असा एकूण १४७ कोटी ३९ लाख रुपयांचा निधी अद्याप पडून आहे.हा निधी खर्च केलेला नाही.हा निधी पुढील दोन वर्षांत खर्च करणे गरजेचे आहे.अन्यथा त्याचा परिणाम आगामी १६ व्या वित्त आयोगाचा निधी मिळवण्यावर होण्याची शक्यता आहे. जिल्हा परिषदेचे अध्यक्ष प्रमोद कामत यांनी प्रकरणाची गांभिर्याने दखल घेत पुढील दोन वर्षांत हा अखर्चिक निधी १०० टक्के खर्च करण्याचे प्रयत्न केले जातील, असे म्हटले आहे.

# देहरजी धरण प्रकल्पग्रस्तांना प्रति हेक्टर २५ लाखांची भरपाई

■ पालघर

**विक्रमगड** तालुक्यातील देहरजी मध्यम प्रकल्पामुळे बाधित झालेल्या राज्य शासनाने प्रति हेक्टर अंदाजे २५ लाख ४३ हजार इतकी वाढीव भरपाई मंजूर केली आहे.

देहरजी मध्यम प्रकल्पातून ९५.६० दशलक्ष घनमीटर (२५५ एमएलडी) इतकी पाणी साठवण क्षमता निर्माण होणार आहे. या प्रकल्पामुळे वसई-विरार महानगरपालिकेसह क्षेत्रासह मुंबई महानगर प्रदेशातील सुमारे १५ लाख नागरिकांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होणार आहे. या धरणाचे सुमारे ८५ टक्के बांधकाम पूर्ण झाले आहे. या प्रकल्पामुळे खुडेद, साखरे, जांभे तसेच परिसरातील इतर आदिवासी गावे बाधीत होत आहेत. प्रकल्प बाधितांना भरपाईची प्रक्रिया विविध कारणांमुळे रखडली होती. दरम्यान, शासन स्तरावर अनेक फेऱ्यांच्या बैठका व सविस्तर चर्चेनंतर जमिनींच्या मूल्यांकनाचा प्रलंबित प्रश्न अखेर मार्गी लागला आहे.

# न्यायमूर्ती गौतम पटेल यांच्या सुरक्षेसंदर्भातील अहवाल गुप्त ठेवा

## हायकोर्टाचे राज्य सरकारला निर्देश

■ मुंबई

**मुंबई** उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती गौतम पटेल यांना मिळालेल्या धमक्या आणि हल्ल्यांच्या तपासासंदर्भात मुंबई पोलीस आणि परराष्ट्र मंत्रालयाने सादर केलेले दोन अहवाल सार्वजनिक केले जाणार नाहीत याची खबरदारी घ्या, असे निर्देश उच्च न्यायालयाने गुरुवारी राज्य सरकारला दिले. प्रभारी मुख्य न्यायमूर्ती रवींद्र घुगे आणि न्यायमूर्ती गौतम आंखड यांच्या खंडपीठाने सरकारला २६/११ दहशतवादी हल्ल्याच्या थेट प्रक्षेपणाची आठवण करून देत हे निर्देश दिले.

न्या. पटेल आणि त्यांच्या कुटुंबियांना गेल्या ११ महिन्यांपासून धमक्यांचा सामना करावा लागत आहे. त्यांनी एप्रिल २०२४ मध्ये दिलेल्या एका निकालात सय्यदना मुफद्दल सैफुद्दीन यांना दाऊदी बोहरा समुदायाचे आध्यात्मिक प्रमुख आणि ५३ वे दाई अल-मुल्ताक यांचे कायदेशीर उत्तराधिकारी ठरवले होते. त्या निकालामुळे न्यायमूर्ती गौतम पटेल यांच्या सुरक्षेला धोका निर्माण झाला आहे. याची गंभीर दखल घेत प्रभारी मुख्य न्यायमूर्ती रवींद्र घुगे यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठाने राज्य सरकारला पोलीस तपास आणि परराष्ट्र मंत्रालयाचे अहवाल सार्वजनिक न करण्याचे निर्देश राज्य सरकारला दिले. २६/११ दहशतवादी हल्ला आणि सशस्त्र दलांच्या कारवाईचे सतत प्रक्षेपण झाल्यामुळे हल्लेखोरांना कोणती कारवाई केली जात आहे, हे समजण्यास मदत झाली.


## नवाकाळ शब्दकोडे-१६५६

**आडवे शब्द –**

१. तृण, चारा ३. बेरकी, धूर्त ६. नाशवंत ८. जेमतेम, कष्टपूर्वक ११. रमलेला १३. घर १५. चंगळ, वैपुल्य १७. मृत्यूनंतरचा १९. त्रासदायक २०. एक बैल जुंपलेली गाडी २२. थप्पी २३. हाडांच्या पोकळीतील द्रव, बोन मॅरो २४. जेवणाचे ताट २६. अमान्य २८. माजलेला ३०. अवैध ३२. नियंत्रण, काबू ३३. अनंग, कामदेव ३५. जड ३८. कळी ४०. भीड, रीघ ४१. ग्राम ४२. उंची जाजम ४४. अनुचित, अयोग्य ४५. शंकर-पार्वतीचा आवडता बैठा खेळ ४८. मोठे रंगीत दाणे असलेले कडधान्य ५२. कैफ, धुंदी ५३. पोकळ डामडौल ५६. गावचा वार्षिक उत्सव ५७. चाळीस चोरांच्या कथेतील नायक ५९. तुच्छ ६१. तांब्या, लोटा ६३. कपाळाला झालेली जखम ६४. याग, यज्ञ ६५. पिकलेला ६६. खोचक, उपरोधपूर्ण ६७. टोपली ६९. बोध, आकलन ७०. त्रास, छळ ७१. फणसातला मगज ७२. दिलगिरी, माफी ७४. नाक, नासिका ७५. शकुन बघण्याची कथित विद्या ७८. वल्लरी, वेल ८१. साधुवाण्याची मुलगी ८३. बैरागी ८५. पतीची दुसरी पत्नी ८६. सोटा, लाठी ८७. व्यवस्थित ८८. नम्रता, विनय ९०. अतिशय स्थूल स्त्री ९२. विहीर ९३. कोवळी फांदी ९४. कांतिमान, ओजस्वी ९५. दूध, क्षीर ९७. नीर, पाणी ९८. किल्ला ९९. परकेपणा १००. शीतल १०२. शंकराचे एक वर्णन १०५. चिमणीचे घरटे, स्त्रियांचा अंबाडा १०६. सूची, जंत्री १०७. फुलपाखराचे पूर्वरूप १०९. आईचा भाऊ ११०. किरकोळ, फुटकळ १११. बुद्धी ११२. खास पाहुणचार

**उभे शब्द –**

१. शत्रूवर छुपा हल्ला करणारा २. सुटकेचा मार्ग, उपाय ३. घराची, कचेरीची मोठी वास्तु ४. वाळवंट, वालुकामय प्रदेश ५. विनाविलंब ७. रंगेल, छंदीफंदी ८. उपजत आवड ९. एकसारखे, साच्यातून काढल्यासारखे १०. ताकद, बल १२. उन्माद झालेला १४. नाहक, विनाकारण १५. हल्या, महिष १६. जिलेबीबरोबरचे ताक १८. गोळा, लपका १९. अमलात आणलेला नियम-कायदा २१. सुती कापडावर केली जाणारी रंगीत कारागिरी २२. पहारा २५. गाणे २७. टणक, न दबणारे २८. ताकदीच्या जोरावर सत्ता राबवणे २९. केंद्रभाग ३०. मोकाट, अनियंत्रित ३१. अरण्य ३२. दैना, दुरवस्था ३४. अनुभव नसलेला, प्रशिक्षणार्थी ३६. प्रखर, उग्र ३७. अधिकार ३९. पिठीसाखर ४३. पत्रास, बूज ४६. झाडाचे पर्ण, पुस्तकाचे पृष्ठ ४७. ठोंब्या, ढ ४९. मोठा ५०. मालाची किंमतीसह यादी ५१. मळलेले ५४. ओळख ५५. ढिल्ला, ढगळ ५७. सरपटणारा महाकाय प्राणी ५८. बिचारा ६०. दिखाऊ, नट्टापट्टा करणारा ६१. नजर, दृष्टिक्षेप ६२. वर्ष, संवत्सर ६३. आगळीक, कुरापत ६४. मृत्यू आणणारा देव ६८. रांगोळी ६९. निःश्वास ७०. हत्ती, वारण ७३. कण्याचे खालचे हाड ७६. पितृ पंधरवडा ७७. यौवन, नवी पालवी ७९. त्वरित ८०. नाहक, विनाकारण ८२. बडबड्याबोळ, बोजवारा ८४. देवापुढे जाळले जाणारे सुगंधी द्रव्य ८५. सगळ्या ठिकाणी ८७. खैर, आशादायक स्थिती ८९. तराजू ९१. मडक्याचा तुकडा ९६. जुन्या रुपयातले एकूण आणे ९९. माध्यान्ह १००. शय्या, अंथरुण १०१. श्वापदाचे पंजे १०२. बावळट, खुळा १०३. दक्षिणी आमटी १०४. मिळकत, प्राप्ती १०५. न्यून, उणीव १०६. दोस्त, मित्र १०७. अमृत, मुलींचे एक नाव १०८. वंदनीय १०९. भडिमार, वर्षाव •



**नवाकाळ कोडे क्रमांक १६५५ चे उत्तर**

**आडवे शब्द** : २. दसरा ५. हमरीतुमरी १०. प्रतिहल्ला ११. जलतरण १२. अवसर १४. विनय १५. काकाकुवा १८. अजागळ १९. यकृत २१. ताक २२. घुम्या २३. बडदास्त २४. वाईट २६. शवासन २८. थेंब २९. कोडगा ३०. नीरा ३३. दीर ३५. डगला ३८. जवखार ४०. टन ४२. सकळीक ४४. जहर ४५. शासन ४७. फटका ४९. पाव ५०. प्रबल ५२. रायते ५५. बालंट ५७. सहज ५८. मोका ५९. गहाळ ६१. गडप ६२. साहस ६३. करवत ६७. कटक ६९. मनधरणी ७१. फारकत ७५. अरिष्ट ७६. नवती ७८. रड्डू ७९. गवत ८०. डिझेल ८१. गवार ८२. अती ८३. आयतन ८४. लय ८६. वाळूक ८७. प्राज्ञा ८८. बाप ९०. चंट ९१. थाप ९२. सहारा ९४. भरवसा ९६. जव ९७. कोप ९९. रातवा १०१. आरसा १०२. यजमान १०५. लकाकी १०७. डच्चू १०८. फरक १०९. मैदान ११०. शरमिंदा १११. चौरस ११२. पूरक ११३. पाणी

**उभे शब्द** : १. संप्रदाय २. दहशतवादी ३. मसलत, सल्ला ४. आलय ५. हरकाम्या ६. मणका ७. मही ८. गवगवा ९. थोर ११. जनक १२. अजा १३. सळई १४. वितान १६. कुपड १७. वाडगा १८. अस्तनी २०. कृश २२. घुबड २५. टक्कर २७. सरस २९. कोलाहल ३१. राजनय ३२. फटफटी ३४. अळीव ३६. गजबज ३७. निशा ३९. खाज ४१. नट ४३. कपाट ४६. सराव ४८. काबाडकष्ट ५०. प्रहसन ५१. टिकाव ५३. तेग ५४. टोळ ५६. लोचट, कामुक ५७. मत मान्य होणे ५८. मोरणी ६०. हानी ६३. करडू ६४. तफावत ६५. टोक ६६. बेअक्कल ६८. कनवाळू ७०. धरती ७२. रतनबाव ७३. तडित ७४. फोलकट ७७. वरकस ७९. गय ८१. गवा ८२. अफरातफर ८३. आज्ञा ८५. यथावकाश ८७. प्राची ८९. पसायदान ९०. चंद्रमा ९३. हारा ९४. भरपूर ९५. रसा ९६. जल ९८. पडदा १००. वारस १०३. जन १०४. नराणी १०६. कीर

# शाळांच्या ५०० मीटर परिसरात 'स्टिंग' एनर्जी ड्रिंक विक्रीस बंदी

पान १ वरून

१० नमुने प्रमाणित आढळले आहेत. मात्र, नियमांमध्ये बसते म्हणजे ते पूर्णपणे सुरक्षित आहे, असे म्हणता येणार नाही. या पेयामध्ये सुमारे ७२ मिलीग्रॅम कॅफिन, टॉरिन आणि जवळपास ३४ टक्के साखर आहे. हे मिश्रण मुलांना या पेयाचे व्यसन लावणारे ठरू शकते. एवढेच नव्हे, तर उत्पादक कंपनीनेच पेयाच्या बाटलीवर लहान मुले, गर्भवती आणि स्तनपान करणाऱ्या महिलांसाठी ते योग्य नसल्याचे नमूद आहे.

स्टिंग पेय प्यायल्यावर तासभर एनर्जी खूप वाटते. त्यानंतर एनर्जी डाऊन होते. त्यामुळे मग ते पुन्हा प्यावेसे वाटते, त्याची नशा लागल्यासारखे होते. हे पेय प्यायल्याने मधुमेह होऊ शकतो, हृदयाचा त्रास होतो. उत्पादकांनी स्वत:च हे पेय २४ तासांत २ बाटल्यांपेक्षा जास्त न पिण्याचा इशारा दिला आहे. असे असताना ते शाळांच्या परिसरात सहजपणे विकले जाते. अन्न व औषध प्रशासनाने यापूर्वी ३ ऑक्टोबर २०२४ आणि १७ जानेवारी २०२५ रोजी परिपत्रक काढले होते. मात्र प्रत्यक्षात त्याची प्रभावी अंमलबजावणी होत नाही. 'स्टिंग'च्या बाटलीवर तंबाखूजन्य पदार्थांप्रमाणे मोठ्या आणि ठळक अक्षरांत आरोग्याविषयीचा इशारा छापणे बंधनकारक करावे, १८ वर्षांखालील मुलांना 'स्टिंग'ची विक्री करण्यावर बंदी घालण्यासाठी स्वतंत्र नियम करावे, तंबाखूजन्य पदार्थांप्रमाणे शाळांच्या परिसरात 'स्टिंग'च्या विक्रीवरही निर्बंध घालावेत आणि त्यासाठी आयुक्तांना स्पष्ट आदेश द्यावे, विक्रेत्यांकडे या पेयाच्या आरोग्यावरील धोक्याची माहिती देणारे फलक लावणे बंधनकारक करावे. तसेच १८ वर्षांखालील मुलांना हे पेय विकणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्याची तरतूद करावी.

यावर उत्तर देताना मंत्री नरहरी झिरवळ म्हणाले की, शाळांच्या परिसरात 'स्टिंग'ची विक्री होत असल्याचे निदर्शनास आले आहे. शाळा आणि क्लासेसच्या परिसरात पालक, मुले आणि मुख्याध्यापकांना शाळेपासून ५०० मीटरच्या परिसरात या एनर्जी ड्रिंकच्या विक्रीवर बंदी घालण्याचे निर्देश दिले आहेत. या पेयाची विक्री शाळेच्या परिसरात ५०० मीटरच्या आत आढळली, तर त्यांच्यावर कारवाई केली जाईल.

# सलग तिसऱ्या दिवशी पावसाचा कहर मुंबई, ठाणे, पालघरला आज रेड अलर्ट

पान १ वरून

कोट्यवधी रुपये खर्चून नव्याने उभारण्यात आलेले नवे सभागृह उद्घाटनापूर्वीच पाण्याखाली गेले. अंधेरी सबवेमध्ये सुमारे दोन फूट पाणी साचल्याने तो वाहतुकीसाठी बंद करण्यात आला. नवी मुंबईत मुसळधार पावसामुळे ठाणे-बेलापूर महामार्ग आणि सायन-पनवेल मार्गावर वाहतूक संथ गतीने सुरू होती. कोपरी पुलावर ट्रक बंद पडल्याने वाहनांच्या रांगा लागल्या. एपीएमसीमधील कांदा-बटाटा मार्केट तर भिवंडीतील तीनबत्ती भाजी मार्केट परिसरात गुडघाभर पाणी साचले होते. पालघर जिल्ह्यात मुंबई-अहमदाबाद महामार्गावर मोठा खड्डा पडल्याने अनेक वाहनांचे नुकसान झाले. साकीनाका येथे मॅनहोलमध्ये पडून अस्लम शेख यांचा मृत्यू झाल्यानंतरही मुंबईतील अनेक ठिकाणी मॅनहोल उघडी असल्याचे उघडकीस आले आहे. अंधेरी पश्चिमेतील नवरंग सिनेमासमोरील रस्त्यावर मॅनहोलचे झाकण गायब झाले होते, तर अंधेरीतील सुमारे ५० ठिकाणी झाकणे तुटल्याचे उघडकीस आले. मनसेने प्रशासनाला एका दिवसात ती बसवण्याचा इशारा दिला आहे. सायनच्या प्रतीक्षानगर परिसरातही एक मॅनहोल अर्धवट उघडा असल्याचे दिसून आले.

संततधार पावसामुळे लोणावळ्यातील भुशी धरण ओव्हरफ्लो झाले. मागील ४८ तासांत या भागांत २२९ मिमी पावसाची नोंद झाली. पुण्यातील सिंहगड, कुसगाव खिंड आणि वरंधा घाट परिसरात दरडी कोसळल्याने वाहतुकीवर परिणाम झाला. सिंहगडाकडे जाणारा मार्ग काही काळ बंद ठेवण्यात आला. रत्नागिरी-नागपूर महामार्गावर दख्खन ते कळकदरा दरम्यान दरडी कोसळल्याने एकेरी वाहतूक बंद करण्यात आली. रायगड जिल्ह्यात मुसळधार पावसामुळे २८ धरणांच्या पाणीपातळीत मोठी वाढ झाली असून, सुतारवाडी, पाभरे, संदेरी आणि खैरे ही धरणे शंभर टक्के भरली आहेत. परशुराम घाटात डोंगरावरील पाणी वाहून नेण्यासाठी उभारलेले काँक्रीटचे बांधकाम पहिल्याच पावसात वाहून गेले. सिंधुदुर्ग जिल्ह्यात खळनाथ मंदिराचे छप्पर कोसळले. सातारा जिल्ह्यात पाचगणी मार्गावरील पसरणी घाटात दरड कोसळल्याने काही काळ एकेरी वाहतूक सुरू ठेवावी लागली.

कोल्हापूर जिल्ह्यात पंचगंगा नदीवरील शिंगणापूर बंधारा ओव्हरफ्लो झाला असून, तेथील वाहतूक पूर्णपणे बंद करण्यात आली. विदर्भातही पावसाचा जोर कायम असून, गोंदिया जिल्ह्यात सलग तिसऱ्या दिवशी पाऊस झाला. गोरेगाव तालुक्यातील बबई-कमरगाव मार्गावरील पुलावरून पाणी वाहत असल्याने वाहतूक बंद करण्यात आली.

# पुणे-मुंबई-ठाणे-पालघरमध्ये पावसामुळे दुर्घटनांची मालिका

**पुणे-** राज्यात पावसामुळे घडलेल्या दुर्घटनांमध्ये ६ जणांचा मृत्यू झाला आहे. भाईंदर पश्चिमेतील राई गावात स्कूटरवरून जात असताना नारळाचे झाड अंगावर कोसळल्याने ३५ वर्षीय राहुल पाटील यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. दोन दिवस त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू होते. विरार पूर्वेतील कुंभारपाडा बंधाऱ्यात पोहण्यासाठी गेलेल्या २१ वर्षीय अभिषेक राजभर या तरुणाचा बुडून मृत्यू झाला.

पुण्यातील लोणी काळभोर परिसरात सांडपाणी आणि पावसाच्या पाण्याच्या निचऱ्यासाठी खोदलेला खड्डा उघडा ठेवल्याने दोन वर्षीय सोहम लखन कसबे याचा पाण्यात बुडून मृत्यू झाला. घरासमोर खेळत असताना त्याचा पाय घसरून तो खड्ड्यात पडला. या प्रकरणी संबंधित ठेकेदाराविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कल्याण-डोंबिवली येथे विजेच्या तारेला स्पर्श झाल्याने २६ वर्षीय शशी राहुल चक्र मृत्युमुखी पडला. तर ठाण्यातील मुंब्रा येथे पावसाच्या पाण्यात उतरलेल्या १७ वर्षीय आलियाचा विजेचा धक्का लागून मृत्यू झाला. पालघर जिल्ह्यातील चहाडे गावातील २८ वर्षीय किशन वरठा हा मासेमारीसाठी नदीत उतरला असताना पुराच्या पाण्यात वाहून गेला.

MAHAVITARAN
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.
**TENDER NOTICE**
Tenders are invited for printing & supply of pre-printed computer stationery for LT- IP Bill with Estimated Cost of Rs. 90.17 Lakhs against MSEDCL advertised Tender on website vide no. MMD/T-LTM-11/0726 due for submission on dtd. 21-07-2026. For details please visit website: https://etender.mahadiscom.in/eatApp/
HO PR 153/26 Chief Engineer (MMD)

# बॉम्बे पोर्ट ट्रस्टच्या गोदींचे खासगीकरण! श्रीमंतांच्या यॉटसाठी मरिना उभारणार

पान १ वरून

मरिना उभारला जाणार आहे. ज्यात पंचतारांकित हॉटेल, जलतरण तलाव, भव्य मत्स्यालय, सिनेमागृह, क्रिकेट व इतर खेळांसाठी स्पोर्ट्स जिमखाना, महागडी रेस्टॉरंट, सायकल ट्रॅक साकारला जाईल. यासाठी लवकरच निविदा काढण्यात येणार आहेत.

व्हिक्टोरिया व प्रिन्सेस डॉकवर अतिश्रीमंतांसाठी हा स्वप्नवत मरिना उभारला जाणार आहे. त्याचवेळी इंदिरा डॉकवर जहाजातून माल उतरविणे व चढविण्याचे मुख्य काम खासगी कंपन्यांना दिले आहे. आतापर्यंत हे काम डॉकचे १९०० कर्मचारी उत्तमपणे करीत होते. दरवर्षी त्यांच्या कामाची कमान वाढत होती. असे असूनही उत्पन्नाचा हा स्त्रोत गोदीकडे न ठेवता खासगी कंपन्यांना देण्यात आला आहे. उत्पन्नाचा स्त्रोत खासगी कंपन्यांना देऊन गोदीची सफाई, वीजपुरवठा, सुरक्षा व्यवस्था ही सर्व जबाबदारी मात्र गोदीवर टाकली आहे. केंद्र सरकारच्या या खासगीकरणाच्या निर्णयाने गोदी कामगार संतप्त आहेत.

# विक्रोळीत शिवसैनिकाच्या मृत्यूमुळे तणाव

पान १ वरून- स्थानिक आमदार सुनील राऊत तातडीने रुग्णालय परिसरात दाखल झाले. चेतनच्या मृत्यूला रुग्णालय व्यवस्थापन आणि डॉक्टरांचा हलगर्जीपणा कारणीभूत आहे, असा आरोप राऊत यांनी केला. तसेच पालिकेच्या भूखंडावर उभारून खासगी संस्थेकडून चालविले जात असलेले हे रुग्णालय बंद करण्याची मागणी राऊत यांनी केली. या रुग्णालयात सर्वसामान्यांना कसल्याही सोयी-सुविधा मिळत नाही. रुग्णालयात चांगले डॉक्टर नाहीत. त्यामुळे रुग्णालयात दाखल होणारे पन्नास टक्के रुग्ण दगावतात. चेतनला साधा ताप आला होता. त्याला डॉक्टरांनी इंजेक्शन दिले. त्यानंतर त्याला थंडी-ताप आला आणि आदल्या रात्री स्वतःच्या पायांनी चालत रुग्णालयात दाखल झालेल्या चेतनचा एका रात्रीत अचानक मृत्यू झाला, हे संशयास्पद आहे, असे राऊत म्हणाले.

# चार शेतकऱ्यांची आत्महत्या

पान १ वरून

अनसरवाडा येथील अल्पभूधारक शेतकरी गुणवंत व्यंकटराव माने (६५) यांनीही आर्थिक विवंचना आणि कर्जबाजारीपणाला कंटाळून शेतात आत्महत्या केली. गुणवंतराव माने यांच्या कुटुंबावर गेल्या काही वर्षांत अनेक दुर्दैवी घटना घडत होत्या. त्यांच्या एका मुलीचा सर्पदंशाने मृत्यू झाला. त्यानंतर धाकटा मुलगा विजेचा धक्का लागून दगावला होता. तर आणखी एका मुलाचे कर्करोगाने निधन झाले. सलग तीन अपत्यांच्या मृत्यूच्या धक्क्यातून कुटुंब सावरत असतानाच आर्थिक अडचणींनी ग्रासलेल्या गुणवंतराव यांनी टोकाचे पाऊल उचलले. सोनखेड येथील मारुती मनोहर सोळुंके (३६) या तरुण शेतकऱ्याने २५ जून रोजी राहत्या घरी गळफास घेतला. कुटुंबियांनी त्यांना तातडीने लातूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले होते. मात्र, दोन दिवस मृत्यूशी झुंज दिल्यानंतर २७ जून रोजी त्यांचे निधन झाले.

या जाहीरातीद्वारे कळविण्यात येते आहे की, मे. अेटीएल प्रॉपर्टीज एलएलपी (पूर्वीची अमरतारा प्राइव्हेट लिमिटेड) चे मालक श्री.अर्जून स्वरूप सर्व्हे नं. ८ सिटी सर्व्हे नं. १९१/अ/क/ १ साकी विहार रोड पवई मुंबई ४०००७२ या आस्थापनेच्या जागेचे एकुण क्षेत्रफळ ३३१९.२० चौ. मीटरचे आहे. सदरची आस्थापना दिनांक ३१ डिसेंबर २०२५ रोजी सतत तोटा होत असल्यामुळे बंद झाली. तथापि, सदर जागेचा विकास/विक्री/ हस्तांतरण करावयाचे आहे. त्यामुळे मे.अेटीएल प्रापर्टीज एलएलपी (पूर्वीची अमरतारा प्राइव्हेट लिमिटेड) कंपनीचा पत्ता साकी विहार रोड पवई मुंबई नं ४०००७२ सर्व्हे नं. ८ सिटी सर्व्हे नं. १९१ / अ / क / १ मौजे तुगा ता–कुर्ला जिल्हा मुंबई उपनगर या आस्थापनेत पूर्वी काम केलेल्या सर्व कायम कामगार द्य कर्मचारी / तात्पुरते, कंत्राटी तसेच प्रशिक्षणार्थी व कामगारांची व त्यांच्या संघटनेची कामगारांच्या कायदेशीर देण्याबाबत दावे/तक्रारी/जागेचे व्यावस्थापक यांच्या विरुद्ध असल्यास त्याबाबतची लेखी तक्रार कागदपत्राच्या पुराव्यासहित कामगार उप आयुक्त मुंबई उपनगर (पूर्व) यांचे कार्यालय पहिला मजला कामगार भवन सी–२०ई–ब्लॉक, बांद्रा–कुर्ला संकुल, बांद्रा (पूर्व) मुंबई ४०००५१ अथवा मे.अेटीएल प्रॉपर्टीज एलएलपी (पूर्वीची अमरतारा प्राइव्हेट लिमिटेड) साकी विहार रोड पवई मुंबई.४०००७२ यांच्याकडे जाहीर नोटीस/सुचना प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत सादर करावी. या कालावधी नंतर दाखल केलेली तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही व अशा दाव्याची दखल न घेता ते अशा व्यक्ती कामगार व कामगारांचे वारसदार यांनी त्यांचे हक्क सोडले आहेत व ते आमच्यावर बंधनकारक नाहीत असे समजून आम्ही पुढील कारवाई करू याची संबधितांनी नोंद घ्यावी ही विनंती.
मे.अेटीएल प्रॉपर्टीज एलएलपी (पूर्वीची अमरतारा प्राइव्हेट लिमिटेड सही–श्री. श्री.अर्जून स्वरूप (मालक)

**जाहीर सूचना**
मुंबई येथील बॉम्बे शहर दिवाणी न्यायालयामध्ये
वाणिज्य सत्र दावा क्र. ८६/२०२२ मध्ये
अंमलबजावणी अर्ज क्र. १७०/२०२३
(जामनगर येथील प्रमुख वरिष्ठ दिवाणी न्यायाधीश यांच्या न्यायालयामध्ये)
जय जलाराम एक्सट्रूजन )
नोंदणीकृत भागीदारी संस्था )
त्यांचे भागीदार, कपिलभाई हर्षदराय जोबनपुत्रा यांच्या द्वारे ) ... अर्जदार/
पत्ताः प्लॉट क्र. ४०११-४०१२ ) डिक्री धारक/
आणि ४०३९-४०४०
जीआयडीसी, फेज-III, दारेड, ) मूळ वादी
जामनगर - ३६१००४.
विरुद्ध
हितेश स्विचगिअर ) ... प्रतिवादी/
पत्ताः ए/१३२, १३३ अन्सा इंडस्ट्रीयल) बचावपक्ष/
इस्टेट, साकीविहार रोड, साकीनाका, ) निवाडा
अंधेरी (पूर्व), मुंबई ४०००७२ ) ऋणको
जप्त केलेल्या मालमत्तेवर दावा असणाऱ्या सर्व संबंधित व्यक्तींना बॉम्बे शहर दिवाणी आणि सत्र न्यायालय नियम, १९४८ च्या नियम ३४२ अन्वये सूचना
ज्याअर्थी स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता वॉरंट दिनांक २० नोव्हेंबर २०२५ च्या अनुषंगाने, शेरीफ यांनी उपरोल्लेखित अर्जदार/डिक्री धारक/मूळ वादी यांच्या विनंतीनुसार उपरोल्लेखित प्रतिवादींच्या ताब्यात असलेले ए/१३२, १३३, अन्सा इंडस्ट्रीयल इस्टेट, साकीविहार रोड, साकिनाका, अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०००७२ येथे वसलेले आणि स्थित असलेले हक्क, शीर्षक, हितसंबंध जाहीर लिलावाद्वारे विक्री करण्याचे निर्देश दिले आहेत.
उपरोल्लेखित मालमत्तेमधील हक्क किंवा वरील प्रभार दावे असणाऱ्या सर्व व्यक्तींना (जप्तीमध्ये समाविष्ट दावे आणि त्यास असलेले आक्षेप या व्यतिरिक्त) याद्वारे सूचना देण्यात येते की, त्यांनी दि. ३१ ऑगस्ट, २०२६ रोजी किंवा त्यापूर्वी अशा हक्क, शीर्षक, दावे किंवा प्रभारांचे शपथ किंवा पुष्टीकरणाद्वारे प्रमाणित प्रतिज्ञापत्र या कार्यालयामध्ये सादर करावे.
दिनांक १४ जानेवारी, २०२६
आपले विश्वासू,
(शोनाली के. दिघे)
अकाऊंट्स घेण्याकरिता आयुक्तांद्वारे आदेश /पत्र दि. १६.०६.२०२६ नुसार दि. १६ जून, २०२६ रोजी सुधारित (लाल शाईमध्ये)
(शिक्का)
अकाऊंट्स घेण्याकरिता आयुक्त
उच्च न्यायालय, मुंबई
कक्ष क्र. ५०५, ५०६, ५११, ५ वा मजला, वोकहार्ट इमारत क्र. ५, जी.टी. रुग्णालय कंपाऊंड, मुंबई-४०० ००१.

महाराष्ट्र शासन
अपर जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचे कार्यालय
जुने जकात घर, शहिद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१
दुरध्वनी क्र.:- ०२२-६१००१३ ई-मेल :-addcollmumbai@gmail.com
**जाहिर नोटीस (अपील क्र. ३७ / २०२६)**
मारय एल्सन अँन्थोनी नाडार ....अपिलार्थी
विरुध्द
उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी-०१ धारावी पुनर्विकास प्रकल्प झो.पु.प्रा.व इतर ०५ ....उत्तरार्थी
प्रति,
१. अध्यक्ष/सचिव
आझादनगर ए वॉर्ड सहकारी गृहनिर्माण संस्था,
टी. एच. कटारिया मार्ग, सेंट्रल रेल्वे कॉलनी,
माटुंगा मुंबई- ४०० ०१९. ...उत्तरार्थी क्र.०२
२. मुथ्थू सेट थावर
रूम नं. ए-२७७ आझादनगर ए वॉर्ड, सेंट्रल रेल्वे कॉलनी,
टी.एच. कटारिया मार्ग, माटुंगा मुंबई-४०० ०१९ ...उत्तरार्थी क्र.०६
सदर जाहिर नोटीसीद्वारे आपणांस सुचित करण्यात येते की, अपिलार्थी यांनी महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३५ अंतर्गत मा. अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी, मुंबई शहर, पहिला मजला, जुने जकात घर, शहिद भगतसिंग रोड, फोर्ट, मुंबई ४००००१ येथे **आझादनगर ए वॉर्ड सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या परि-II मधील अ.क्र. ५९९ वर अँथोनी थॉमस नाडार यांचे नाव नमुद असून / आपणाकडुन खरेदी केलेली असून सदर संस्थेच्या परि II मधील अ.क्र. ५९९ वरील आपले नाव कमी करून स्वतः चे नाव समाविष्ट करून पात्र करणेसाठी अपिलार्थी यांनी अपील अर्ज दाखल केलेला आहे. प्रश्नांकित/दावा केलेली झोपडी आपणांकडून खरेदी केलेली असल्याने आपणांस उत्तरार्थी क्र. ०६ केले आहे.** तसेच संस्था यांना उत्तरार्थी क्र. ०२ केले आहे. प्रकरणी दि. २२.०६.२०२६ रोजीचे सुनावणीमध्ये आपण गैरहजर असल्याने मा. अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी, मुंबई शहर यांनी आपणांस पुढील सुनावणी तारखेबाबत जाहिर नोटीसीद्वारे अवगत करणेचे निर्देश दिले आहेत.
तरी सदर जाहिर नोटीसीद्वारे आपणांस सुचित करण्यात येते की, सदर प्रकरणामध्ये आपण उत्तरार्थी क्र. ०२ व ०६ असून, **दि. ०९.०७.२०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता** मा. अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी, मुंबई शहर यांचे दालनात सुनावणी आयोजित केलेली आहे. तरी सदर सुनावणीस आपण उपस्थित / हजर राहून, आपली बाजू मांडावी. उपरोक्त नमूद केलेल्या दिवशी आपण स्वतः अथवा आपले प्राधिकृत प्रतिनिधी उपस्थित न राहिल्यास, आपणास काहीही सांगावयाचे नाही, असे गृहित धरून प्रकरणी गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल, यांची नोंद घ्यावी.
सही/-
(अजितकुमार भटे)
सहाय्यक महसुल अधिकारी
अपर जिल्हाधिकारी कार्यालय,
मुंबई शहर

**सुशिला सदन को. ऑप. हौ.सो.लि.,**
विजय नगर रोड, दामोदर नगर, नालासोपारा (पू), ता. वसई, जि. पालघर, ४०१२०९
**विशेष सर्वसाधारण सभेची नोटिस**
सुशिला सदन को. ऑप. हौ.सो.लि., विजय नगर रोड, दामोदर नगर, नालासोपारा (पू), ता . वसई, जि . पालघर ४०१२०९ या संस्थेची विशेष सर्वसाधारण सभा, दि**नांक १९/०७/२०२६ रोजी, कंचन हायस्कूल हॉल, दत्त नगर, विरार रोड, नालासोपारा (पू), ता. वसई, जि. पालघर ४०१२०९** ह्या ठिकाणी सकाळी ११.३० वाजता आयोजित होणार असून, ही सभा अध्यक्ष **श्री. अजय विष्णु उपाध्याय** यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात येणार आहे, तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित राहावे, ही विनंती .
या संस्थेची पूर्णविकास प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी दिनांक २५/०५/२०२६ रोजी संस्थेच्या पटांगणामध्ये विशेष सर्वसाधारण सभा सायंकाळी ६ वाजता घेण्यात आली होती. आणि त्या संस्थेमध्ये आपल्या सोसायटीचा विकास करण्यासाठी आलेल्या विकासकांच्या प्रस्ताव पत्रिका वाचन सर्व सभासदांच्या समोर ठेवण्यात आल्या. त्या सर्व प्रस्ताव पत्रिकामधुन आपण आपल्या सोसायटीच्या पुर्णविकास कार्यासाठी **मे. ॲडकॉन सुगंधी इन्फ्राप्रोजेक्ट्स एल. एल. पी.** ह्या कंपनीची नेमणूक सर्वानुमते करण्यात आली. तसेच त्यांना पूर्णविकासासाठी संस्थेचे विकासक म्हणून नियुक्ती पत्र देण्यात आलेले आहे .
**सभेमधील विषय**
१. मागील झालेल्या सभेचे इतिवृत्त वाचन व मंजुरी घेणे .
२. आपल्या सोसायटीच्या पुर्नविकासासाठी नियुक्त केलेले विकासक **मे. ॲडकॉन सुगंधी इन्फ्राप्रोजेक्ट्स एल. एल. पी.** ह्यांना वैयक्तिक संमतीपत्र तसेच एकत्रित संमतीपत्र स्वाक्षऱ्या करून सर्व सभासदांकडुन देण्यात येईल .
३. मा. अध्यक्ष, सचिव व खजिनदार हयांच्या परवानगीने मांडले जाणारे इतर विषयांवर चर्चा करण्यात येईल .
**सभेची दिनांक व वेळ : दिनांक १९/०७/२०२६, सकाळी ११.३० वाजता**
**सभेचा पत्ता : कंचन हायस्कूल हॉल, दत्त नगर, विरार रोड, नालासोपारा (पू), ता. वसई जि. पालघर ४०१२०९**
**ठिकाण : नालासोपारा**
**दिनांक : ०२/०७/२०२६**
**श्री. अजय विष्णु उपाध्याय (अध्यक्ष) श्री. राजाराम गोविंद पाटिल (सचिव) श्री. सहदेव विठोबा चव्हाण (खजिनदार)**
**सभासदांना सुचना**
१ . पूरेश्या गणसंख्येअभावी सभा ठरवलेल्या वेळेस सुरू न झाल्यास सभा तहकूब करून सदर सभा अर्ध्या तासाने त्याच ठिकाणी घेण्यात येईल व ह्या सभेस गणसंख्येचे बंधन असणार नाही, तरी त्या सभेमध्ये घेण्यात आलेले निर्णय सर्व सभासदांवर बंधनकारक राहतील .
२. कृपया नोंद घ्यावी की, सदर सोसायटीतील फक्त जो फ्लॅट धारक आहे त्याच सभासदाला सदर सभेमध्ये प्रवेश मिळणार आहे.
३. जर कुणी सभासद वृध्द अथवा हजर राहण्यात असमर्थ असेल तर त्यांनी अधिकृत पत्र व योग्य कारणासहित योग्य वारसदारा सोबत पाठवावे, एकाच वेळी दोघांस प्रवेश निशिध्द आहे.
४. ज्या व्यक्तिने अजूनही मुळ दस्तावेज दिलेले नसतील त्यांनी याच दिवशीच याच ठिकाणी सुपूर्द करणे आवश्यक आहे.
५. सर्व सभासदांनी खालील कागदपत्रे घेऊन सभेला यायचे आहे .
• आधारकार्डाची प्रत
• लाईटबिल
• पॅन कार्ड
• स्वतःची मालमत्ता असल्याची इनडेक्स प्रत
• पासपोर्ट साईज ४ फोटो .
**टिप : सभेला सर्व सभासदांची उपस्थिती बंधनकारक राहील.**

# चीनमधील प्रसिद्ध काचेच्या पुलाला छत्रीच्या टोकाने ठोकल्यामुळे तडे



**बीजिंग -** चीनच्या हेनान प्रांतात पर्यटनासाठी प्रसिद्ध असलेल्या बाओक्वान क्लिफ वर्ल्ड सीनिक एरिया येथील काचेच्या पुलावर मुलाने छत्रीच्या टोकदार टोकाने वारंवार ठोकल्यामुळे पुलाला तडे गेले. त्यामुळे सुरक्षेचा उपाय म्हणून हा काचेचा पूल तातडीने रिकामी करून बंद करण्यात आला. हे ठिकाण चीनमधील सर्वोच्च दर्जाचे पर्यटन स्थळ आहे. या पुलाच्या व्यवस्थापनाने स्पष्ट केले की, हा पूल ट्रिपल-लॅमिनेटेड सेफ्टी ग्लास(तीन थरांच्या मजबूत काचेने) बनवलेला आहे. छत्रीच्या आघातामुळे केवळ सर्वात वरच्या संरक्षणात्मक थराला तडा गेला होता. तर खालचे दोन थर पूर्णपणे सुरक्षित आणि भक्कम होते. त्यामुळे पुलाच्या मुख्य संरचनेला कोणताही धोका नव्हता. घटनेनंतर बाधित झालेला भाग तात्पुरता बंद करून काचेचे पॅनेल बदलण्याचे काम सुरू करण्यात आले.

# टाटांचा अपमान केला न् ...

**डेट्रॉईटच्या** त्या थंडगार बोर्डरूममध्ये, काचेच्या भिंतींपलीकडून अमेरिकेचं करडं आकाश डोकावत होतं, आणि समोर बसलेल्या रतन टाटांच्या चेहऱ्यावरचं स्मित एका क्षणात, जणू दिव्यावर फुंकर मारावी तसं विझून गेलं. त्यांच्या हातातला पेन क्षणभर थबकला. समोरचा कागद, ज्यावर भारताचं एक स्वप्न लिहिलं जाणार होतं, आता एखाद्या शवपेटीच्या फळीसारखा भासू लागला. खिशातल्या एका जुन्या रुमालावर बोटं नकळत घट्ट आवळली गेली - तोच रुमाल, ज्यावर कधीकाळी त्यांच्या आईने भरतकाम केलं होतं. आणि जो रतन टाटा कठीण प्रसंगी नेहमी सोबत बाळगत.

ही गोष्ट इथे, या एका क्षणी, सुरू झाली नव्हती. हिचं मूळ त्याही आधी, भारताच्या मातीत, घामाच्या एका थेंबातून रोवलं गेलं होतं.

एकोणीसशे अठ्ठ्याण्णव साली टाटा समूहाने टाटा इंडिका बाजारात आणली होती - भारतीय बुद्धीने, भारतीय मातीत, भारतीय हातांनी घडवलेलं एक स्वप्न, चाकांवर उभं राहिलेलं. पुण्याच्या त्या कारखान्यात हजारो कामगारांनी रात्रीचा दिवस केला होता, आपल्या घामाचा प्रत्येक थेंब त्या पत्र्यांत, त्या इंजिनांत ओतला होता - कुणाच्या मुलीचं लग्न त्या पगारावर अवलंबून होतं, कुणाच्या मुलाचं शिक्षण. ही फक्त एक कार नव्हती.हे लाखो भारतीय कुटुंबांचं एकत्रित स्वप्न होतं, धातूत ढाळलेलं.

पण त्याकाळी भारताकडे बघण्याची जगाची नजरच वेगळी होती. एखाद्या जुन्या हवेलीतल्या धुळकट आरशासारखी - ज्यात प्रतिबिंब उमटतं, पण स्पष्ट कधीच दिसत नाही. 'मेड इन इंडिया' हा शब्द ऐकला की, परदेशी बोर्डरूम्समध्ये एक तुच्छतेची छटा उमटायची, जणू भारत म्हणजे फक्त मसाल्यांचा, हत्तींचा आणि गरिबीचा देश, अभियांत्रिकीच्या मंदिरात ज्याला प्रवेशच नाही.

इंडिकाला पहिल्या वर्षी अपेक्षित यश मिळालं नाही, आणि तोट्याच्या त्या अंधारात टाटा समूहाने कार व्यवसाय विकायचा निर्णय घेतला. आणि म्हणूनच रतन टाटा स्वतः आपल्या टीमसह, अटलांटिक ओलांडून अमेरिकेत, फोर्डच्या दारात, एका भारतीय स्वप्नाचा सौदा करायला गेले - जसं एखादा बाप आपल्या दुबळ्या मुलाला मोठ्या घरात दत्तक द्यायला निघावा, मनात हजार शंका घेऊन, पण आपल्या माणसांच्या भाकरीसाठी स्वाभिमानही गिळायला तयार होऊन.



> बिल फोर्डच्या ओठांतून ते वाक्य बाहेर पडलं आणि त्या क्षणी जणू अख्ख्या खोलीतली हवाच गोठली. तुम्हाला पॅसेंजर कार व्यवसायातलं काहीच कळत नाही. हा करार न करून मी तुमच्यावर मोठे उपकारच करतोय.

आणि तिथेच, त्या थंड अमेरिकन गुर्मीने भारतीय अस्मितेवर वार केला. तुम्हाला या व्यवसायातलं काहीच कळत नाही हे वाक्य फक्त रतन टाटांना उद्देशून नव्हतं - ते जणू अख्ख्या भारतीय उपखंडाला, त्याच्या शतकानुशतकांच्या ज्ञानाला, पुण्याच्या त्या कारखान्यातल्या घामेजल्या हातांना उद्देशून होतं. ज्या देशाने एकेकाळी जगाला शून्याची देणगी दिली, त्याच देशाला आज एका कार कंपनीच्या बोर्डरूममध्ये अडाणी ठरवलं जात होतं.

रतन टाटा त्याचक्षणी काहीच बोलले नाहीत. त्यांचा चेहरा दगडासारखा स्थिर राहिला, पण डोळ्यांच्या कडा किंचित ओलावल्या - आणि ती ओल त्यांनी लपवली. एखाद्या योद्ध्याने रणांगणावर आपली जखम लपवावी तशी. विमानात परतताना खिडकीबाहेर ढगांच्या समुद्राकडे बघत ते तासन्तास गप्प राहिले, आणि त्यांच्या मनात फक्त एकच चित्र घुमत राहिलं - पुण्याच्या त्या कारखान्यातला एक साधा कामगार, जो घरी जाऊन आपल्या पोराला अभिमानाने सांगत असेल, आपली कंपनी कार बनवते रे.

पुढची नऊ वर्षे म्हणजे एखाद्या तपस्वीच्या तपश्चर्येसारखी होती. टाटा समूहाने रात्रंदिवस मेहनत घेतली, इंडिकाला घासूनपुसून लखलखीत केलं, जणू एखादा शिल्पकार खडकातून हळूहळू देवाची मूर्ती कोरत असतो तसं. विक्री वाढली, नाव पसरलं. आणि याच काळात भारताचा तो जुना गरीब, गावठी शिक्का हळूहळू विरघळू लागला - एखाद्या जुन्या भिंतीवरचा रंग पावसाच्या माऱ्याने उडावा, आणि आतली मूळ, मजबूत वीट उघडी पडावी, तसं.

आणि मग आलं ते वर्ष - दोन हजार आठ. जागतिक मंदीच्या त्या क्रूर लाटेत, जिने अमेरिकेच्या कित्येक बलाढ्य साम्राज्यांना गुडघे टेकायला भाग पाडलं, त्यातच फोर्ड कंपनीही दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर उभी होती - एखाद्या एकेकाळच्या राजासारखी, ज्याचा राजवाडा आता कर्जाच्या ओझ्याखाली कोसळू पाहत होता. आणि त्यांच्या सर्वात मानाच्या, सर्वात महागड्या दागिन्यांना - जग्वार आणि लँड रोव्हर या ब्रिटिश वैभवाच्या मुकुटमण्यांना - आता विकावं लागणार होतं.

आणि तिथे, त्या लिलावाच्या उंबरठ्यावर, उभा राहिला तोच माणूस - ज्याला नऊ वर्षांपूर्वी याच राजवाड्याच्या मालकाने उंबरठ्याबाहेरून हाकलल्यासारखं हिणवलं होतं. बिल फोर्ड स्वतः, आपल्या लवाजम्यासह, मुंबईतल्या बॉम्बे हाऊसमध्ये आले - त्याच बॉम्बे हाऊसमध्ये, जिथल्या भिंतींनी शंभर वर्षांचा भारतीय औद्योगिक इतिहास आपल्या दगडांत साठवून ठेवला होता. अरबी समुद्राची खारी हवा त्या खिडक्यांतून आत झिरपत होती आणि त्याच हवेत आज अमेरिकेचा तो एकेकाळचा गर्विष्ठ उद्योगपती श्वास घेत होता - नऊ वर्षांपूर्वीच्याच माणसासमोर, पण आज पूर्णपणे वेगळ्या भूमिकेत, पूर्णपणे वेगळ्या नजरेने.

दोन पूर्णांक तीन अब्ज डॉलर्सचा करार झाला. जग्वार आणि लँड रोव्हर - ब्रिटिश साम्राज्याच्या अभिमानाची दोन प्रतीकं, ज्यांच्या चाकांखालून एकेकाळी वसाहतवादाचा माज इंग्लंडच्या रस्त्यांवर फिरायचा, ज्या खिळखिळ्या इंग्लंडने दीडशे वर्षे भारतमातेला गुलामीत ठेवलं होतं - आज एका भारतीय समूहाच्या मालकीची झाली होती. इतिहासाने जणू स्वतःच एक वर्तुळ पूर्ण केलं, शतकांपूर्वीचं एक ऋण, न मागताच, फेडलं गेलं. आणि मग तो क्षण आला, ज्यासाठी अख्खा भारत, नकळतच, नऊ वर्षं वाट बघत होता. बिल फोर्ड, तोच माणूस जो एकेकाळी उपकाराची भाषा बोलला होता, आज स्वतः रतन टाटांसमोर, त्याच बॉम्बे हाऊसमध्ये उभा राहून म्हणाला - तुम्ही जग्वार-लँड रोव्हर विकत घेऊन आमच्यावर खूप मोठे उपकार केले आहेत.

त्या एका वाक्यात नऊ वर्षांचा प्रवास सामावला होता - अपमानापासून आदरापर्यंतचा, हिणवण्यापासून हात जोडण्यापर्यंतचा, आणि एका देशाच्या आत्मसन्मानाच्या पुनर्स्थापनेचा.

रतन टाटा यांनी मात्र त्या क्षणी कुठलाही जल्लोष केला नाही, कुठला विजयी हास्यध्वनी केला नाही. त्यांच्या डोळ्यांत ना सूड होता, ना अहंकार - फक्त एक शांत, खोल समाधान होतं, एखाद्या नदीने शेवटी समुद्राला स्पर्श केल्यावर जो भाव असतो तसा. भारतीय संस्कृती ही सूडाची नाही, ती सामावून घेण्याची, क्षमा करण्याची आणि कृतीतून उत्तर देण्याची संस्कृती आहे - आणि म्हणूनच त्यांनी शांतपणे तो हात हातात घेतला, आणि जग्वार-लँड रोव्हरला काही वर्षांतच पुन्हा नफ्याच्या शिखरावर नेऊन बसवलं.

या एका कराराने फक्त दोन कार ब्रँड्सची मालकी बदलली नाही. या एका क्षणाने जगाच्या इतिहासाच्या पानावर एक नवं वाक्य कोरलं गेलं - जो भारत एकेकाळी फक्त स्वस्त मजुरीसाठी ओळखला जायचा, तोच भारत आज जगातल्या सर्वात प्रतिष्ठित लक्झरी ब्रँड्सचा मुकुटधारी बनला होता. जो भारतीय उद्योजक कधीकाळी परदेशी बोर्डरूममधून अपमानित होऊन, मान खाली घालून परतला होता, तोच आज त्याच बोर्डरूमच्या मालकाला आपल्या मायभूमीत, आपल्या दारात, नतमस्तक झालेला बघत होता. नऊ वर्षांपूर्वी जे शब्द काळजावर वारासारखे आदळले होते, त्याच शब्दांचं उत्तर शब्दांनी दिलं गेलं नाही. ते दिलं गेलं मेहनतीच्या घामातून, चिकाटीच्या अग्नीतून, आणि एका शांत, संयमी विजयाच्या प्रकाशातून - जो आवाज न करता, पण अंधार पूर्णपणे उजळून टाकतो.

आणि हाच खरा भारतीय बाणा आहे - अपमानाचं उत्तर आरडाओरडा करून द्यायचं नसतं, ते द्यायचं असतं आपली कृती इतकी उंच नेऊन, की समोरचा स्वतःहूनच, कुठल्याही जबरदस्तीशिवाय, नतमस्तक व्हावा.



# साकीनाका मॅनहोल मृत्यूप्रकरणी कंत्राटदार व कर्मचाऱ्यांवर गुन्हा

■ मुंबई

**मुंबईतील** साकीनाका येथील खैरानी रोड परिसरात उघड्या मॅनहोलमध्ये पडून ६० वर्षीय अस्लम शेख यांचा मृत्यू झाल्याप्रकरणी संबंधित कंत्राटदार आणि कर्मचाऱ्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. या घटनेनंतर विरोधकांनी महापालिका प्रशासन आणि राज्य सरकारवर जोरदार टीका केली आहे. शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी पीडित कुटुंबियांची भेट घेतल्यानंतर महायुती सरकारवर निशाणा साधला.

रोहित पवार म्हणाले की, पालिकेचे मोठे अधिकारी हे कनिष्ठ अधिकाऱ्यांवर प्रकरण ढकलून मोकळे होत आहेत हे योग्य नाही. बड्या अधिकाऱ्यांवर कारवाई झाली पाहिजे. अडीचशे कोटी खर्च करूनही जाळ्या व्यवस्थित लावल्या जात नाहीत. मे महिन्यात सर्व कामे व्हायला पाहिजे होती. उद्धव ठाकरे गटाचे आमदार आदित्य ठाकरे म्हणाले की, काही दिवसांपूर्वी महापौरांच्या उपस्थितीतच एक महापालिका अधिकारी मॅनहोलमध्ये पडला होता. मात्र त्या अधिकाऱ्याची विचारपूस करण्याऐवजी त्याच्याविरुद्ध चौकशी लावण्यात आली. दरम्यान, आज माजी महापौर उबाठाच्या किशोरी पेडणेकर आणि महापौर रितू तावडे यांच्यात वाद झाला. पावसाळ्याच्या अनुषंगाने विशेष सभेचे नियोजन व्हावे, यासाठी स्थायी समिती सदस्य यशोधर फणसे यांच्यासह इतर ४ सदस्यांचे पत्र महापौर कार्यालयात देऊनही उत्तर मिळाले नाही. यावरून पेडणेकरांनी संताप व्यक्त करून महापौर दालनात जाऊन कर्मचाऱ्यांना जाब विचारला. त्यानंतर रितू तावडेंनी त्यांच्याविरोधात पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

# सोनमला दिलासा! जामीन रद्द करण्यास सुप्रीम कोर्टाचा नकार

■ नवी दिल्ली

**मेघालयात** झालेल्या राजा रघुवंशी हनिमून हत्याकांडातील मुख्य आरोपी सोनम रघुवंशी हिला सर्वोच्च न्यायालयाकडून दिलासा मिळाला आहे. तिचा जामीन रद्द करण्याची मेघालय सरकारची मागणी न्यायालयाने फेटाळली. मात्र, जामीन मंजूर करताना उच्च न्यायालयाने दिलेल्या कारणांबाबत काही आक्षेप असल्याचे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले. आरोपीची आधीच सुटका झाल्यामुळे जामीन रद्द करता येणार नसल्याचे स्पष्ट करत राज्य सरकारच्या याचिकेवर पुढील सुनावणी घेण्याचा निर्णय घेतला.

न्या. एम. एम. सुंदरेश आणि न्या. शील नागू यांच्या खंडपीठासमोर आज या प्रकरणाची सुनावणी झाली. मेघालय सरकारतर्फे सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी हा खून पूर्वनियोजित असल्याचा दावा करत, अटक मेमोतील कलम १०३(१) ऐवजी ४०३(१) असा झालेला उल्लेख ही केवळ टंकलेखनाची चूक असल्याचे सांगितले.

# आंबा, काजू उत्पादकांसाठी देवगडला आंदोलन

■ देवगड

**आंबा** व काजू उत्पादकांना अवकाळी पावसामुळे फटका बसला आहे. यावर सरकारने त्यांना मदत जाहीर केली आहे. मात्र मदत तुटपुंजी असल्याचा आरोप करीत नेते राजू शेट्टी आणि महादेव जानकर यांनी कार्यकर्ते व शेतकऱ्यांसह देवगडच्या तारामुंबरी येथे समुद्रात जलसमाधी आंदोलन केले. यावेळी जीवरक्षक बोटी तैनात होत्या. पोलिसांनी काही वेळानंतर आंदोलकांची धरपकड केली.

# मालाड, मुलुंड, माहुलला जागा निश्चित भटक्या कुत्र्यांसाठी ६ महिन्यांत निवारे

■ मुंबई

**मोकाट** कुत्र्यांच्या वाढत्या हल्ल्यांच्या प्रश्नांवर आज विधानसभेत चर्चा झाली. यावेळी विरोधकांनी सरकारला उपाययोजना कधी करणार, असा सवाल केला. यावर उत्तर देताना उदय सामंत यांनी मालाड, मुलुंड आणि माहुल येथे ६ महिन्यांत श्वान निवारे सुरू करण्यात येतील, अशी माहिती दिली.

गेल्या १५ दिवसांत जालन्यात ९३ नागरिकांवर भटक्या कुत्र्यांनी हल्ले केल्याचा मुद्दा शिंदे सेनेचे आमदार अर्जुन खोतकर यांनी उपस्थित करत सरकारला धारेवर धरले. यावर राज्य सरकारने भटक्या



श्वानांच्या नियंत्रणासाठी कठोर उपाययोजना राबविण्याचे आश्वासन दिले. काँग्रेसचे आमदार अमीन पटेल यांनीही मुंबईतील भटक्या कुत्र्यांच्या समस्येकडे मुंबई महापालिका गांभीर्याने पाहत नसल्याचा आरोप केला. तसेच श्वान निवारे कुठे आणि कधी सुरू करणार, असा सवाल केला.

यावर उत्तर देताना उद्योगमंत्री उदय सामंत यांनी सांगितले की, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार राज्यातील प्रत्येक महानगरपालिकेने भटक्या श्वानांच्या नियंत्रणासाठी प्रभावी उपाययोजना करणे आवश्यक आहे. महाराष्ट्रात सध्या सुमारे १४ लाख ८० हजार भटके श्वान असून, त्यापैकी सुमारे ९४ हजार श्वान मुंबईत आहेत.

# दानचोरीने आम्ही व्यथित! संघाची पहिली प्रतिक्रिया

■ अयोध्या

**अयोध्येतील** श्रीराम मंदिरातील दान चोरी प्रकरणावर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने प्रथमच अधिकृत भूमिका मांडली. संघाचे सरकार्यवाह दत्तात्रेय होसबळे यांनी या घटनेबद्दल तीव्र दुःख आणि संताप व्यक्त करत, यामुळे आम्ही व्यथित आणि संतप्त आहोत. संपूर्ण समाज व लाखो रामभक्तांच्या श्रद्धेला धक्का बसल्याचे म्हटले. या प्रकरणातील दोषींना कठोरात कठोर शिक्षा व्हावी.

दत्तात्रेय होसबळे यांनी 'एक्स'वरील पोस्टमध्ये म्हटले की, श्रीरामलल्ला मंदिरातील देणगीपेटीत झालेल्या चोरीच्या दुर्दैवी घटनेमुळे संपूर्ण समाज आणि रामभक्तांच्या भावना दुखावल्या आहेत. आम्ही सर्वजण अत्यंत व्यथित आणि संतप्त आहोत. श्रीराम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टने या घटनेला अत्यंत गांभीर्याने हाताळून मंदिर व्यवस्थापनातील त्रुटी दूर कराव्यात आणि चौकशीत दोषी आढळणाऱ्यांना कठोर शिक्षा व्हावी, अशी अपेक्षा आहे. सध्या निर्माण झालेली संभ्रमाची परिस्थिती लवकर संपुष्टात यावी, अशी अपेक्षा व्यक्त करत हिंदू समाजाने शांतता व संयम राखावा. या प्रकरणाचा गैरफायदा घेण्याचा प्रयत्न करणाऱ्या शक्तींपासून सावध राहावे. दान चोरी प्रकरणी मुख्य आरोपी अविनाश शुक्ला उर्फ 'टिल्लू' याची अयोध्या पोलिसांकडून कसून चौकशी सुरू आहे. पोलिसांनी त्याला तुरुंगातून पोलीस लाईन्समध्ये आणून सुमारे ३० प्रश्नांच्या आधारे त्याची चौकशी केली.

# एसआयआर कामाबाबत आशासेविका महिला आयोगाकडे तक्रार करणार

■ नाशिक

**शिक्षकांनंतर** आता आशासेविका आणि गटप्रवर्तक संघटनांनीही एसआयआरच्या कामांवर आक्षेप नोंदवला आहे. महिलांवर या कामांची सक्ती केली जात असून, त्यांना मानसिक त्रास दिला जात असल्याचा आरोप आशा गटप्रवर्तक संघटनेचे राज्याध्यक्ष राजू देसले यांनी केला आहे. याप्रकरणी राज्य महिला आयोग आणि राष्ट्रीय महिला आयोगाकडे तक्रार करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

राजू देसले म्हणाले की, राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे तत्कालीन आयुक्त अनुप कुमार यादव यांनी २०१९ मध्ये जारी केलेल्या पत्रात आशा आणि गटप्रवर्तकांना केवळ आरोग्याशी संबंधित कामे द्यावीत. तसेच निवडणूक किंवा इतर प्रशासकीय कामांसाठी त्यांच्यावर दबाव टाकू नये, असे स्पष्ट निर्देश दिले होते.

# कुंभमेळा निधीत २४१ कोटींचा घोटाळा! अनिल परबांचा आरोप

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

■ मुंबई

**विधान** परिषदेत आज उबाठा आमदार अनिल परब यांनी सार्वजनिक बांधकाम विभागातील कथित गैरव्यवहार, मुंबई महानगरपालिकेतील निधी वाटपातील दुजाभाव या मुद्यांवरून राज्य सरकारवर जोरदार हल्लाबोल केला. विशेषतः आगामी नाशिक कुंभमेळ्यासाठी काढण्यात आलेल्या टेंडर प्रक्रियेत २४१ कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याचा गंभीर आरोप करत त्यांनी या प्रकरणाची विशेष तपास पथक (एसआयटी) नेमून चौकशी करण्याची मागणी केली.

अनिल परब म्हणाले की, आगामी कुंभमेळ्यासाठी नाशिक जिल्ह्यात विविध रस्ते विकासकामांसाठी सुमारे २,२७० कोटी रुपयांची निविदा प्रक्रिया राबविण्यात आली आहे. मात्र, या प्रक्रियेत मुख्य अभियंता प्रशांत आवटी आणि एका बांधकाम कंपनीच्या प्रतिनिधींनी मिळून १६ कंपन्यांची कथित रिंग तयार करून निविदा प्रक्रियेत गैरव्यवहार करण्यात आला आहे. २०१८ च्या शासन निर्णयानुसार एखादा कंत्राटदार एका निविदेत पात्र ठरला, तर त्याला दुसऱ्या निविदेत अपात्र ठरवता येत नाही. काही अधिकाऱ्यांनी आपल्या मर्जीतील कंत्राटदारांना लाभ मिळावा यासाठी नियमांना हरताळ फासला.

मुंबई महानगरपालिकेतील निधी वाटपाच्या मुद्यावरूनही परब यांनी सरकार आणि प्रशासनावर टीका केली.

# टाटाच्या व्यवस्थापकांना विरोध करणाऱ्या मेहलींचा राजीनामा

■ मुंबई

**टाटा सन्सचे** माजी अध्यक्ष रतन टाटा यांच्या निधनानंतर समूहातील काही व्यवस्थापकांना विरोध करणारे मेहली मिस्त्री यांनी आरएनटी असोसिएट्स या कंपनीच्या संचालकपदाचा राजीनामा दिला. मेहली मिस्त्री हे दिवंगत रतन टाटा यांचे विश्वासू सहकारी होते. अन्य जबाबदाऱ्यांमध्ये व्यग्र असल्याचे कारण देत त्यांनी ३० जून रोजी व्यवस्थापनाकडे आपला राजीनामा सादर केला. १ जुलैपासून ते जबाबदारीतून मुक्त झाले.

रतन टाटा यांच्या पश्चात २०२५ मध्ये मेहली मिस्त्री



यांच्या टाटा ट्रस्टचे विश्वस्त म्हणून फेरनियुक्तीला नोएल टाटा आणि त्यांचे विश्वासू मानल्या जाणाऱ्या वेणू श्रीनिवासन आणि विजय सिंह या दोन विश्वस्तांनी विरोध केला होता. त्यामुळे त्यांची टाटा ट्रस्टच्या विश्वस्तपदी फेरनियुक्ती होऊ शकली नव्हती. तेव्हापासून मेहली टाटा समूहात नाराज होते, अशी चर्चा आहे. याआधी मेहली यांनी विजय सिंह यांच्या टाटा सन्सवरील फेरनियुक्तीलाही विरोध केला होता. त्यामुळे रतन टाटा आणि नोएल टाटा या अघोषित गटांमध्ये वाद सुरू होता. मात्र मेहली यांनी राजीनामा देताना कोणावरही कसलाही आरोप केलेला नाही.

**महत्त्वाकांक्षी मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पांतर्गत मुंबई विभागातील पहिल्या टनेल बोअरिंग मशिनचा (टीबीएम) रविवारी रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांच्या हस्ते शुभारंभ होणार आहे. विक्रोळी येथून टीबीएम वांद्रे-कुर्ला संकुलाच्या (बीकेसी) दिशेने भुयारी मार्ग खोदण्याचे काम सुरू करणार आहे. महत्त्वाची बाब म्हणजे हवामान खात्याने रविवारी मुंबईत पावसाचा यलो अलर्ट जारी केला आहे. तरीही भुयार खोदण्याचे काम रविवारपासूनच सुरू करण्यात येणार आहे.**

# बुलेट ट्रेनसाठी मुंबईतील पहिल्या टीबीएम यंत्राचा रविवारी शुभारंभ

■ मुंबई

**देशातील** पहिल्या हाय स्पीड रेल कॉरिडॉर प्रकल्पातील हा अत्यंत मोलाचा टप्पा मानला



जात आहे. विक्रोळीमध्ये या ३ हजार टन वजनाच्या अजस्त्र टीबीएम यंत्राची जुळणी करण्यात आली. या यंत्राचा व्यास १३.६ मीटर आहे. भूयार खोदण्याचे काम करणारा कटरहेड ३५० टन वजनाचा आहे. ठाणे आणि बीकेसी दरम्यानच्या २१ किलोमीटरच्या भुयारी मार्गापैकी विक्रोळी ते बीकेसी हा टप्पा ६ किलोमीटरचा आहे. तर बीकेसी ते ठाणे या टप्प्यापैकी ७ किलोमीटरचा मार्ग ठाणे खाडीच्या खालून जाणार आहे. या भुयारी मार्गाचा व्यास एवढा आहे की, या एकाच भुयारातून अप आणि डाऊन दिशेने बुलेट ट्रेन ये-जा करू शकणार आहेत. त्यामुळे देशातील हा आतापर्यंतचा सर्वात जास्त रुंदीचा रेल्वे भुयारी मार्ग ठरणार आहे.

